# यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई.

## वार्तापत्र






२५ नोव्हेंबर २०१०

**मा. यशवंतराव चव्हाण यांची २६ वी पुण्यतीथी.**
**त्यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन.**





१२ मार्च २०१०-मा. यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीदिनी राष्ट्रीय पुरस्कार मा. प्रा. यशपाल यांना प्रदान



मा. प्रा. यशपाल विद्यार्थ्यांसोबत हितगुज करतांना



'हवामान बदल आणि महाराष्ट्र' या परिषदेसाठी उपस्थित मान्यवर





'हवामान बदल आणि महाराष्ट्र' या परिषदेत मार्गदर्शन करतांना केंद्रीय वन आणि पर्यावरण मंत्री मा. जयराम रमेश व परिषदेला उपस्थित असलेले प्रतिनिधी.

# यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

ट्रस्ट रजि. नं. एफ. १०६४३, दिनांक १७ सप्टेंबर १९८५, सोसायटी रजि. नं. एम.एम.एच./बी.ओ.एम.-५३९/८५

यशवंतराव चव्हाण सेंटर, जन. जगन्नाथराव भोसले मार्ग, मुंबई - ४०० ०२१.

## ※ विश्वस्त मंडळ सदस्य ※

| | |
|---|---|
| १. मा. श्री. शरदराव पवार | अध्यक्ष |
| २. मा. डॉ. रवींद्र बापट | उपाध्यक्ष |
| ३. मा. श्री. अरूण गुजराथी | कार्याध्यक्ष |
| ४. मा. श्री. श.गं. काळे | सरचिटणीस |
| ५. मा. श्री. हेमंत टकले | कोषाध्यक्ष |

६. मा. श्री. मोहन धारिया
७. मा. श्री. शिवाजीराव पाटील-निलंगेकर
८. मा. श्री. हुसेन दलवाई
९. मा. प्रा. पी. बी. पाटील
१०. मा. श्री. राम प्रधान
११. मा. श्री. लक्ष्मण माने
१२. मा. श्री. वसंतराव कार्लेकर
१३. मा. सौ. सुप्रिया सुळे
१४. मा. श्री. दिलीप वळसे-पाटील
१५. मा. श्री. अजित निंबाळकर

**महाराष्ट्र शासन प्रतिनिधी**

१६. मा. श्री. नितीन करीर
मा. मुख्यमंत्र्यांचे सचिव
१७. मा. श्री. वि. व. आचालिया
प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग

## ※ कार्यकारिणी मंडळ सदस्य ※

१. मा. श्री. शरदराव पवार
२. मा. श्री. हुसेन दलवाई
३. मा. श्री. अरूण गुजराथी
४. मा. श्री. श.गं. काळे
५. मा. डॉ. रवींद्र बापट
६. मा. श्री. जयंत पाटील
७. मा. श्री. राम ताकवले
८. मा. श्री. ना. धों. महानोर
९. मा. श्री. बापूसाहेब काळदाते
१०. मा. श्री. रा. सु. गवई
११. मा. श्री. एन. के. पी. साळवे
१२. मा. श्री. के. बी. आवाडे
१३. मा. श्री. श्रीनिवास पाटील
१४. मा. श्री. प्रकाश कुलकर्णी
१५. मा. सौ. सुप्रिया सुळे
१६. मा. श्री. अंकुशराव टोपे
१७. मा. श्री. अप्पासाहेब ऊर्फ सा. रे. पाटील
१८. मा. श्री. शामराव पा. पाटील
१९. मा. श्री. यशवंतराव गडाख
२०. मा. श्री. माणिकराव पाटील

**महाराष्ट्र शासन प्रतिनिधी**

२१. मा. श्री. नितीन करीर
मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव

## ※ कार्यकारी समिती ※

१. मा. श्री. शरदराव पवार
२. मा. डॉ. रवींद्र बापट
३. मा. श्री. अरूण गुजराथी
४. मा. श्री. श.गं. काळे
५. मा. श्री. हेमंत टकले
६. मा. श्री. श्रीनिवास पाटील
७. मा. सौ. सुप्रिया सुळे

# यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

| | | |
|---|---|---|
| विभागीय केंद्र, कऱ्हाड | अध्यक्ष | श्री. जयंत पाटील |
| विभागीय केंद्र, पुणे | अध्यक्ष | डॉ. राम ताकवले |
| विभागीय केंद्र, नागपूर | अध्यक्ष | श्री. गिरीश गांधी |
| विभागीय केंद्र, नाशिक | अध्यक्ष | श्री. विनायकराव पाटील |
| विभागीय केंद्र, रत्नागिरी | अध्यक्ष | श्री. राजाभाऊ लिमये |
| विभागीय केंद्र, औरंगाबाद | अध्यक्ष | श्री. नंदकिशोर कागलीवाल |
| विभागीय केंद्र, लातूर | अध्यक्ष | डॉ. जर्नादिन वाघमारे |
| विभागीय केंद्र, अमरावती | अध्यक्ष | श्री. रा. सु. गवई |
| सृजन | संकल्पना व संयोजिका | सौ. सुप्रिया सुळे |
| शिक्षण विकास मंच | निमंत्रक | सौ. सुप्रिया सुळे |
| | प्रमुख संयोजक | डॉ. कुमुद बन्सल |
| नवमहाराष्ट्र युवा अभियान | संयोजक | श्री. दत्ता बाळसराफ |
| अपंग हक्क विकास मंच | समन्वयक | श्री. विजय कान्हेकर |
| वसुंधरा पर्यावरण संवर्धन अभियान | निमंत्रक | सौ. सुप्रिया सुळे |
| महाराष्ट्र महिला व्यासपीठ | संयोजिका | श्रीमती रेखा नार्वेकर |
| | कार्यकारी संयोजिका | श्रीमती ममता कानडे |
| कृषी व सहकार व्यासपीठ | निमंत्रक | श्री. बी. डी. पवार |
| कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरम | सदस्य सचिव | श्री. म. बा. पवार |
| यशवंतराव चव्हाण सभागृह व कलादालन | व्यवस्थापक | श्री. विजय देसाई |
| यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय ग्रंथालय | ग्रंथपाल | श्री. अनिल पाझारे |
| यशवंतराव चव्हाण माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनी | संचालक | ब्रिगेडीअर - श्री. सुशील गुप्तन |
| | मुख्य विपणन अधिकारी | श्री. विक्रम वासुदेव |
| मुख्य कार्यालय | प्रशासकीय व वित्त अधिकारी | श्री. एन. ए. भोसले |
| यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई | प्रमुख लेखाधिकारी | श्री. महेश चव्हाण |
| यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई | कार्यक्रम संयोजक | श्री. दत्ता बाळसराफ |
| मानद वास्तु विशारद | | मे. शशी प्रभू ॲण्ड असोसिएटस |
| सांविधिक लेखा परिक्षक | | मे.सी.व्ही.के. असोसिएटस, मुंबई |
| अंतर्गत हिशोब तपासनीस | | मे. वैशंपायन आणि पाध्ये, चार्टर्ड अकाउन्टंट |
| वार्तापत्र | मानद संपादक | श्री. दत्ता बाळसराफ |

Website : www.ybchavanpratishthan.org E-mail: ybchavan@vsnl.com

# वार्तापत्र

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

वर्ष : चौदावे ■ अंक : २६ वा ■ प्रकाशन : २५ नोव्हेंबर २०१० मा. यशवंतराव चव्हाण यांची २६वी पुण्यतीथी

■
सल्लागार
**मा. शरद काळे**
**मा. रवींद्र बापट**
■
मानद् संपादक
**दत्ता बाळसराफ**
■
उप संपादक
**सुरेश पाटील**
■
साहाय्यक
**मिनल सावंत**
■
**आभार :**
संजय बनसोडे, अरूण शिंदे, विद्याधर खंडे, संगीता गवारे, प्रशांत राऊत, स्मिता रायकर, महेश चौधरी, राजेंद्र रूपवते, शोभा लोंढे, प्रियंका देसाई, अनिल चिंदरकर, शमीम खान, सुहास बाबर यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल आभार

**अनुक्रम...**

संपादकीय / ३
स्व. यशवंतराव चव्हाण - लेख / ५
सन्मानपत्र / ८
नवमहाराष्ट्र युवा अभियान - कार्यवृत्त / १०
अपंग हक्क विकास मंच - कार्यवृत्त / १६
शिक्षण विकास मंच - कार्यवृत्त / १९
वसुंधरा पर्यावरण संवर्धन अभियान - कार्यवृत्त / २१
कायदेविषयक साहाय्य व सल्ला फोरम - कार्यवृत्त / २३
महाराष्ट्र महिला व्यासपीठ - कार्यवृत्त / २६
सृजन आणि रंगस्वर - कार्यवृत्त / २९
यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय ग्रंथालय - कार्यवृत्त / ३०
विभागीय केंद्र नाशिक - कार्यवृत्त / ३३
विभागीय केंद्र नागपूर - कार्यवृत्त / ३९
विभागीय केंद्र औरंगाबाद - कार्यवृत्त / ४५
कृषी सहकार व्यासपीठ व विभागीय केंद्र पुणे - कार्यवृत्त / ४९
विभागीय केंद्र कराड - कार्यवृत्त / ५४
विभागीय केंद्र रत्नागिरी - कार्यवृत्त / ५७
विभागीय केंद्र लातूर - कार्यवृत्त / ६०
माहिती व तंत्रज्ञान प्रबोधनी - कार्यवृत्त / ६५
प्रतिष्ठानची विक्रीसाठी असलेली प्रकाशने / ७२

**संपादकीय...**

यंदाचे वर्ष (२०१०-११) हे महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीचे सुवर्ण महोत्सवी वर्ष म्हणून साजरे करण्यात येत आहे. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीच्या निमित्ताने महाराष्ट्रात घडलेले महामंथन व त्या पार्श्वभूमीवर आपल्या संयमी व दूरदृष्टीने महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेचा मंगलकलश आणणारे मा. यशवंतराव यांच्या गौरवास्पद स्मृती जागविण्याचे हे वर्ष होय. तसेच महाराष्ट्राच्या जडण-घडणीचा पाया आणि त्यावर उभ्या राहिलेल्या वास्तूचा लेखाजोखा या निमित्ताने मांडला जावा हेही अपेक्षितच आहे. तशा स्वरुपाचे विविध कार्यक्रम सध्या राज्यभर शासन तसेच विविध संस्था व संघटना यांच्या माध्यमातून सुरु आहेत. प्रतिष्ठानच्या मध्यवर्ती तसेच विभागीय केंद्रामधूनही असे अनेक कार्यक्रम सुरु आहेत. त्याशिवाय सर्व विभागांचे व विभागीय केंद्राचे नियमितपणे सुरु असणारे उपक्रम या सर्वांबद्दलची माहिती या अंकात दिली आहे. त्यात **'अभिसरण'** या विद्यार्थी-युवा वर्गासाठीच्या अभिनव उपक्रमाचा विशेष उल्लेख करण्याजोगा आहे.

६ मार्च २०१० रोजी मुंबईत घेण्यात आलेल्या **'हवामान बदल आणि महाराष्ट्र'** या राज्यस्तरीय परिषदेला केंद्रिय पर्यावरण मंत्री, मुख्यमंत्री व इतर अनेक मान्यवर उपस्थित होते. त्यात झालेले विचारमंथन पुस्तिकेच्या स्वरुपात प्रकाशित केले आहे.

या वर्षीचे यशवंतराव चव्हाण कृषि औद्योगिक समाजरचना/ व्यवस्थापन प्रशासन २०१० राज्यस्तरीय पारितोषिक शिरोळचे **मा. अप्पासाहेब तथा सा. रे. पाटील** यांना प्रदान करण्यात येत आहे. त्यांचा कार्यपरिचय सन्मानपत्रात आपण जरुर वाचवा. त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन व त्यांना दिर्घारोग्य लाभो ही सदिच्छा.

प्रतिष्ठानच्या उभारणीत व कार्यात महत्वपूर्ण योगदान देणाऱ्या काही मान्यवरांचे या कालावधीत निधन झाले त्यांच्या स्मृतीस प्रतिष्ठान परिवारातर्फे विनम्र अभिवादन.

*मानद संपादक*

# विचारधन



"कोणत्याही सामाजिक कार्यास नैतिकतेचे अधिष्ठान लागते त्यावाचून ते टिकाऊ व परिणामकारक होऊ शकणार नाही. शिक्षणकार्य हे तर याहून मौलिक स्वरूपाचे, म्हणजे चारित्र्य घडविण्याचे कार्य आहे. त्यामुळे त्या क्षेत्रात आज आढळणारे अराजक समाज जीवनाचे सारेच प्रश्न अधिकाधिक कठीण करीत जाणार की काय, अशी भीती वाटते. ही भीती दूर करण्याचे व्यवहार्य मार्ग शोधले पाहिजेत. त्यासाठी आजच्या परिस्थितीचे काळजीपूर्वक विश्लेषण होणे आवश्यक आहे. शिक्षण शास्त्रज्ञांचे, शिक्षकांचे व विचारवंतांचे ते कार्य आहे. केवळ विश्लेषण करून न थांबता प्राप्त परिस्थितीत सुधारणा करण्याचा मार्ग त्यांनी दाखवावा व तो प्रत्यक्ष कार्यवाहीत आणण्याची पद्धतही स्पष्ट करावी."

– यशवंतराव चव्हाण



अक्षरजुळणी आणि छपाई : हे त्रैमासिक मुद्रक-प्रकाशक-संपादक श्री दत्ता बाळसराफ यांनी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई करिता, प्रिन्टोग्राफी सिस्टम (इं.) प्रा.लि., २८ मुंबई समाचार मार्ग, राजाबहादूर बिल्डींग, फोर्ट, मुंबई-४०० ०२३. फोन नं.: ४०७८ ५६५६ येथे छापून यशवंतराव चव्हाण केंद्र, जनरल जगन्नाथराव भोसले मार्ग, मुंबई - २१ येथे प्रकाशित केले. नोंदणी क्रं. ७१५८७/९९

# राष्ट्ररचनेतील समाजसेवेचे महत्व

– स्व. यशवंतराव चव्हाण

आज येथें उपस्थित असलेल्या आपल्यासाख्या श्रोत्यांसमोर भाषण करणें यांत माझा गौरव होत असून मला ही संधि प्राप्त करुन दिल्याबद्दल मी प्रोग्रेसिव्ह ग्रुपचे आभार मानतो.

आज मी आपणांसमोर 'समाजसेवेचें राष्ट्ररचनेच्या कार्यातील स्थान' याविषयावर बोलणार आहें. वास्तविक हा विषय असा आहे की, या बाबतींत बोलण्यापेक्षा कृतीचीच जास्त आवश्यकता आहे. परंतु आपण आज ज्या महान प्रगतीच्या कार्यात गुंतलों आहोत, त्यात समाजसेवेला फार महत्वाची भूमिका पार पाडायची आहे, ही वस्तुस्थिति लक्षांत घेऊनच आजच्या भाषणासाठी या विषयाची मीं मुद्दाम निवड केली.

आपल्या देशांत समाजसेवेला अमर्याद वाव आहे. ही गोष्ट अर्थात् आपणांस भूषणावह वाटावी अशी नाही. कारण याचा अर्थ असा आहे की, आपल्या समाजांतील बहुसंख्य लोकांना जीवनांतील सुखसोयी अद्याप उपलब्धच झालेल्या नाहींत किंवा जेथें त्या उपलब्ध असतील तिथें त्यांचे प्रमाण अत्यल्प आहे. ज्या समाजांत आर्थिक व सामाजिक दृष्ट्या सर्व लोक समान पातळीवर असतात आणि ज्याला आपण समाजसेवा म्हणतों तिच्या मदतीशिवाय जीवनांतील सर्व उपलब्ध सुखसोयींचा जिथे सर्वांना सारख्या प्रमाणांत उपभोग घेतां येतो, अशा प्रकारच्या समाजव्यवस्थेस आदर्श समाजव्यवस्था म्हणतां येईल. असे आदर्श समाज अर्थात् फारच थोडे असूं शकतील. परंतु दीर्घकाळ मागासलेल्या व अविकसित स्थितींत असलेल्या, आणि जुन्या धार्मिक रुढींचे व परंपरेचे ओझें सतत वाहणाऱ्या आपल्या या देशात अलीकडच्या काळापर्यंत योजनाबद्ध अर्थव्यस्थेचा मागमूसहि नव्हता. त्यामुळे येथें तीव्र आर्थिक व सामाजिक विषमता निर्माण होणें अगदीं अपरिहार्य आहे. ही विषमता दूर करण्याचें काम लहानसहान नसून त्यासाठी शासनाकडून, समाजसंस्थांकडून व सामाजिक कार्यकर्त्यांकडून भरीव आणि सुसूत्र असे प्रयत्न व्हावयास पाहिजेत.

या ठिकाणी असा एक प्रश्न उपस्थित होतो की सामाजिक संस्था व समाजसेवक यांच्याकडून अपेक्षित असलेले समाजसेवेचें हे कार्य, सर्व प्रकारची साधनसामुग्री आणि सत्ता हातीं असणाऱ्या सरकारनेंच आपल्या शिरावर कां घेऊं नये? ज्या मूलभूत तत्वप्रणालीनुसार समाजव्यवस्था निर्माण करण्याचें आपले ध्येय आहे त्या तत्त्वप्रणालीशींच हा प्रश्न निगडित आहे. समाजवादी समाजव्यवस्था निर्माण करण्याचे आपले ध्येय आपण बुद्धिपुरःसर व पूर्ण विचारांतींच स्वीकारले आहे. काही टीकाकर म्हणतात त्याप्रमाणे निर्भेळ समाजवादाचें स्वरुप सोयिस्करपणें बदलण्याचा किंवा त्याची गती मंद करण्याचा हा प्रयत्न नाहीं. सरकारने सेवेची आणि सुधारणेचीं सर्वच कामे आपल्या हाती घेतली तर तें हुकूमशाहीचेंच राज्य बनेल. हुकूमशाहींत समाजांत खरे म्हणा किंवा काल्पनिक म्हणा जे अन्याय व गैरव्यवस्था असेल ती दूर करण्याचे आणि आपल्याला पाहिजे तशी रचना करण्याचे सरकारला कर्तुमकर्तुम अधिकार असतात. अशा प्रकारच्या समाजव्यवस्थेंत स्वतंत्रपणें समाजकल्याणाचें कार्य करणारी संस्था अस्तित्वांत राहूं शकत नाही. परंतु आपण यापेक्षां निराळ्या अशा लोकशाही मार्गाचा स्वीकार केला आहे. त्यामुळें आपल्या समाजांत लोकसेवेचें काम करणाऱ्या व्यक्तींना व संस्थांना समाजसुधारणेचें व अन्याय-निवारणाचें कार्य नेहमींच पुढाकार घेऊन करतां येईल व त्यासाठी त्यांना भरपूर वावहि मिळेल. अशा रीतीनें समता व सामाजिक न्याय यांवर आधारलेली नवीन समाजव्यवस्था निर्माण करण्याच्या कामीं त्यांना हातभार लावतां येईल. सरकारला अर्थातच या कार्यापासून अलिप्त राहतां येणार नाहीं किंवा त्यासंबंधीं अनास्थाहि दाखवितां येणार नाहीं, समाजसेवा करणाऱ्या संस्थांच्या पाठीशीं राहून सरकार त्यांना सर्व प्रकारचें सक्रिय साहाय्य करील. खरें म्हणजे आपल्या देशामध्ये याच पद्धतीनें समाजसेवेचें कार्य व्हावें यासाठीं आमचा प्रयत्न आहे.

सुदैवाने या देशाला समाजसेवेची प्रदीर्घ परंपरा आहे. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरचा व विसाव्या शतकाच्या सुरुवातीचा असा जो पन्नास वर्षांचा काळ आहे त्या काळांत सामाजिक जीवनाच्या विविध क्षेत्रांत सुधारणा घडवून आणण्यासाठी या देशांत एक महान् चळवळ झाली. महाराष्ट्रामध्ये ज्योतिबा फुले, न्या. रानडे, डॉ. भांडारकर, आगरकर, गोखले यांच्यासारख्या अनेक समाजसुधारकांनी प्रस्थापित हितसंबंधाच्या प्रखर विरोधास तोंड देऊन व प्रसंगी त्यांचे वैमनस्यहि पत्करुन आपल्या ध्ययेसिद्धीसाठी सतत कार्य केले. या समाजसुधारकांनी केलेल्या कार्याचें या ठिकाणी मूल्यमापन करण्याचा माझा इरादा नाही. परंतु

समाजाच्या भौतिक, नैतिक व वैचारिक प्रगतीवर या सुधारकांचा फार मोठा प्रभाव पडला आहे, एवढेंच मी येथें सांगितले तरी ते पुरेसें आहे. तथापि, समाजसुधारणा व समाजसेवा यांमध्ये फरक असून हा फरक आपणांस कदाचित् सूक्ष्म अगर तात्त्विक स्वरुपाचा वाटेल, जीवनाच्या एकंदर पध्दतीलाच एक नवीन वैचारिक आशय देऊन तिच्यांत बदल घडवून आणणें हें समाजसुधारणेचें उद्दिष्ट असतें, तर समाजसेवा ही जीवनाच्या कांहीं व्यवहार्य अंगांपुरतीच मर्यादित असून, व्यक्तिगत किंवा व्यक्तिसमूहाचें दुःख किंवा त्यांच्या अडचणी दूर करण्याचा हेतु तिच्या मुळाशीं असतो. सामाजिक सुधारणा घडवून आणणें हे जनमताचें नेतृत्व करणाऱ्या नेत्यांचे कार्य असते तर समाजसेवा करण्यासाठी योग्य प्रकारें शिक्षण घेतलेल्या माणसांची जरुरी असते. यामध्ये व्यावसायिक समाजसेवकांचाहि समावेश करतां येईल. या दोहोंमधील विभाजक रेषा अर्थात् अतिसूक्ष्म असते हे खरें आहे. कारण महात्मा फुले हे महान समाजसुधारकहि होते व त्याचबरोबर ते निष्ठावंत समाजसेवकहि होते. तथापि, हा फरक आपण स्पष्टपणे लक्षांत घ्यावयास पहिजे, कारण समाजसेवेची जी पद्धत आपल्याला निर्माण करावयाची आहे. ती त्यामुळें आपणांस नीटपणें समजूं शकेल व तिच्यामध्ये समाजसेवकांचे स्थान कोणतें आहे, हेंहि आपल्या लक्षांत येईल.

मी आतांच सांगितल्याप्रमाणें आपले प्रश्न अनेकविध असून ते सोडविण्याच्या कामीं समाजसेवक यथाशक्ति हातभार लावूं शकतील. या प्रश्नांचे स्थूल मानानें मी दोन प्रकार करतो. पहिल्या प्रकारांत, हालअपेष्टा व सामाजिक अन्याय यांची झळ ज्यांना लागली आहे अशाना मदत देण्यासंबंधींचे प्रश्न येतात, तर दुसऱ्या प्रकारांत विकास कार्याशीं संबंधित असलेल्या प्रश्नांचा समावेश होतो. पहिल्या प्रकारांत मुख्यतः शारीरिक दृष्टया अपंग असलेले, भिकारी, बालगुन्हेगार, वेश्या, स्त्रियांचा अनैतिक व्यापार करणारे व अमली पदार्थाचे सेवन करणारे व्यसनी लोक यांच्या प्रश्नांचा आणि त्याचप्रमाणें हरिजन, गिरिजन व माजी गुन्हेगार यांसारख्या समाजांतील सर्वसाधारण हक्कांपासून वंचित झालेल्या दलित लोकांच्या उद्धारासंबंधींच्या प्रश्नांचा समावेश होतो, तर दुसऱ्या प्रकारात बालक व युवक कल्याण, ग्रामीण पुनर्रचना, समाज-विकास, कुटुंबनियोजन, वगैरे प्रश्नांचा अन्तर्भाव होतो.

समाजकल्याणाचें ध्येये स्वीकारल्यानंतर मी आतांच ज्यांचा उल्लेख केला त्या समाजसेवेच्या निरनिराळ्या क्षेत्रात सरकार जोमानें कार्य करीत आहे. पूर्वी शिक्षण व सार्वजनिक आरोग्य या दोन क्षेत्रांपुरतेंच सरकारचें कल्याणकारी कार्य, बहुतांशी मर्यादित होतें, पण आतां इतर अनेक क्षेत्रांत हे कार्य सुरु करण्यांत आलेलें आहे. १९५३ सालीं स्थापन झालेले मध्यवर्ती समाजकल्याण मंडळ आणि त्यानंतर राज्यांमध्ये स्थापन झालेल्या त्याच्या शाखा हा कल्याणकारी ध्येयाच्या मार्गावरील एक महत्त्वाचा असा टप्पा आहे. खासगी सामाजिक संस्थाना आर्थिक आणि इतर प्रकारचें साहाय्य देऊन आणि त्याचबरोबर विविध प्रकारच्या समाजसेवेंत गुंतलेल्या संस्थांच्या कार्यात एकसूत्रीपणा आणून समाजकल्याण मंडळानें समाजकल्याणाच्या कार्यात एक प्रकारचा पद्धतशीरपणा आणला आहे. याशिवाय निरनिराळी सरकारी खातीं सुद्धां, थोडयाफार प्रमाणात समाजकल्याणविषयक कार्य करीत असतात.

आज अनेक खाजगी संस्था स्वयंस्फूर्तीनें अतिशय उपयुक्त असें सामाजिक कार्य करीत आहेत. यांपैकी कांही संस्थानी आघाडीवर राहून जे कार्य केलें आहे, त्याबद्दल आपल्या राज्यानें खरोखर अभिमान बाळगावा इतकें ते महत्त्वाचें आहे. स्त्रियांच्या, विशेषतः विधवा व मागासलेल्या वर्गातील स्त्रियांच्या कल्याणाकरतां कार्य करीत असलेली हिंगणें स्त्री-शिक्षण संस्था, ग्रामीण शिक्षणक्षेत्रांत कार्य करीत असलेली रयत शिक्षण संस्था, सामाजिक प्रश्नांचें शास्त्रीय रीत्या संशोधन करण्यांत गुंतलेली टाटा इन्स्टिटयूट ऑफ सोशल सायन्सेस यांचा त्या त्या क्षेत्रांत प्रामुख्यानें उल्लेख करावा लागेल. याशिवाय जनतेच्या सामाजिक परिस्थितींत सुधारणा घडवून आणण्याचें बहुमोल असें कार्य आज इतर अनेक संस्था करीत आहेत.

तथपि, निरनिराळ्या क्षेत्रांत सरकारी व बिनसरकारी संस्थांकडून होत असलेलें कार्य जमेस धरुन सुद्धां, कल्याणकारी राज्याचें आपले उद्दिष्ट गाठण्यासाठीं आपणांस अद्यापि बरीच मजल मारावयाची आहे. या दोन्ही प्रकारच्या संस्थांमध्यें योग्य प्रकारचें सहकार्य व सुसूत्रता आणण्याची आज अतिशय गरज आहे. कार्य-निपुणतेच्या दृष्टीनें समाजसेवेच्या कार्याचे आपण निरनिराळे भाग करतो. तथापि सामाजिक प्रश्नांना असें स्वतंत्र अस्तित्व असूं शकत नाहीं. एकाच सामाजिक परिस्थितीमधून ते निर्माण झालेले असल्यामुळे ते एकमेकांवर अवलंबून असतात. तेव्हां ते सोडविण्याच्या आपल्या प्रयत्नांमध्यें एकसूत्रता असावयास पाहिजे आणि ही एकसूत्रता केवळ माहितीची देवाणघेवाण करण्यापुरतीच मर्यादित न राहतां त्याची व्याप्ति पुष्कळच वाढली पाहिजे. दुसरी गोष्ट म्हणजे आपल्या सामाजिक प्रश्नांचे विशाल व गुंतागुंतीचें स्वरुप लक्षांत घेतां, अशा प्रकारचें समाजसेवेचें कार्य हातीं

घेण्याकरितां अधिकाधिक संघटना व संस्था पुढें यावयास पाहिजेत. त्या तशा येतील अशी आपण आशा करुं या.

सामाजिक कार्य शास्त्रोक्त पद्धतीनें केलें तर ते अधिक परिणामकारक होतें आणि त्याकरितां आवश्यक ती सर्व माहिती व त्यासंबंधींची आंकडेवारी आपल्याजवळ असावी लागते. आंकडेवारी गोळा करणें हे एक मोठें किचकट काम असून ते अत्यंत काळजीपूर्वक व बारकाईनें करावे लागतें. विद्यापीठें, महाविद्यालयें व इतर शैक्षणिक संस्था हे कार्य हातीं घेऊं शकतील. क्रीडामंडळें, गायन समाज, कलाकेंद्रें वगैरे सारख्या सामाजिक संघटनांना अल्पबचत मोहिमेत भाग घेतां येईल, तर महिला मंडळांना कुटुंबनियोजनाचें कार्य उत्कृष्ट रीतीनें करतां येईल. आजहि अनेक संघटना या सर्व क्षेत्रांत उत्तम प्रकारचें कार्य करीत आहेत. परंतु यापेक्षांहि अधिक संस्थांनीं पुढे येऊन या महान् राष्ट्रीय कार्याला आपला हातभार लावला पाहिजे.

काही लोकांनी अशी एक समजूत करुन घेतलेली दिसते की, देशांत अमलांत येत असलेल्या विकासविषयक कार्यक्रमाची जबाबदारी सर्वस्वीं सरकारचीच आहे. परंतु ही समजूत आपल्या नियोजनाच्या उद्दिष्टाशीं सर्वस्वी विसंगत आहे. अधिक व्यापक दृष्टिकोनांतून पाहिल्यास आपणांस असे दिसून येईल की, सरकार अधिकारावर येतें आणि जातें तर विकासकार्य ही अखंड चालणारी प्रक्रिया आहे. हें विकासकार्य म्हणजे नवी समाजरचना निर्माण करण्याचे प्रयत्न होत आणि म्हणून त्यांत पक्षीय किंवा जातीय विचारांना थारा असतां कामा नये. लोकशाहीमधल्या नियोजनाच्या या महान् आणि एका अर्थानें अद्वितीय अशा प्रयोगांत, सरकारी कार्याइतकेच, किंबहुना त्याहिपेक्षां अधिक महत्त्वाचें स्थान सामाजिक कार्याला असतें. या बाबतींत जर आपण अयशस्वी झालों तर लोकशाही पद्धतीच्या नियोजनाचा आपला दावाच खोटा ठरेल.

लोकशाही पद्धतीच्या नियोजनांत कार्यपद्धतीच्या दृष्टीनें काहीं उणीवा असूं शकतील. परंतु मानव हा या नियोजनाचा केंद्रबिंदू असल्यानें या उणीवांची एका अर्थानें भरपाई होते. यालाच आपल्या नियोजनाची मानवी अथवा नैतिक बाजू असे म्हणतां येईल. हा मानवी दृष्टिकोन जर आपल्या नजरेआड झाला तर योजनेचें मूळ उद्दिष्टच नष्ट होईल. हा धोका टाळण्यासाठी नियोजनांतील समाजकार्यावर आपणांस जास्तींत जास्त भर द्यावयास पाहिजे आणि त्याचबरोबर, नियोजनांत या कार्याला भरपूर वाव मिळतो आहे किंवा नाहीं हेहि आपण पाहिले पाहिजे. अशा प्रकारची शाश्वती आपण देऊं शकलो तर ज्या नव्या समाजव्यवस्थेचे स्वप्न आपण अनेक दिवस आपल्या उराशीं बाळगलें आहे, तिची उभारणी आपण भक्कम पायावर करुं शकूं. मला खात्री आहे की, पुरोगामी कल्पना व ध्येये यांचा पुरस्कार करणारी प्रोग्रेसिव्ह ग्रुप ही आपली संस्था या राष्ट्रीय प्रयत्नांस आपला नैतिक पाठिंबा व सक्रिय साहाय्य देईल.

माझें भाषण संपविण्यापूर्वी, सर्वांच्या अतिशय जिव्हाळ्याच्या अशा या विषयावर माझे विचार व्यक्त करण्याची आपण मला संधि दिलीत त्याबद्दल ग्रुपचे मी पुन्हा एकदां आभार मानतो.

*संदर्भ :*
*राष्ट्ररचनेंतील समाजसेवेचें महत्व*
*प्रोग्रेसिव्ह ग्रूप, मुंबई*
*दि. ११ ऑगस्ट १९६०*
*('सहयाद्रीचे वारे' या पुस्तकातून)*

* * *

## यशवंतराव चव्हाण कृषि-औद्योगिक समाजरचना राज्यस्तरीय पारितोषिक २०१०
## माननीय श्री. आप्पासाहेब ऊर्फ सातगोंडा रेवगोंडा पाटील

# सन्मानपत्र

श्री. आप्पासाहेब उर्फ सा. रे. पाटील यांचा जन्म कोल्हापूर जिल्ह्यातील शिरोळ तालुक्यातील जांभळी या गावी दि. ११ डिसेंबर १९२१ रोजी झाला. इयत्ता ४ थी पर्यंतचे शिक्षण त्यांनी जांभळी येथेच घेतले व त्यानंतर इयत्ता ७ वी पर्यंतचे शिक्षण नांदणी येथे घेतले. त्या काळातील अनेक थोर नेत्यांप्रमाणेच त्यांचे पुढील शिक्षण स्वातंत्र्य चळवळीने व महात्मा गांधी यांच्या विचाराने भारलेल्या वातावरणात प्रत्यक्ष जीवनाच्या विद्यापीठात झाले. या स्वयंविकासी शिक्षणामुळे त्यांच्यामध्ये जो आत्मविश्वास निर्माण झाला त्यामुळे इंचलकरंजी नगरपालिकेच्या जकात नाक्यावर कारकून म्हणून काम केलेले आप्पासाहेब पाटील हे आज अनेक राज्यव्यापी व राष्ट्रीय संस्थांवर सदस्य, पदाधिकारी किंवा अध्यक्ष तसेच विधानसभेचे ज्येष्ठ सदस्य म्हणून यशस्वीपणे काम करीत आहेत.

शेती हा त्यांचा वडिलोपार्जित व्यवसाय असल्याने शेती विषयक ज्ञान त्यांनी प्रत्यक्ष अनुभवातून आत्मसात् केलेले आहे. त्यामुळे शेती व शेतकरी यांच्या अडीअडचणींची त्यांना चांगलीच जाणीव आहे. संस्कारक्षम वयात ते जसे महात्मा गांधी यांच्या विचाराने प्रभावित झाले तसेच समाजवादाकडेही आकृष्ट झाले. १९४६ साली त्यांनी सहकारी शेतीच्या उद्दिष्टाने जांभळी विविध सहकारी सेवा सोसायटीची स्थापना केली व १९५१ साली ते शिरोळ तालुका सहकारी खरेदी विक्री संघ, जयसिंगपूर या संस्थेचे व्यवस्थापक झाले. एकीकडे शेती व सहकारी क्षेत्रात प्रत्यक्ष अनुभव मिळवत असतानाच त्यांनी स्वातंत्र्य चळवळीमध्ये प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सहभाग घेतला. त्याकाळात साने गुरुजी, जयप्रकाश नारायण, अच्युतराव पटवर्धन, एस. एम. जोशी, नानासाहेब गोरे अशा समाजवादी विचारसरणीच्या उत्तुंग व्यक्तिमत्त्वांशी त्यांचा सहवास घडला. या सहवासातून त्यांनी साधी रहाणी व उच्च विचारसरणी हे मूल्य आपल्या जीवनात आस्थेने उतरविले.

भाषावार प्रांत रचनेच्या वेळी संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीने सारे जनमानस प्रभावित झालेले होते. १९५७ साली श्री. आप्पासाहेब पाटील यांनी संयुक्त महाराष्ट्र समितीतर्फे महाराष्ट्र विधानसभेची निवडणूक लढविली व ते शिरोळचे आमदार झाले. तालुक्याच्या पातळीवरुन राज्यस्तरीय मंचावर आलेल्या श्री आप्पासाहेब पाटील यांचा मा. यशवंतराव चव्हाण, डॉ. धनंजयराव गाडगीळ, वैकुंठभाई मेहता, पद्मश्री विखे पाटील, तात्यासाहेब कोरे अशा दिग्गज नेत्यांशी संबंध आला. त्यांच्याकडून प्रेरणा घेऊन श्री. आप्पासाहेब पाटील यांनी जिल्हा व तालुका पातळीवर अनेक सहकारी उपक्रम राबविले.

श्री. आप्पासाहेब पाटील यांचे नांव श्रीदत्त शेतकरी सहकारी साखर कारखाना लिमिटेड, शिरोळ या संस्थेशी एकरुप झालेले आहे. या कारखान्याचे ते संस्थापक संचालक असून दीर्घकाळ त्यांनी या कारखान्याचे अध्यक्षपद भूषविलेले आहे. प्रतिदिन १२५० टन ऊस गाळपाची क्षमता असलेल्या या कारखान्याचा क्रमाक्रमाने विस्तार करत श्री. आप्पासाहेब पाटील यांनी कारखान्याची गाळप क्षमता प्रतिदिन ७००० टन इतकी वाढविली आहे. सहयोगी वीज निर्मितीचा कार्यक्रम या कारखान्याने महाराष्ट्रात प्रथमच राबविला. त्यातून निर्माण होणारी ८ मेगावॅट वीज कारखान्याच्या प्रकल्पाकरिता वापरुन १.५ मेगावॅट वीज महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळास पुरविली जात आहे. कारखान्याच्या क्षेत्रांत त्यांनी कागद व आसवनी प्रकल्पही उभे केले आहेत.

दररोज ३०,००० लिटर इतकी इथेनॉलची निर्मिती केली जाते. सुमारे ३२ हजार टन कंपोस्ट खत दरवर्षी निर्माण होते. गेल्या काही वर्षात हरितगृहे उभारुन फुलांची शेती व निर्यात केली जाते.

सहकारी साखर कारखान्याने आपल्या परिसरातील जनतेच्या विविध क्षेत्रातील गरजा भागविल्या पाहिजेत या हेतूने श्री. आप्पासाहेब पाटील यांच्या नेतृत्वाखाली कारखान्याच्या कार्यक्षेत्रावर एक औद्योगिक प्रशिक्षण केंद्र, ५० खाटांचे अद्ययावत् आरोग्य केंद्र व पॉलिटेक्निक कॉलेज यांची स्थापना करण्यात आलेली आहे. तसेच दैनंदिन गरजेच्या वस्तू माफक दराने उपलब्ध करुन देण्याकरिता १९८२ मध्ये श्रीदत्त शेतकरी सहकारी ग्राहक संस्था स्थापन केलेली आहे. कारखान्याला पुरेसा ऊस कायम स्वरुपी मिळत रहावा या दृष्टीने एकूण २० पाणी पुरवठा योजना कार्यान्वित करुन सुमारे ४० हजार एकर जमीन पाण्याखाली आणून ऊस लागवडीखाली उपलब्ध केलेली आहे. सहकारी साखर कारखाना हा परिसरातील जनतेसाठी सर्वांगीण विकासाचे केंद्र कसे होऊ शकतो याचा एक आदर्श या कारखान्याने निर्माण केलेला आहे. या कारखान्यास उत्कृष्ट तांत्रिक कार्यक्षमतेकरिता अनेक पुरस्कार मिळालेले आहेत. नुकतेच व्यवस्थापनाच्या गुणवत्तेसाठी आयएसओ ९००१-२००८ हे मानांकनही कारखान्याला मिळालेले आहे.

शेतीविषयक तंत्रज्ञान व सहकारी चळवळ यांच्या अभ्यासाकरिता श्री. आप्पासाहेब पाटील यांनी १९६३ पासून इस्त्राईल, क्युबा, ब्राझील, चीन, जपान, कोरिया, युरोपीय देश व अमेरिका या देशांचे दौरे केलेले आहेत. त्यांच्या संस्थांप्रमाणेच त्यांना व्यक्तिगत असे कित्येक महत्त्वाचे पुरस्कार मिळालेले आहेत.

शेतीच्या व्यवसायात आधुनिक तंत्रज्ञान व उत्तम व्यवस्थापन यांचा अवलंब झाला पाहिजे असा त्यांचा आग्रह राहिलेला आहे. मा. यशवंतराव चव्हाण यांची महाराष्ट्राच्या शेती विषयक समस्यांचा अभ्यास करुन शेतीमध्ये शास्त्रीय दृष्टिकोन आणण्यावर भर दिला होता व शेतीच्या व्यवसायाला उद्योगाची जोड देणे आणि याकरिता सहकारी चळवळीचे माध्यम वापरणे या धोरणाचा पुरस्कार केला होता. या कृषि उद्योग प्रधान अर्थरचनेचे जे चित्र मा. यशवंतरावांनी महाराष्ट्राच्या जनतेसमोर ठेवले होते त्यात आदर्शवत् ठरेल असे कार्य श्री. आप्पासाहेब पाटील यांनी श्रीदत्त शेतकरी सहकारी साखर कारखाना व त्या आधारे उभ्या केलेल्या इतर संस्था यांच्या रुपाने निर्माण केलेले आहे. त्यांच्या या असाधारण कर्तृत्वाचा सन्मान करण्यासाठी यशवंतराव चव्हाण कृषि-औद्योगिक समाजरचना राज्यस्तरीय पारितोषिक २०१० आज दिनांक २५.११.२०१० रोजी मा. यशवंतरावांच्या पुण्यतिथि दिनी प्रदान करताना यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईला विशेष आनंद होत आहे.

**मुंबई**
**दिनांक: २५ नोव्हेंबर, २०१०**

**शरद पवार**
**अध्यक्ष,**
**यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई.**

# नवमहाराष्ट्र युवा अभियान
# कार्यवृत्त

नवमहाराष्ट्र युवा अभियानाचे काम संयोजक दत्ता बाळसराफ, सहसंयोजक विश्वास ठाकूर, समन्वयक विजय कान्हेकर, सहसमन्वयक वैशाली मोटे व संघटक निलेश राऊत हे पाहतात. तर कार्यालयीन संघटक म्हणून सुरेश पाटील व मिनल सावंत सहाय्यक म्हणून काम पाहतात.

**विशेष पोलीस महानिरीक्षक सुरेख खोपडे यांचे 'देशाची सुरक्षितता आणि तरुणांची भूमिका' या विषयावर व्याख्यानमाला**

**बदलापूर**-देशाची सुरक्षितता आणि तरुणांची भूमिका या विषयावर विशेष पोलीस महानिरीक्षक मा. सुरेश खोपडे यांची व्याख्यानमाला विविध जिल्ह्यांमध्ये आयोजित करण्यात आली होती. निसर्ग ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार, दि. ७ फेब्रुवारी २०१० रोजी पाटील मंगल कार्यालय, बदलापूर येथे सुरेश खोपडे यांचे व्याख्यान व प्रकट मुलाखतीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी श्रीधर पाटील, ऋतुराज जोशी यांची प्रमुख उपस्थिती होती.

**सोलापूर**-हिरानंद नेमिचंद वाचनालय, सोलापूर येथे जिल्हा श्रमिक पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पोलीस आयुक्त भूषणकुमार उपाध्याय, उपायुक्त श्याम देगावकर, नवमहाराष्ट्र युवा अभियानाचे सोलापूर विभागीय केंद्राचे संघटक दिनेश शिंदे, मोहल्ला कमिटीचे सदस्य, महाविद्यालयीन विद्यार्थी उपस्थित होते.

**नागपूर**-श्रमिक पत्रकार संघ, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने व्याख्यान श्रमिक पत्रकार संघाच्या सभागृहात आयोजित करण्यात आले होते. यावेळी सलील देशमुख, संजय लोखंडे, श्रेयस बोडकर यांची प्रमुख उपस्थिती होती. सुमारे दोनशे महाविद्यालयीन विद्यार्थी उपस्थित होते.

**महाराष्ट्र राज्य युवा धोरणासंदर्भात शासकीय समिती गठित**

नवमहाराष्ट्र युवा अभियानातर्फे दि. १२ जानेवारी २०१० रोजी राज्य शासनास युवा धोरणाचा अंतिम मसुदा सादर करण्यात आला. त्यानंतर दि. २० फेब्रुवारी २०१० रोजी महाराष्ट्र राज्य युवा धोरणासंदर्भात शासकीय समिती गठित करण्यात आली आहे. या शासकीय समितीची पहिली बैठक दि. ३० एप्रिल २०१० रोजी राज्याचे मुख्यमंत्री मा. ना. अशोकराव चव्हाण यांच्या वर्षा या शासकीय निवासस्थानी संपन्न झाली. यावेळी क्रीडा व युवक कल्याण मंत्री मा. ना. डॉ. सुरेश शेट्टी, क्रीडा व शालेय शिक्षण विभागाचे सचिव मा. डॉ. संजयकुमार, संचालक मा. वसंतराव वैद्य यांची प्रमुख उपस्थिती होती. या समितीमध्ये अभियानाच्या बारा प्रतिनिधींची निवड करण्यात आलेली आहे. त्यामध्ये विश्वास ठाकूर, दत्ता बाळसराफ, नीलेश राऊत, नीलेश पुराडकर, मॅथ्यू मट्टम, महेंद्र रोकडे, कौस्तुभ देवळे, उमाकांत जगदाळे, डॉ. अमित नागरे, अभिजीत खानविलकर, डॉ. सचिन जाधव, नितीन काळेल यांचा समावेश आहे.

पहिल्या बैठकीमध्ये नवमहाराष्ट्र युवा अभियानातर्फे विश्वास ठाकूर, दत्ता बाळसराफ, नीलेश राऊत, नीलेश पुराडकर यांनी सूचना मांडल्या. शासनातर्फे तयार करण्यात आलेल्या टिप्पणीमध्ये यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई-नवमहाराष्ट्र युवा अभियानाचा विशेष उल्लेख करण्यात आलेला आहे.

राज्य युवा धोरणासंदर्भात विषयवार उपसमित्या गठित करण्यात आलेल्या आहेत. अभियानाचे सहसंयोजक मा. विश्वास ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली कला, संस्कृती व मनोरंजन उपसमिती, आमदार प्रणिती शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली आरोग्य व सामाजिक क्षेत्र उपसमिती, मा. देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली शिक्षण, प्रशिक्षण व रोजगार उपसमिती, मा. आशिष कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली आदिवासी, अल्पसंख्यक, मागासवर्गीय व कृतिआराखडा उपसमिती, मा. डॉ. व्यंकटेश कुमार यांच्या अध्यक्षतेखाली विज्ञान आणि तंत्रज्ञान उपसमिती गठित करण्यात आलेली आहे.

**यशवंत युवा फेलोशिप**

सामाजिक बदलांची धुरा सांभाळणाऱ्या युवांना अधिक सक्षम करण्यासाठी पुरेसे ज्ञान, आर्थिक पाठबळ व योग्य मार्गदर्शनाची आवश्यकता ओळखून यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान

अंतर्गत नवमहाराष्ट्र युवा अभियानाने यशवंत युवा फेलोशिप योजना सुरू केलेली आहे. या वर्षीपासून सुरू करण्यात आलेली यशवंत युवा फेलोशिप श्रेया भानप (कोकण)-जैवविविधता, मोहन म्हसकर (पश्चिम महाराष्ट्र) समन्यायी पाणीवाटप, शिवाजी गावंडे (मराठवाडा) - रोजगार हमी योजना, लालसू नागोटी (विदर्भ)-आदिवासी वन हक्क कायदा या विषयांवर कार्य व अभ्यासासाठी जाहीर करण्यात आली. महाराष्ट्रामध्ये रचनात्मक कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांना आर्थिक पाठबळ व प्रोत्साहन मिळावे याकरिता महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या ५० व्या वर्षानिमित्त ही फेलोशिप सुरू करण्यात आली आहे. फेलोशिपचा कालावधी किमान एक व कमाल दोन वर्षे राहणार आहे.

**महाराष्ट्र राज्य ग्रामीण रोजगार हमी योजना समन्वय उपक्रम**

नवमहाराष्ट्र युवा अभियानाच्या पाच कलमी उपक्रमांतर्गत महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेमध्ये समन्वय साधून महाराष्ट्रातील ठरावीक गावांमध्ये जलसंधारणाचे प्रयोग हाती घेण्याचे ठरलेले आहे. त्यापैकी काही गावांमध्ये या उपक्रमाला सुरुवात करण्यात आलेली आहे. महाराष्ट्र राज्य ग्रामीण रोजगार हमी योजना समन्वयक उपक्रमाचे राज्य समन्वयक म्हणून मा. शिवाजी गावंडे हे कार्य पाहत आहेत. या उपक्रमांतर्गत महालिंगी (ता. कळमनुरी, जि. हिंगोली) गावात रोजगार हमी योजना समन्वयाचे कार्य वेगाने हाती घेण्यात आलेले असून तेथे रोजगार हमी योजनेअंतर्गत जलसंधारणाचे कार्य सुरू आहे.

**युवा धोरण: एसएमएसद्वारे प्रसार**

नवमहाराष्ट्र युवा अभियानातर्फे राबविण्यात आलेल्या राज्य युवा धोरण उपक्रमानंतर या संदर्भात प्रसार करण्याकरिता एक लाख एसएमएसचे सॉफ्टवेअर PAYPAL COMPANY कडून खरेदी करण्यात आले. या सॉफ्टवेअरद्वारे UTHPOLCY या सेंडरनेम अंतर्गत युवा धोरणासंदर्भात सुमारे एक लाख एसएमएसद्वारे महाराष्ट्रातील युवा व युवा विकासात्मक कार्य करणाऱ्या संस्था व स्वंसेवकांपर्यंत प्रसार करण्यात आला. नुकतेच या सॉफ्टवेअरचे नूतनीकरण करण्यात आलेले आहे.

**मराठीतील आदर्श युथ पोर्टल**

नवमहाराष्ट्र युवा अभियानाची www.navmaharashtra.org वेबसाइट ब्लॉग स्वरूपात मागील दीड वर्षापासून कार्यान्वित आहे. याद्वारे नवमहाराष्ट्र युवा अभियानाच्या विविध उपक्रमांची माहिती, नोकऱ्या, कॅम्पस इंटरव्ह्यू, शासकीय योजना यांची माहिती देण्यात येते.

**युवा अभिसरण मोहीम**

अभियानाच्या निमंत्रक मा. सुप्रिया सुळे यांच्या संकल्पनेतून दि. ९ ते १७ मे २०१० दरम्यान युवा अभिसरण मोहिमेचे आयोजन करण्यात आले होते. मराठवाड्यातील युवानां पश्चिम महाराष्ट्रातील सांस्कृतिक, राजकीय, साहित्यिक, धार्मिक, ऐतिहासिक, भौगोलिक, औद्योगिक वैविध्यांची ओळख होण्यासाठी तसेच त्या विभागामधील युवांसोबत संवाद होण्यासाठी, पश्चिम महाराष्ट्राचा विकास ज्या कारणांमुळे झाला. त्या बाबींचा अभ्यास करण्याकरिता या अभिसरण मोहिमेचे आयोजन करण्यात आलेले होते. मोहिमेच्या पहिल्या दिवशी दि. ९ मे रोजी औरंगाबाद येथे आज आयोजित एकदिवसीय कार्यशाळेमध्ये एकमेकांची ओळख, अभिसरण मोहिमेची संकल्पना, सामूहिक खेळ व गाणे, गटचर्चा यांचे आयोजन करण्यात आले होते. दुपारच्या सत्रात पत्रकार दिलीप वाघमारे यांच्या मराठवाडा: काल, आज आणि उद्या या विषयावरील व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. मराठवाड्याचा इतिहास, सांस्कृतिक व साहित्यिक वैभवाचे पैलू, भौगोलिक व नैसर्गिक पर्यावरण, येथील मानसिकता व जीवनशैलीची ढब, मागासलेपणाची बीजे व औद्योगिकीकरणाची मरूस्थळे यासंबंधी दिलीप वाघमारे यांनी साधलेला मुक्तसंवाद युवक-युवतींना नव्याने मराठवाड्याची ओळख करून देणारा ठरला. यानंतर रात्री युवांचा गट पुण्याकडे रवाना झाला.

मोहिमेच्या दुसऱ्या दिवशी दि. १० मे रोजी गुलटेकडी, येथील निसर्ग कार्यालय येथे पश्चिम महाराष्ट्राच्या अभ्यासभेटीसाठी आलेल्या मराठवाड्यातील ५० युवक-युवतींना मा. सुप्रिया सुळे यांनी शुभेच्छा दिल्या. यावेळी मोहिमेत सहभागी युवांशी सामाजिक जाणिवा, सामाजिक समस्या, पर्यावरण, भ्रष्टाचार आणि यांवरील उपाय यांबाबत सुळे यांनी उपस्थित युवांशी मनमोकळा संवाद साधला. यावेळी संयोजक दत्ता बाळसराफ, संघटक नीलेश राऊत, मुंबई संघटक उमाकांत जगदाळे, सोलापूर संघटक दिनेश शिंदे, पुणे संघटक अमेय जगताप, औरंगाबाद संघटक सुबोध जाधव, सहसंघटक निशांत वाघमारे, विशाल भोसले, डॉ. अमित नागरे, डॉ. सचिन जाधव यांची उपस्थिती होती.

दत्ता बाळसराफ यांनी युवा अभिसरण मोहीम २०१० या उपक्रमागील भूमिका विशद केली. यावेळी त्यांनी युवा अभिसरण कशासाठी आणि या मोहिमेमध्ये सहभागार्थी युवांकडून काय अपेक्षित आहे, यासंबंधी विवेचन केले. तत्पूर्वी युवांना काही प्रेरणात्मक चित्रफिती दाखविण्यात आल्या.

सायंकाळच्या सत्रानंतर ४-५ युवांचे एकूण ११ गटात विभाजन करण्यात आले. पुणे, सोलापूर, सातारा, कोल्हापूर या चार जिल्ह्यांतील प्रत्येकी ३ तालुक्यांमध्ये उपरोक्त गट रवाना झाले.

पुढील सहा दिवस प्रत्येक गटाने नियोजित जिल्ह्यातील तालुक्यांमधील वास्तव्यात स्थानिक मान्यवर व्यक्ती, संस्था, संघटना, पर्यटन, स्थळ, प्रगत शेती, औद्योगिक संस्था, सामाजिक जीवन, भौगोलिक रचना, खाद्य संस्कृती, राजकारण इ. बाबींचा अभ्यास केला.

दि. १६ मे २०१० रोजी रात्रीपर्यंत सर्व गट पुन्हा एकदा पुण्याला निसर्ग कार्यालयाला पोहचले. दि. १७ मे २०१० रोजी विशेष समारंभात सर्व सहभागी युवांनी सहा दिवसांमधील पश्चिम महाराष्ट्रातील विविध तालुक्यांमध्ये अनुभवलेली निरीक्षणे नोंदविली. या निरीक्षणांवर आधारित सादरीकरणही त्यांनी केले. त्यांना ठरवून दिलेल्या तालुक्यांवर आधारित सादरीकरण करण्याकरिता त्यांना स्टॉल्स उपलब्ध करून देण्यात आले होते. सर्वच गटांनी नावीन्यपूर्ण पध्दतीने आपापले स्टॉल्स सजवून माहितीचे, अनुभवांचे, निरीक्षणांचे सादरीकरण केले. यावेळी अभियानाच्या निमंत्रक मा. सुप्रिया सुळे यांनी सहभागी युवांशी संवाद साधला. त्यांची निरीक्षणे व अनुभव जाणून घेतले.

सोलापुरात कमी पावसाच्या परिसरात उभ्या राहिलेल्या डाळिंबाच्या बागा, साताऱ्यातील निढळ गावाने टाकलेली पावले, वेगवेगळे साखर कारखाने, भीमा-सीना जोड प्रकल्प, एमबीए-आयआयटी उत्तीर्ण झालेले तरुणांनी पुढाकार घेऊन त्यांनी गावातील शाळेच्या वाढविलेल्या गुणवत्तेचे अनोखे दर्शन, दिवस-दिवस सोसाव्या लागणाऱ्या भारनियमनाच्या पार्श्वभूमीवर एका गावात मोटारीच्या जुन्या इंजिनाचा वापर करुन केलेल्या वीजपुरवठ्याचा अनुभव असे अनेक निरीक्षणे सहभागी युवांनी नोंदविले आणि असे बदल व प्रयत्न आपापल्या विभागातही करण्याचा मानस यावेळी युवांनी व्यक्त केला. मराठवाड्यातील ४५ युवांनी अभिसरण मोहिमेंतर्गत पश्चिम महाराष्ट्र नव्याने जाणला आणि त्या मोहिमेमधून सर्वच सहभागी युवा भारावून गेले. दि. १७ मे रोजी रात्री सर्व गट आपापल्या गावांकडे रवाना झाले.

**व्हिजन करिअर फेअर व व्याख्यानमाला**

**कोल्हापूर:** ना. हसन मुश्रीफ फौंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने कोल्हापूर शहरात दि. २१ ते २३ मे दरम्यान ए टू झेड व्हिजन करिअर फेअर व करिअर व्याख्यानमाला २०१० चे आयोजन करण्यात आले होते. सासने ग्राउंड, न्यू शाहूपुरी येथे झालेल्या या प्रदर्शनाचे उद्घाटन शुक्रवार, दि. २१ मे रोजी सायंकाळी ज्येष्ठ नेते मा. आ. मधुकरराव पिचड यांच्या हस्ते झाले. प्रदर्शनाचे स्वागताध्यक्ष कामगार मंत्री ना. हसन मुश्रीफ होते. उद्घाटन कार्यक्रमासाठी प्रसिद्ध मराठी अभिनेता अंकुश चौधरी, आमदार उदय सामंत, आमदार के. पी. पाटील, संभाजीराजे छत्रपती, युवा नेते महेश तपासे, जि. प. उपाध्यक्ष धैर्यशील माने, जि. प. सदस्य संग्रामसिंह कुपेकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बोलताना मा. मधुकरराव पिचड म्हणाले की, राज्याला युवा धोरण जाहीर करण्यासाठी युवांनी पुढे यावयास हवे. नव्या काळात युवांच्या हाताला व बुद्धीला काम दिले गेले पाहिजे. युवकांनी तोडफोड करण्यापेक्षा देश घडविणाऱ्या विधायक उपक्रमांना प्राधान्य द्यावे. जागतिक परिस्थिती बदलत असताना बुद्धी हे भांडवल ठरत आहे. ही बाब विचारात घेऊन नवनवीन तंत्रज्ञान व प्रशिक्षण यांची युवांना ओळख करुन देणे महत्त्वाचे बनले आहे. मा. ना. हसन मुश्रीफ यांनी कार्यक्रमासाठी शुभेच्छा दिल्या. आमदार उदय सामंत यांनी, विघातकतेकडे वळणारी युवांची पावले विधायकतेकडे वळविण्याचा प्रयत्न केल्याबद्दल संयोजकांचे कौतुक केले. अभिनेता अंकुश चौधरी यांनी पाल्यांबरोबरच पालकांनाही मार्गदर्शन करणारे हे प्रदर्शन असून त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले. संभाजीराजे छत्रपती, महेश तपासे यांनी मनोगते व्यक्त केली.

सुरुवातीला नवीन मुश्रीफ यांनी मान्यवरांचे स्वागत केले. आदिल फरास यांनी प्रास्ताविक केले. नवमहाराष्ट्र युवा अभियानाचे राज्य संघटक नीलेश राऊत यांनी भूमिका मांडली. विभागीय संघटक अभिषेक भोंडवे यांनी आभार मानले.

व्हिजन करिअर फेअरमध्ये भारतीय भूदल, सिंहगड इन्स्टिट्यूट, भुजबळ नॉलेज सिटी, महात्मा गांधी मिशन (एमजीएम), जिल्हा उद्योग केंद्राच्या वतीने औद्योगिक माहितीचे स्टॉल्स प्रदर्शनामध्ये सहभागी होते.

**चिपळूण:** प्रेरणा प्रतिष्ठान, चिपळूण यांच्या संयुक्त विद्यमाने चिपळूण येथे दि. २४ ते २६ मे २०१० दरम्यान व्हिजन करिअर फेअर व व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते. व्हिजन करिअर फेअरचे उद्घाटन क्रीडा व युवक कल्याण राज्यमंत्री मा. ना. भास्कर जाधव यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विजय मेहता होते. यावेळी प्रसिद्ध निवेदक सुधीर गाडगीळ, माजी आमदार नाना जोशी, माजी आमदार रमेश कदम, युगंधरा राजेशिर्के, शेखर निकम, नगराध्यक्ष अजमल पटेल, बदलापूरचे उपनगराध्यक्ष श्रीधर पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बोलताना मा. ना. भास्कर जाधव म्हणाले की, नवमहाराष्ट्र युवा अभियानातर्फे करण्यात आलेल्या पाठपुराव्यानंतर महाराष्ट्र राज्य युवा धोरण निश्चित करण्यासाठी शासकीय समिती गठित करण्यात आलेली आहे आणि महिनाभरात सरकारकडून युवा धोरण जाहीर करण्यात येईल.

सुधीर गाडगीळ यांनी उपस्थित पालक व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना म्हटले की, आपली आवड, अभ्यासक्रमाची निवड आणि समाजातील निकड यांची सांगड घालून करिअर करणे ही काळाजी गरज बनली आहे. दररोजच्या जीवनात नव्याने निर्माण होणाऱ्या गरजा आणि त्या गरजांचे करिअरमध्ये रूपांतर करण्याची कला अवगत करायला हवी. करिअरसाठी कुठले क्षेत्र निवडायचे याबाबत स्पष्टता, बदलांना सामोरे जाण्याची लवचिकता व संयम असेल तर यशप्राप्ती होते. असे प्रतिपादन त्यांनी केले.

अध्यक्षीय समारोप करताना डॉ. विजय मेहता म्हणाले की, सध्याच्या युगात ज्ञान व कौशल्य यांना अतिशय महत्त्व प्राप्त झालेले आहे. कुठलेही ध्येय ठरविताना ते प्राप्त करण्यासाठी टप्पे आखून घ्यावेत आणि पालकांनीही आपल्या पाल्यांच्या आवडीनुसार त्यांना करिअर निवडण्यास मदत करावी.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक अभिजित खानविलकर यांनी केले. नीलेश राऊत यांनी भूमिका विशद केली. प्रेरणा प्रतिष्ठानचे अध्यक्ष संदीप लवेकर यांनी आभार मानले. सूत्रसंचालन अभिजित विटोरे यांनी केले.

व्हिजन करिअर फेअरमध्ये भारतीय भूदल, सिंहगड इन्स्टिट्यूट, भुजबळ नॉलेज सिटी, महात्मा गांधी मिशन (एमजीएम), जिल्हा उद्योग केंद्राच्या वतीने औद्योगिक माहितीचे स्टॉल्स आणि आरटीओतर्फे लर्निंग लायसन्स कॅम्प यांसह अनेक नामांकित शैक्षणिक संस्थांचे स्टॉल्स प्रदर्शनामध्ये सहभागी होते.

**बदलापूर:** ज्ञानप्रभा शिक्षण मंडळ व ग्रंथसखा वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने बदलापूर येथे दि. ११ ते १३ जून २०१० दरम्यान व्हिजन करिअर फेअर व व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात 'आले होत. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आमदार किसन कथोरे उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून सिनेअभिनेता मा. सुबोध भावे, नाट्य व सिनेदिग्दर्शक मा. चंद्रकांत कुलकर्णी यांची उपस्थिती होती.

किसन कथोरे म्हणाले की, केंद्र व राज्य शासनाच्या माध्यमातून बदलापूरमध्ये आता शैक्षणिक हब निर्माण करण्यात येणार आहे. हे व्हिजन करिअर फेअर म्हणजे बदलापुरातील शैक्षणिक परिवर्तनाची नांदी आहे. येथील विद्यार्थ्यांना आता शैक्षणिक व करिअरच्या संधी शोधण्यासाठी बाहेर जावे लागणार नाही.

यावेळी प्रमुख पाहुणे मा. सुबोध भावे यांनी सांगितले की, करिअरच्या वाटा अनेक आहेत. मात्र स्वत:ला जे आवडते त्यातच करिअर करणे योग्य ठरते. त्यांनी स्वत:च्या जीवनातील चढउतार सांगून युवांशी संवाद साधला. मा. चंद्रकांत कुलकर्णी म्हणाले की, परिस्थितीवर मात करीत करिअर करण्यासाठी निघालेल्या विद्यार्थ्यांना प्रथम आपले आई-वडील, शिक्षक, मित्र यांचा मोलाचा सल्ला घेऊनच निर्णय घ्यावा.

यावेळी मंचावर संयोजक मा. दत्ता बाळसराफ, संघटक नीलेश राऊत, आदर्श विद्या प्रसारक संस्थेचे अध्यक्ष मा. जनार्दन घोरपडे, बदलापूरचे उपनगराध्यक्ष मा. श्रीधर पाटील, मा. मसूद कोहारी उपस्थित होते.

**सांगली:** सांगली-मिरज-कुपवाड महानगरपालिका व रिसोर्सेस यांच्या संयुक्त विद्यमाने सांगली येथे दि. १८ ते २० जून २०१० दरम्यान व्हिजन करिअर फेअर व व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते. व्हिजन करिअर फेअरचे उद्घाटन सिनेअभिनेत्री मा. माधवी कुलकर्णी यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. सुरेश पाटील होते. मा. जयंत पाटील, मा. श्रीनिवास पाटील, मा. सुरेश आवटी हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

भारतीय भूदल, नौदल व वायुदल, सिंहगड इन्स्टिट्यूट, भुजबळ नॉलेज सिटी, महात्मा गांधी मिशन (एमजीएम) यांसह सुमारे ५० नामांकित शैक्षणिक संस्थांचे स्टॉल्स या ठिकाणी

प्रदर्शनामध्ये सहभागी झाले होते.

**ठाणे:** समन्वय रोजगार सेल यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २८ ते ३० जून २०१० दरम्यान ठाणे येथे व्हिजन करिअर फेअर २०१० चे आयोजन करण्यात आलेले होते. या व्हिजनचे उद्घाटन मा. खा. संजीव नाईक यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विधान परिषदेचे उपसभापती मा. वसंत डावखरे होत. प्रसिद्ध मराठी अभिनेते मकरंद अनासपुरे, मा. आ. सुभाष भोईर, जितेंद्र जोशी प्रमुख अतिथी होते. यावेळी मा. खा. संजीव नाईक, माजी महापौर मा. अशोक राऊळ व समन्वय रोजगार सेलचे मा. निरंजन डावखरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी मा. खा. संजीव नाईक म्हणाले की, करिअरच्या वेगळ्या वाटा निवडताना योग्य मार्गदर्शनबरोबरच विद्यार्थ्यांनी वेळेच्या नियोजनाकडेही कटाक्षाने लक्ष देणे आवश्यक आहे. तरच वेगळ्या वाटेने करिअर निवडताना यशप्राप्ती होऊ शकते. प्रसिद्ध अभिनेते मकरंद अनासपुरे यांनी स्वत:चे अनुभव व्यक्त करताना विद्यार्थी व पालकांना मार्गदर्शन केले. ते म्हणाले की, मी मराठवाड्यातील बीडसारख्या मागास समजल्या जाणाऱ्या जिल्ह्यातून आलेलो असलो आहे. तथापि, नाट्य क्षेत्राबदल माझ्या मनात असलेली निष्ठा व प्रचंड आवड यांच्या बळावरच मी आज वेगळी ओळख निर्माण करू शकलो. विद्यार्थ्यांनीही आपल्या आवडीच्या क्षेत्रामध्ये करिअर करताना निष्ठा बाळगणे गरजेचे आहे.

अध्यक्षीय समारोप करताना मा. वसंत डावखरे म्हणाले की, कुठलेही करिअर करावयाचे असेल तर त्यासाठी योग्य मार्गदर्शक लाभणे ही अतिशय महत्त्वाची पायरी ठरते. मला माझ्या राजकीय वाटचालीमध्ये योग्य मार्गदर्शक लाभले आणि मी आज या क्षेत्रात करिअर करू शकलो.

सूत्रसंचालन अभिजीत चव्हाण यांनी केले. निरंजन डावखरे यांनी उपस्थितांचे आभार मानले. या व्हिजन करिअर फेअरमध्ये २२ विविध शैक्षणिक संस्थांचे स्टॉल्स सहभागी झाले होते.

**युवा धोरण परिषद, सोलापूर**

दि. ३० जून २०१० रोजी सोलापूर येथे युवा धोरण परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. परिषदेचे उद्घाटन युवा नेते मा. महेश गादेकर यांनी केले. यावेळी श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष प्रशांत जोशी, दिनेश शिंदे, डॉ. अमित नागरे यांची प्रमुख उपस्थिती होती. शिक्षणाचा दर्जा, पर्यावरण, युवांमधील वाढती गुन्हेगारी, शिक्षणातील त्रुटी, युवांचा सामाजिक-राजकीय क्षेत्रातील सहभाग, युवतींचे सक्षमीकरण अशा विविध विषयांवर युवांनी परिषदेमध्ये ठाम मते मांडली. दिनेश शिंदे यांनी आभार मानले.

**पर्यावरण शिक्षण शिबिर**

दि. २३ ते २५ जुलै २०१० दरम्यान नाशिक विभागीय केंद्राच्या सभागृहात तीनदिवसीय निवासी पर्यावरण शिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. अभियानाच्या कार्यकर्त्यांमध्ये पर्यावरणविषयक जाणीवजागृती व्हावी, पर्यावरण संवर्धन कार्यामध्ये युवांचा सहभाग वाढावा हा या शिबिराचा उद्देश होता. पार्थ बापट व दिप्ती बापट हे प्रमुख मार्गदर्शक होते.

या शिबिरामध्ये सुमारे ४० कार्यकर्त्यांनी सहभाग नोंदविला.

**युवा स्वातंत्र्यज्योत रॅली**

दि. १४ ऑगस्ट रोजी महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमध्ये युवा स्वातंत्र्यज्योत रॅलीचे आयोजन करण्यात आले. युवांमध्ये राष्ट्रभावनेची जाणीव अधिक दृढमूल व्हावी, या हेतूने ही रॅली आयोजित करण्यात येते. मुंबई, नवी मुंबई, नागपूर, औरंगाबाद, लातूर, उस्मानाबाद, सोलापूर, चिपळूण, लांजा (जि. रत्नागिरी), यवतमाळ, अहमदनगर, बदलापूर अशा एकूण बारा शहरांमधून एका वेळी दि. १४ ऑगस्ट २०१० रोजी मध्यरात्री युवा स्वातंत्र्यज्योत रॅली काढण्यात आली. उपरोक्त सर्व शहरांच्या मध्यवर्ती भागातून काढण्यात आलेल्या या रॅलीला शहरातील मान्यवरांना निमंत्रित करण्यात आलेले होते. भारत माता की जय, जय हिंद, वंदे मातरम अशा घोषणा देत स्थानिक युवांचा मोठा प्रतिसाद सर्वच ठिकाणी लाभला.

**युवा परिसंवाद, नाशिक**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई-विभागीय केंद्र, नाशिकतर्फे दि. १४ ऑगस्ट २०१० रोजी युवा परिसंवादाचे आयोजन करण्यात आलेले होते. एचपीटी महाविद्यालय व विश्वास ज्ञानप्रबोधिनी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या परिसंवादासाठी महाराष्ट्रातील प्रसारमाध्यमे आणि प्रसारमाध्यमांतील महाराष्ट्र या विषयावर आयबीएन-लोकमतच्या नाशिक ब्युरो चीफ मा. दीप्ती राऊत यांनी विचार मांडले. कार्यक्रमाचे उद्घाटन एचपीटी महाविद्यालयाचे प्राचार्य मा. सूर्यवंशी यांनी केले. यावेळी मा. वृंदा भार्गवे, मा. दीपाली मानकर, मा. डॉ. अमित नागरे यांची उपस्थिती होती. यावेळी मा. दीप्ती राऊत यांनी म्हणाल्या की, इंग्रजी आणि इतर भाषिक वर्तमानपत्रांमध्ये महिला संपादक संपादनाची जबाबदारी

यशस्वीरीत्या पार पाडत असताना मराठी वर्तमानपत्रांमध्ये मात्र एकही महिला संपादक दिसत नाही. ही बाब महाराष्ट्राच्या दृष्टीने शोकांतिका असल्याचे त्यांनी नमूद केले. डॉ. अमित नागरे यांनी परिसंवादामागील भूमिका विशद केली.

**युनिकोड वर्कशॉप**

मराठी अभ्यास केंद्र मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने औरंगाबाद येथे शुक्रवार, दि. २७ ऑगस्ट २०१० रोजी एम. जी. एम. वृत्तपत्रविद्या व जनसंवाद महाविद्यालय आणि देवगिरी महाविद्यालयात युनिकोड प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

दि. २८ ऑगस्ट २०१० रोजी नाशिक येथे दोन युनिकोड प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्यात आल्या होत्या.

**युवती मेळावा, बदलापूर**

कोरो-मुंबई व आदर्श महाविद्यायाच्या संयुक्त विद्यमाने दि. २७ व २८ ऑगस्ट २०१० दरम्यान बदलापूर येथे युवती मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. मेळाव्याचे उद्घाटन सारेगमप फेम गायिका मा. ऊर्मीला धनगर व स्वागताध्यक्षा मा. स्वप्ना पाटील यांच्या हस्ते झाले. यावेळी अभियानाचे राज्य संघटक मा. नीलेश राऊत, राज्य सहसंघटक मा. मीनल जगदाळे, राज्य विशेष निमंत्रित मा. सुषमा खिल्लारे यांची उपस्थिती होती. महिला सबलीकरणाशी निगडित खेळांना युवतींनी उदंड प्रतिसाद दिला. मेळाव्यात एकूण ११ क्रीडाप्रकारांचे स्टॉल्स उभारण्यात आलेले होते. भिवंडीच्या सहायक पोलीस उपायुक्त मा. रश्मी करंदीकर, सेवासदन कॉलेज ऑफ फॅशन डिझायनिंगच्या प्राचार्या मा. नीना भोळे, लेखक मा. अनुपम बेहेरे यांचे परिसंवाद संपन्न झाले. मेळाव्यामध्ये सुमारे हजार युवतींनी सहभाग नोंदविला. मुंबईतील अक्षरा संस्थेचे सहकार्य यासाठी लाभले.

**विद्यार्थी व पालक कार्यशाळा-बदलापूर**

अक्षरसंवेदन साहित्य-संस्कृती मंच आणि महिला मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने बदलापूर येथे इयत्ता नववी व दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी व पालकांसाठी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आलेले होते. अध्यक्षस्थानी योगेंद्र जावडेकर होते. प्रमुख वक्ते म्हणून नीलिमा सहस्त्रबुद्धे उपस्थित होत्या. मान्यवरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

संघटनात्मक फेरबदल

नवमहाराष्ट्र युवा अभियानांतर्गत अलीकडेच संघटनात्मक फेरबदल करण्यात आले. यानुसार मा. वैशाली मोटे (सहमसन्वयक), मा. विजय कसबे, मा. नितीन काळेल, मा. दिनेश शिंदे, मा. शिवाजी गावंडे, मा. सचिन जाधव, मा. सुबोध जाधव (सर्व राज्य समन्वयक), मा. डॉ. अमित नागरे, मा. उमाकांत जगदाळे, मा. नीलेश पुराडकर, मा. मीनल जगदाळे (राज्य सहसंघटक) यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

**नवमहाराष्ट्र युवा अभियानातर्फे आयोजित आगामी उपक्रम:**

**आगामी उपक्रम:**

- युवा अभिसरण मोहीम
  (कोकण ते मराठवाडा-१० ते १८ नोव्हेंबर २०१०)
  (मराठवाडा ते कोकण -२२ ते ३० नोव्हेंबर २०१०)
- यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय युवा आणि क्रीडा पुरस्कार सोहळा (सोलापुर-दि. १२ जानेवारी २०११)
- यशवंत युवा फेलोशिप २०११
- व्हिजन करिअर फेअर शैक्षणिक प्रदर्शन व व्याख्यानमाला २०११ (राज्यातील २५ शहरांमध्ये)
- युवती मेळावे

* * *

# अपंग हक्क विकास मंच
# कार्यवृत्त

अपंगांचे विविध प्रश्न संवाद व समन्वयाच्या भूमिकेतून सोडविण्यासाठी अपंग हक्क विकास मंचाची निर्मिती झाली आहे. मंचाच्या संयोजक मा. सुप्रिया सुळे असून समन्वयक विजय कान्हेकर व दत्ता बाळसराफ तसेच संघटक अभिजित राऊत आणि कार्यालयीन संघटक म्हणून शमीम खान हे काम पाहतात.

**कृत्रिम अवयव तपासणी शिबिर**

**दि. २३ मार्च २०१०:** सकाळी १० ते दु. २ वाजेपर्यंत उल्हासनगर जिल्हा शासकीय रुग्णालय, उल्हासनगर, जि. ठाणे येथे आरोग्य सेवा संचलनालय, उल्हासनगर जिल्हा शासकीय रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने **कृत्रिम अवयव तपासणी शिबिराचे** आयोजन करण्यात आले. या शिबिरात एकुण ४५ व्यक्तींनी (अपंग व त्यांचे मदतनीस) सहभाग नोंदविला. त्यातील एकुण ३० अपंग व्यक्तींना कृत्रिम अवयव तर एकुण ३ अपंग व्यक्तींना ट्रायसायकलसाठी निवड करण्यात आली. अपंग लाभार्थींना चहा-नाष्टा तसेच जेवणाची व्यवस्था करण्यात आली. अपंग हक्क विकास मंचाचे शंकर साळवे यांनी शिबिराचे नियोजन केले. महात्मा गांधी सेवा संघ कृत्रिम अवयव निर्माण केंद्र औरंगाबाद तर्फे तंत्रज्ञ नसीम खान आणि राजेश उज्जेनकर यांनी अपंगांची कृत्रिम अवयवसंदर्भातील तपासणी केली.

**ठाणे, दि. २६ मार्च २०१०:** सकाळी ९ ते संध्या. ५ वाजेपर्यंत मु. पो. आगरवाडी स्टेशन-सफाळे, ता. पालघर, जि. ठाणे येथे आरोग्य सेवा संचलनालय, विठ्ठल सायन्ना जिल्हा शासकीय रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने अपंग वैदयकीय व कृत्रिम अवयव तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात एकुण १६० व्यक्तींनी (अपंग व त्यांचे मदतनीस) सहभाग नोंदविला. त्यातील एकुण ४५ अपंग व्यक्तींना अपंगत्व प्रमाणपत्रासाठी तर एकुण २० अपंग व्यक्तींना कृत्रिम अवयवासाठी निवड करण्यात आली तसेच समाजकल्याण विभागाच्या ओळखपत्रासाठी एकुण ७४ अपंग व्यक्तींचे अर्ज स्वीकारण्यात आले. विठ्ठल सायन्ना जिल्हा शासकीय रुग्णालयातील मा. डॉ. साळवे यांनी अपंगत्व प्रमाणपत्रासंबंधित अपंगांची वैद्यकीय तपासणी केली. महात्मा गांधी सेवा संघ कृत्रिम अवयव निर्माण केंद्राचे तंत्रज्ञ राजेश उज्जेनकर आणि नसीम खान यांनी कृत्रिम अवयवासाठी अपंग व्यक्तींची तपासणी केली. सर्वांना सकाळी चहा, नाष्टा, दुपारी जेवण, संध्याकाळी चहाची व्यवस्था करण्यात आली. कार्यक्रमाअंती मंचाचे कार्यालयीन संघटक शमीम खान यांनी उपस्थित अपंग व्यक्तींना अपंगांचे बचतगट तर अनिल चाळके यांनी शासकीय योजना, अशा विषयांवर मार्गदर्शन केले तसेच उपस्थित सर्व अपंग व्यक्तींशी मनमोकळेपणाने चर्चा करुन त्यांच्या प्रश्नांना समाधानकारक उत्तरे दिली.

**निरामय आरोग्य विमा योजना शिबिर**

२०, २१ ऑगस्ट २०१० रोजी नागपूर येथे कोशीश फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय न्यास नुसार मतिमंद, बहुविकलांगता, सेरेब्रल पाल्सी, ऑटीझम अशा प्रकारचे अपंगत्व असलेल्या व्यक्तींना आरोग्य सेवेचा लाभ घेण्यास प्रवृत्त करणे, अपंगत्व असलेल्या व्यक्तींचे आरोग्य व जीवनमानाची गुणवत्ता वाढविणे या प्रमुख उद्देशाने केंद्र शासनाच्या निरामय आरोग्य विमा योजना शिबिराचे आयोजन करण्यात आले. १ लाख रुपये विमा योजनेसाठी हे आयोजन होते असे मंचाचे संघटक अभिजित राऊत यांनी सांगितले. शिबिरात एकुण ४७५ अपंग व्यक्तींनी सहभाग नोंदविला. शिबिरात मा. जिल्हाधिकारी प्रवीण दराडे, मा. गिरिष गांधी, मा. विजय कान्हेकर, सलील देशमुख, ज्येष्ठ पत्रकार बाळ कुळकर्णी, मुख्याध्यापिका सिस्टर जोत्सना इत्यादि मान्यवर उपस्थित होते.

**मोफत तपासणी व कृत्रिम अवयव/साधने वाटप विविध शिबिरे**

**जळगांव, दिनांक २१ ते २५ जुलै २०१०** दरम्यान जळगांव जिल्ह्यातील शासकीय संमिश्र अपंग बहुउद्देशीय केंद्र, सिंधी कॉलनी, येथे महात्मा गांधी सेवा संघ, औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने विविध प्रवर्गातील अपंगांची मोफत तपासणी व कृत्रिम अवयव साधने वाटपाचे शिबिर संपन्न झाले. या शिबिरात २३० लाभार्थ्यांची तपासणी करण्यात येऊन १७० लाभार्थ्यांना

मोफत कृत्रिम अवयव व साधने वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमाला मनपा आयुक्त रामनाथ सोनवणे, जिल्हाधिकारी निरंजनकुमार सुधांशु, डॉ. अस्मिता पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. निरुपमा डांगे, समाज कल्याण अधिकारी डॉ. पी. सी. शिरसाठ, भरत चौधरी, प्रकल्प संचालक विजय कान्हेकर, समन्वयक सुहास तेंडुलकर आदींची उपस्थिती होती.

**जालना, ता. २७ ते ३१** श्री. गुरु गणेश दृष्टीहिन विद्यालय, शिवाजी चौक, जालना येथे जिल्हा अपंग पुनर्वसन केंद्र, समाज कल्याण (अपंग विभाग), जिल्हा परिषद, जालना यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्ह्यातील विविध प्रवर्गातील अपंग लाभार्थ्यांना कृत्रिम अवयव, साहित्य व साधने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी १५० लाभार्थ्यांची मोफत तपासणी करुन १०० लाभार्थ्यांना कृत्रिम अवयवाचे वाटप करण्यात आले. यात प्रामुख्याने जयपुर फुट, कॅलिपर्स, कुबड्या, श्रवणयंत्र, अंध काठी, बेल किट, तीनचाकी सायकल, व्हिल चेअर इत्यादी साहित्याचा समावेश होता.

कार्यक्रमाला जिल्हाधिकारी विलास ठाकुर, मुख्य कार्यकारी अधिकारी सुनिल पाटील, समाज कल्याण अधिकारी जितेंद्र सोनवणे, सभापती राजेश राठोड, श्रावक संघाचे अध्यक्ष विनयकुमार कोठारी, उपाध्यक्ष रमेशचंद्र सकलेचा, सचिव राजेंद्र ओस्तवाल, विश्वस्त मदनलाल गादीया, विरेंद्रकुमार धोका, सुनिलकुमार चोरडीया, कचरुलाल कुंकुलोळ, प्रकल्प संचालक विजय कान्हेकर, समन्वयक सुहास तेंडुलकर आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

**धुळे, ता. ०८ ते १२ जुलै २०१०** रोजी केले मुक बधीर विद्यालय, धुळे येथे जिल्हा अपंग पुनर्वसन केंद्र, औरंगाबाद, व जिल्हा परिषद, धुळे यांच्या संयुक्त विद्यमाने धुळे जिल्ह्यातील विविध प्रवर्गातील २५० अपंगांची मोफत तपासणी करण्यात येऊन १४५ लाभार्थ्यांना कृत्रिम साहित्य/साधनाचे वाटप करण्यात आले.

यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी दीपेंद्रसिंह कुशवाह, अप्पर जिल्हाधिकारी सोमनाथ गुंजाळ, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डी. डी. शिंदे. उपमुख्य कार्यकारी अधिकारी संतोष धोत्रे, हरीजन सेवक संघाचे झुंबरलाल शर्मा, बधीर पुनर्वसन संस्थेचे अध्यक्ष डॉ. अरुण साळूंखे, प्रकल्प संचालक श्री. विजय कान्हेकर, समन्वयक श्री. सुहास तेंडुलकर आदींची उपस्थिती होती.

**नंदुरबार, ता. ०९ ते १४ जुलै २०१०** रोजी महात्मा फुले विद्यालय येथे जिल्हा अपंग पुनर्वसन केंद्र, औरंगाबाद, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठाण, मुंबई व जिल्हा परिषद, नंदुरबार यांच्या संयुक्त विद्यमाने नंदुरबार जिल्ह्यातील विविध प्रवर्गातील २५० अपंगांची मोफत तपासणी करण्यात येऊन १४५ लाभार्थ्यांना कृत्रिम साहित्य/साधनाचे वाटप करण्यात आले.

यावेळी जिल्हा परिषदेच्या कल्याण सभापती अहिल्याबाई पावरा, मुख्याध्यापक पी. एन. विसपुते, राष्ट्रीय विकास अपंग महासंघाचे जिल्हाध्यक्ष अरुण चौधरी, धामडोद येथील अंधनिवासी शाळेचे चेअरमन लक्ष्मण मराठे, जिल्हा अपंग पुनर्वसन केंद्राचे सचिव विजय कान्हेकर, समन्वयक सुहास तेंडुलकर आदींची उपस्थिती होती.

**औरंगाबाद, ता. २२ जुलै २०१०** गांधी भवन, समर्थनगर, औरंगाबाद येथे जिल्हा अपंग पुनर्वसन केंद्र, औरंगाबाद, व जिल्हा परिषद, औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने धुळे जिल्ह्यातील विविध प्रवर्गातील २०० अपंगांची मोफत तपासणी करण्यात येऊन १७० लाभार्थ्यांना कृत्रिम साहित्य/साधनाचे वाटप करण्यात आले. यात प्रामुख्याने जयपुर फुट, कॅलिपर्स, कुबड्या, श्रवणयंत्र, अंध काठी, बेल किट, तीनचाकी सायकल, व्हिल चेअर इत्यादी साहित्याचा समावेश होता.

यावेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी मुकीम देशमुख, जि. प. समाजकल्याण अपंग विभागाचे गायकवाड, समन्वयक सुहास तेंडुलकर, समन्वयक राजाभाऊ गोकुळअष्टमी, सोयगावचे गटविकास अधिकारी दाभाडे, व्यवस्थापक संतोष राठोड आदींची उपस्थिती होती.

**सोलापूर,** दिनांक १४-०५-२०१० ते १८-०५-२०१० दरम्यान सोलापुर जिल्ह्यातील मोहोळ तालुक्यातील कामती येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात आरोग्य विभाग, सोलापुर, महात्मा गांधी सेवा संघ, औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने विविध प्रवर्गातील अपंगांची मोफत तपासणी व कृत्रिम अवयव/ साधने वाटपाचे शिबिर संपन्न झाले. या शिबिरात १०५ लाभार्थ्यांची तपासणी करण्यात येऊन ६५ लाभार्थ्यांना मोफत कृत्रिम अवयव व साधने वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमाला जिल्ह्याचे पालकमंत्री मा. ना. लक्ष्मणराव ढोबळे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. धाकतोडे, श्री कांबळे, श्री. विजय कान्हेकर, श्री सुहास तेंडुलकर आदि मान्यवरांची उपस्थिती होती.

**पुणे, ता. २० ते २५ जुन २०१०** राजभवन रस्त्यावरील बालकल्याण संस्थेत जिल्हा रुग्णालय, औंध, आणि बालकल्याण संस्था यांच्यातर्फे विविध प्रवर्गातील अपंग लाभार्थ्यांना कृत्रिम अवयव, साहित्य व साधने वाटप या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ३५० लाभार्थ्यांची मोफत तपासणी करुन १४० लाभार्थ्यांना कृत्रिम अवयवाचे वाटप करण्यात आले. यात प्रामुख्याने जयपुर फुट, कॅलिपर्स, कुबड्या, श्रवणयंत्र, अंधकाठी, बेल किट, तीनचाकी सायकल, व्हिल चेअर इत्यादी साहित्याचा समावेश होता.

कार्यक्रमाला बालकल्याण संस्थेचे मानद सचिव मा. प्रतापराव पवार, सौ. भारती पवार, खा. सुप्रिया सुळे, अपंगकल्याण आयुक्त श्री. सावंत, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. महेंद्र नगरे, श्री विजय कान्हेकर, श्री दत्ता बाळसराफ, सौ. मिनिता पाटील, श्री. वा. ना. तुंगार, श्री. राजाभाऊ गोकुळअष्टमी, श्री. सुहास तेंडुलकर आदी मान्यवर उपस्थिती होते. शिबिरास रमेश सांगळे, अनिल चाळके, विनोद जाधव यांचे सहकार्य मिळाले.

* * *



# शिक्षण विकास मंच
# कार्यवृत्त

शिक्षणविषयक कार्यक्रमांचे आयोजन करण्यासाठी प्रतिष्ठानने शिक्षण विकास मंचची स्थापना केली आहे. हा मंच गेल्या दोन वर्षापासून कार्यरत आहे.

खा. सुप्रिया सुळे या शिक्षण विकास मंचच्या निमंत्रक म्हणून, तर डॉ. कुमुद बंसल या मुख्य संयोजक आणि डॉ. वसंत काळपांडे हे विशेष सल्लागार म्हणून जबाबदारी सांभाळतात. श्रीमती बसंती रॉय यांचेही मोलाचे सहकार्य या कामी होत असते. दत्ता बाळसराफ हे शिक्षण विकास मंचाचे संयोजक आहेत तर सुरेश पाटील हे समन्वयक म्हणून काम पहातात. शिक्षण विकास मंचच्या कामात वेळोवेळी गरजेनुसार राज्यातील शिक्षण तज्ञांची मदत घेण्यात येते.

या वर्षी शिक्षण विकास मंचने पुढील तीन ठळक कार्यक्रम हाती घेतले आहेत.

- जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमधील नवोपक्रमांबाबतचे पुस्तक;
- विस्तार कार्य; आणि
- राष्ट्रीय शिक्षण दिन

या आर्थिक वर्षात दिनांक १ एप्रिल २०१० पासून आतापर्यंत सहा महिन्यांच्या कालावधीत वरील कार्यक्रमांचे नियोजन आणि अंमलबजावणी यासाठी मुंबई येथे डॉ. कुमुद बंसल यांच्या अध्यक्षतेखाली आठ बैठका, मुंबई, पुणे व मुर्टी येथे आयोजित केलेल्या तीन कार्यशाळा, पुणे येथील विविध विषयांवर आयोजित केलेल्या सात बैठका, मुर्टी आणि भुतोंडे या दोन केंद्राच्या कार्यकक्षेतील २२ जिल्हा प्राथमिक शाळांना तीन वेळा भेटी देण्यात आल्या. याशिवाय विविध स्वरुपाची माहिती मिळविण्यासाठी आणि संदर्भ शोधण्यासाठी इंटरनेट, ग्रंथालयातील पुस्तके यांचा वापर, अधिकारी आणि तज्ज्ञ यांच्यांशी दूरध्वनीवरुन आणि प्रत्यक्ष संपर्क साधून चर्चा करणे, कार्यक्रमांशी संबंधित विविध व्यक्ती आणि संस्था यांच्याशी पत्रव्यवहार करुन त्यांचा पाठपुरावा करणे, दत्तक घेतलेल्या प्राथमिक शाळांसाठी आवश्यक असलेली पुस्तके आणि इतर साहित्य निश्चित करणे हे कामे वेगळीच. शिक्षण विकास मंचने हाती घेतलेल्या सर्व कार्यक्रमांचे अभ्यासपूर्ण असे आराखडे तयार केले आहेत. अहवाल, लेख तयार केले आहेत. आणि सर्वेक्षण/मूल्यमापन यासाठी साधनेही विकसित केली आहेत. आतापर्यंत झालेल्या कामाचा तपशीलवार आढावा पुढील परिच्छेदांमध्ये दिलेला आहे.

राज्यात प्राथमिक शिक्षणाच्या क्षेत्रात काम करणारे निवडक ५० अधिकारी आणि शिक्षक यांची गुणवत्तापूर्ण प्राथमिक शिक्षण या विषयावर एक कार्यशाळा आयोजित करण्याचे प्रस्तावित होते. परंतु वरील तीन कार्यक्रमांसाठी संपूर्ण वर्षभर विविध प्रकारची कामे सुरू असल्यामुळे आता ही कार्यशाळा नंतर आयोजित करण्यात येणार आहे.

**■ जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमधील नवोपक्रमांबाबतचे पुस्तक**

- जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमध्ये अनेक उत्कृष्ट उपक्रम सुरु आहेत. परंतु त्यानां योग्य ती प्रसिध्दी मिळत नाही. जिल्हा परिषद प्राथमिक शाळांनी केलेले चांगले काम अंधरातच रहाते. या शाळांमधील नकारात्क गोष्टींना मात्र मोठ्या प्रमाणावर प्रसिध्दी मिळते. या पार्श्वभूमीवर शिक्षण विकास मंचमार्फत जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमधून सुरू असलेल्या उत्कृष्ट उपक्रमांची माहिती देणारे एक पुस्तक तयार करण्यात येणार आहे.
- राज्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळांकडून १०० लेख आले होते. काही लेख महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेच्या 'जीवन शिक्षण' या मासिकामधून निवडले आहेत.
- पुस्तकाच्या संपादनाचे काम डॉ. वसंत काळपांडे, श्री. बी. एम. नाईकरे, श्री. शरद काथवटे या तीन सदस्यांची समिती करत होती.
- हे पुस्तक सुमारे १६० पृष्ठांचे असून त्यात उपक्रमांशी संबंधित रंगीत छायाचित्रांचाही समावेश असेल. पुस्तकांचे

प्रकाशन राष्ट्रीय शिक्षण दिनाच्या दिवशी म्हणजे ११ नोव्हेंबर २०१० रोजी होईल.

■ **विस्तार कार्य**

- पुणे जिल्ह्यातील बारामती तालुक्यातील मुर्टी या केंद्राला जोडलेल्या १३ आणि भोर तालुक्यातील भुतोंडे केंद्राला जोडलेल्या ९, अशा एकूण २२ शाळा शिक्षण विकास मंचने दत्तक घेतल्या आहेत.
- या कार्यक्रमात या शाळांना सर्वेक्षण करुन प्रयोगशाळा साहित्य आणि वाचनालयासाठी पुस्तके पुरवणे आणि कृतीतून अध्ययन या बाबींना प्राधान्य द्यायचे ठरले आहे. या दोन्ही केंद्रात इयत्ता पाचवी ते इयत्ता सातवीचे वर्ग असलेल्या केवळ दोनच शाळा असल्यामुळे केवळ इयत्ता पहिली ते इयत्ता चौथी या इयत्तांवरच लक्ष केंद्रित करावे असे ठरले. इयत्ता पहिली ते चौथीपर्यंत विज्ञान शिकवण्यासाठी कोणतेही जादा शैक्षणिक साहित्य खरेदी करण्याची गरज नाही, त्यामुळे प्रयोगशाळेसाठी कोणतीही जादा तरतूद आवश्यक नाही. मात्र मुलांसाठी गोष्टींची आणि माहितीपर अशी पुस्तके देण्याची गरज आहे. तसेच पहिलीपासून इंग्रजी विषय असल्यामुळे सोप्या इंग्रजीतील पुस्तके देणेही आवश्यक आहे. यासाठी विविध पुस्तकांची खरेदी करण्यात आली.
- या शाळांची वाचनासाठीच्या पुस्तकांची गरज लक्षात घेऊन या दोन केंद्रातील शाळांसाठी प्रत्येकी ६९ मराठी आणि २२ इंग्रजी अशा ९१ पुस्तकांची खरेदी केली आहे. यांत विंदा करंदीकर, जी. ए. कुलकर्णी, पु. ल. देशपांडे, सई परांजपे, रत्नाकर मतकरी, शांता शेळके, इंदिरा संत अशा नामवंत लेखकांचाही समावेश आहे. या बरोबरच चांदोबा, चंपक आणि टिंकल ही मासिके आणि खेळाचे काही साहित्य पुरवण्याचाही विचार आहे.
- शिक्षकांबरोबरच्या चर्चेत 'कृतीतून अध्ययन' या विषयावर तीन दिवसांची कार्यशाळा आयोजित करावी असे ठरले. या कार्यशाळेत शिकणारे शिक्षक आणि शिकवणारेही स्वत: शिक्षकच राहतील असेही ठरले. त्यानुसार दिनांक ४ ते ६ मे, २०१० या कालावधीत आयोजित केलेल्या कार्यशाळेत शिक्षकांनी मराठी, इंग्रजी, गणित, विज्ञान, इतिहास, भूगोल, नागरिकशास्त्र हे विषय खेळ, प्रकल्प, गटकार्य, वर्तमानपत्रांचा वापर, फ्लॅशकार्ड्सचा वापर, नकाशावाचन, नाट्यीकरण, मुलाखती, प्राणी, पक्षी आणि वनस्पती यांचे निरीक्षण, पानांचे संग्रह, सर्वेक्षण, इ. माध्यमातून कसे शिकवता येईल याबाबत नियोजन केले. या कार्यशाळेसाठी एकही बाहेरचा तज्ञ नव्हता हे कार्यशाळेचे प्रमुख वैशिष्ट्य होते.
- दिनांक २६ जुलै रोजी जिल्हा परिषदेचे सभापती (बांधकाम व आरोग्य समिती) श्री. संभाजी होळकर, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) श्री. शेंडकर, गटविकास अधिकारी, बारामती, पंचायत समिती श्री. गोर्डे आणि केंद्र प्रमुख भुतोंडे, श्री सावंत यांच्याशी चर्चा झाली. या चर्चेत भुतोंडे भागात एका होडीचा प्रस्ताव सभापती (बांधकाम व आरोग्य समिती) यांनी मंजूर केल्याचे सांगितले.
- दुसऱ्या भेटीत शिक्षकांबरोबरच मुर्टी आणि भुतोंडे या केंद्रातील ग्रामस्थांसोबतही चर्चा झाली. या भेटीत भुतोंडे-वाजेघर या एस.टी. बसच्या वेळा आणि मार्ग बदलणे आणि भुतोंडे येथे पुर्वी सुरु असलेले प्राथमिक आरोग्य केंद्र पुन्हा सुरु करणे या दोन बाबींचा पाठपुरावा करणेबाबत चर्चा झाली.

❋ ❋ ❋

# वसुंधरा पर्यावरण संवर्धन अभियान
# कार्यवृत्त

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई अंतर्गत 'वसुंधरा पर्यावरण संवर्धन अभियान' या नावाने पर्यावरणावर काम करणाऱ्या विभागाची स्थापना करण्यात आली आहे. मा. सुप्रिया सुळे या विभागाच्या निमंत्रक आहेत. या विभागाचे कामकाज विशेष सल्लागार श्री. सदा डुंबरे, संयोजक दत्ता बाळसराफ व समन्वयक प्रशांत शिंदे, अमेय जगताप, सुरेश पाटील हे पाहतात. त्यांना श्रीमती वंदना चव्हाण, श्री वसंतराव टाकळकर, श्री अभिजित घोरपडे, श्री पार्थ बापट, सचिन टिवले, परेश ज.म, अमृता प्रधान यांचे सहकार्य लाभते. महाराष्ट्रातील पर्यावरणीय प्रश्न, माती-पाणी-हवा-जंगल आणि जैवविविधतेच्या संवर्धनाचे प्रश्न आणि त्यासाठी उल्लेखनीय काम करणाऱ्या संस्था-संघटना व्यक्तींची दखल या विभागातर्फे घेण्यात येईल. त्याचबरोबर पर्यावरणीय प्रश्नांचे धोरणात्मक स्वरुप आणि अपेक्षित बदल सर्वांसमोर मांडण्यासाठी शिबिर-कार्यशाळा-परिषदा-क्षेत्रभेटी आणि अध्ययन करण्यात येईल.

**हवामान बदल आणि महाराष्ट्र: राज्यस्तरीय परिषद**

हवामान बदल आणि जागतिक तापमानवाढीच्या प्रश्नाने संपूर्ण जगाला ग्रासून टाकले आहे. गावाकडील पिक-पाण्याचा आणि पूर-दुष्काळाचा संबंध जगातील बदलत्या हवामानाशी जोडला जात आहे. महाराष्ट्रातील शेती, उद्योग, कारखाने, तंत्रज्ञान, वाहतूक व्यवस्था, राहणीमान, इ. अनेक गोष्टींचा हवामान बदलाशी संबंध आहे. अशा या महत्त्वाच्या पर्यावरणीय प्रश्नाचा महाराष्ट्रातील शेती, पाणी, जैवविविधता, शहरीकरण आणि लोकशिक्षणाशी असलेला संबंध याबाबत धोरणात्मक मांडणी करणारी राज्यस्तरीय परिषद दि. ६ मार्च २०१० रोजी आयोजित करण्यात आली. या परिषदेमध्ये, महाराष्ट्रातील पर्यावरण शिक्षण इत्यादी विविध क्षेत्रात काम करणाऱ्या संस्था-संघटनांचे कार्यकर्ते, तज्ज्ञ, अभ्यासक अशा विविध स्तरातील आणि महाराष्ट्राच्या विविध जिल्ह्यांतील प्रतिनिधी सहभागी झाले होते. त्याचप्रमाणे, या परिषदेमध्ये सहभागी लोकांतर्फे हवामान बदल आणि महाराष्ट्र या संदर्भात मांडण्यात येणाऱ्या कृती आराखड्यावर बोलण्यासाठी केंद्रिय पर्यावरण मंत्री, श्री. जयराम रमेश, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री, श्री अशोक चव्हाण, वनमंत्री, श्री पतंगराव कदम, ग्राम विकास मंत्री, श्री जयंत पाटील, कृष्णा खोरे विकासमंत्री, श्री रामराजे निंबाळकर सन्माननीय अतिथी म्हणून उपस्थित होते.

या परिषदेच्या निमंत्रक, माननीय सुप्रिया सुळे यांनी परिषदेच्या पूर्वतयारीसाठी सलग तीन महिने महाराष्ट्रातील पर्यावरणावर काम करणाऱ्या कार्यकर्ते आणि तज्ज्ञ मंडळी बरोबर बैठका आणि कार्यशाळा घेतल्या. या संपूर्ण प्रक्रियेमध्ये, सदा डुंबरे, माधव गाडगीळ, प्रकाश गोळे, मुकुंद घारे, विजय परांजपे, विजय दिवाण, तारक काटे, संस्कृती मेनन, एरिक भरुचा, वंदना चव्हाण, दीपक आपटे, दत्ता देसाई, पार्थ बापट आदी मान्यवरांचे मार्गदर्शन लाभले. ही परिषद यशस्वी करण्यासाठी वसंत टाकळकर, अभिजीत घोरपडे, परेश ज. म. सचिन टिवले, अमृता प्रधान, अमेय जगताप, प्रशांत शिंदे, सुरेश पाटील आणि दत्ता बाळसराफ यांचा समावेश असलेल्या कार्यकारी गटाने विशेष परिश्रम घेतले.

**हवामान बदल आणि शहरीकरण: महानगरपालिका स्तरीय परिषद**

हवामान बदलाचा आणि त्याच्या दुष्परिणामांची व्याप्ती वाढत्या शहरीकरणामुळे अधिकच गुंतागुंतीची होण्याची परिस्थिती आहे. या परिस्थितीचा सामना करण्याची वेळ महानगरपालिकांवर येणार हे लक्षात घेऊन त्याबाबत पुरेशा उपाययोजना करण्यासाठी महानगरपालिका सदस्यांनी एकत्र येऊन विचार करण्याची गरज आहे. या पार्श्वभूमीवर यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई आणि मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, पुणे महानगरपालिका, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय पर्यावरण दिनानिमित्त दि. ४ व ५ जून २०१० रोजी पुण्यात शहरीकरणाच्या प्रश्नावर एका परिषदेचे आयोजन करण्यात आले. या परिषदेमध्ये, महाराष्ट्रातील विविध महानगरपालिकांचे नगरसेवक, पर्यावरणवादी संस्था-संघटना व कार्यकर्ते सहभागी झाले होते.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानतर्फे तयार करण्यात आलेल्या 'हवामान बदल आणि महाराष्ट्र' या पुस्तकाचे प्रकाशन प्रसिध्द पर्यावरण तज्ज्ञ, माधव गाडगीळ यांच्या हस्ते करण्यात आले.

या पुस्तकामध्ये, हवामान बदलाचा शेती, पाणी, जैवविविधता, शहरीकरण आणि लोकशिक्षणाशी संबंध लक्षात घेऊन त्याबाबत धोरण निश्चित करण्यासाठी शासनाला उपयुक्त शिफारसी करण्यात आल्या आहेत.

**वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन**

वसुंधरा पर्यावरण संवर्धन अभियानबरोबर महाराष्ट्रातील अनेक संस्था-संघटना व कार्यकर्ते एकत्र येऊन काम करीत आहेत. त्यापैकी पुण्यातील युथ टू युथ फाऊंडेशन आणि मुंबईतील सृष्टीज्ञान संस्था यांनी वृक्षारोपणाचे कार्यक्रम राबविले. उघड्या-बोडक्या झालेल्या टेकड्यांवर सीसीटी तंत्राचा वापर करुन युथ टू युथ फाऊंडेशनच्या तरुणांनी वसंत टाकळकर यांच्या मार्गदर्शनाखाली वृक्षारोपण केले. यामध्ये, जाणिवपूर्वक स्थानिक वृक्ष प्रजाती निवडून त्यांची रोपे लावण्यात आली.

ग्रामीण भागात सर्रास आढळणाऱ्या बहुगुणी कडुनींब वृक्षाचे प्रमाण मुंबई सारख्या महानगरीत अत्यल्पच आहे. हवामान बदलाचा सामना करण्यासाठी कडुनींबाचे संवर्धन एक अत्यावश्यक बाब आहे. हे लक्षात घेऊन सृष्टीज्ञान संस्थेच्या शाळा-शाळांमध्ये मुलांच्या हस्ते कडुनींब वृक्ष लागवड आणि संवर्धन अभियान सुरु केले आहे. या अभियानात प्रसिध्द आर्किटेक्ट, प्रतिमा उके यांचे विशेष सहकार्य लाभले आहे.

अलिकडे, वृक्षारोपण एखाद्या फॅडसारखे किंवा ताळ-तंत्राचे भान सोडून उरकून टाकलेली गोष्ट अशी स्थिती आहे. वृक्षरोपण आणि वृक्षसंवर्धन हे पर्यावरणाला पूरक असावे, लावलेल्या वृक्षांच्या जागी पुन्हा वृक्षारोपण करण्याची वेळ येऊ नये अशा तऱ्हेने वृक्षांची निगा राखण्यात यावी याचे भान आणून देणारा एक लेख वसंत टाकळकर यांनी तयार केला आणि पत्रकार अभिजित घोरपडे यांनी तो लोकसत्ता वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध केला.

* * *

## यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई
## वसुंधरा (पर्यावरण संवर्धन अभियान)
## आणि सृष्टीज्ञान संस्था संचालित
## पर्यावरण शिक्षण प्रमाणपत्र अभ्यासक्रम

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईच्या वसुंधरा (पर्यावरण संवर्धन अभियान) आणि सृष्टीज्ञान संस्थेच्या संयुक्त विद्यमाने पर्यावरण शिक्षण प्रमाणपत्र अभ्यासक्रम चालविण्यात येतो. तीन महिन्यांचा कालावधी असणाऱ्या या अभ्यासक्रमात, आपल्या पर्यावरणातील जमीन, जंगल, पाणी, हवा आणि वन्यजीव या मूलभूत घटकांविषयी मराठी भाषेतून सखोल माहिती, छायाचित्रे, आकडेवारीने युक्त असे अभ्यास संच तसेच पर्यावरणीय दृष्टीने महत्वाच्या स्थळांना भेटी व तज्ञांचे मार्गदर्शन हे या अभ्यासक्रमाचे वैशिष्ट्य आहे.

सध्या वातावरणात होत असलेला बदल, प्रदूषण, वृक्षतोड, मातीची धूप, पाण्याचे दुर्भिक्ष, विजेची कमतरता, कचरा यासारख्या पर्यावरणीय समस्यांचे आकलन व त्यावरील उपाययोजनांविषयी या अभ्यासक्रमात सुलभपणे मांडणी करण्यात आली आहे. खेळ, प्रयोग, स्लाईड शो, प्रश्नमंजुषा, प्रकल्प यासारख्या संवादात्मक माध्यमातून हा विषय मराठी भाषेतून हाताळण्यात येतो. पर्यावरणाचे जागतिक आणि स्थानिक संदर्भ एकमेकांशी जोडण्याचे काम या अभ्यासक्रमात करण्यात येते. हा विषय कला-साहित्य, इतिहास, भूगोल, विज्ञान, तंत्रज्ञान, व्यापार उदयोग अशा सर्व शाखांना छेदून जाणारा आहे याची जाणीव या निमित्ताने तयार व्हावी. पर्यावरणीय समस्या सोडविण्यासाठी प्रत्येक वेळी शासन, प्रशासकीय यंत्रणा यांच्याकडून बघून चालणार नाही तर आपण स्वत:ही आंतरबाह्य बदलून आपल्याबरोबर समाजालाही पर्यावरणस्नेही व शाश्वत जीवनाची ओळख करुन द्यायची आहे. पर्यावरण हा केवळ पुस्तकी अभ्यास, चर्चा करायचा किंवा सहजतेने घेण्याचा विषय नसून तो आपल्या आयुष्याचाच अविभाज्य भाग आहे. जीवनाकडे आणि जगाकडे पाहायचा एक वेगळा दृष्टीकोन आहे. ती एक सर्वसमावेशक सुंदर जीवनशैली आहे. जी आपण या निमित्ताने जास्तीत जास्त आपल्यात सामावू शकतो. हाच या अभ्यासक्रमाचा खरा उद्देश आहे.

**अभ्यासक्रम संघटक** : संगीता खरात, सुरेश पाटील

**संपर्क** : (०२२) २२८५२०८१/२२८६२०९८/२४१०६१३८

**ईमेल** : ycpvasundhara@gmail.com/srushtidnyan@gmail.com

# कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरम
# कार्यवृत्त

**यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरम :** १९८७ च्या विधी सेवा प्राधिकरण अधिनियमाप्रमाणे अंतर्भूत असलेली मोफत कायदेविषयक सहाय्य व सल्ला योजना राबविण्याचे काम यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानमार्फत केले जाते. या योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी प्रतिष्ठानने 'यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरम' या विभागाची निर्मिती केली आहे. या विभागामध्ये अंदाजे ३५ वकील व समाजसेवक काम करीत असून ते आपली सेवा या योजनेसाठी देत आहेत.

**फोरममार्फत सर्वसाधारणपणे खालील प्रकारचे काम केले जाते.**

- समाजातील गोर-गरीब व तळागाळातील लोकांना कसल्याही प्रकारचा भेदभाव न करता मोफत तोंडी सल्ला देणे.
- प्रसंगी गुंतागुंतीच्या प्रश्नांसंबंधी सखोल अभ्यास करुन गरजू लोकांना कायदेविषयी सल्ला देणे.
- काही वेळा पत्रव्यवहाराद्वारे गरजू लोकांना कायदेविषयी सल्ला देणे.
- पक्षकारांच्या तंटयामध्ये सामोपचाराने तडजोड घडवून आणणे.
- विधी विषयामध्ये संशोधन करुन प्रचलित कायद्यांमध्ये सुधारणा सूचविणे किंवा नवीन कायद्याचे प्रारुप तयार करुन वैधानिक प्रस्ताव राज्य शासनाला किंवा केंद्र शासनाला पाठविणे.
- विधी विषयामध्ये संशोधन करुन प्रचलित कायद्यानुसार बनविण्यात आलेल्या नियमांमध्ये सुधारणा सूचविणे किंवा नवीन नियमांचे प्रारुप तयार करुन वैधानिक प्रस्ताव राज्य शासनाला किंवा केंद्र शासनाला पाठविणे.
- कायद्यांची विशेष माहिती करुन देण्यासाठी तज्ज्ञांची विशेष व्याख्याने आयोजित करणे.
- सामान्य लोकांना कायद्यांची माहिती करुन देण्यासाठी विधी साक्षरता कार्यशाळांचे आयोजन करणे.
- विधी शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी मूट कोर्ट स्पर्धा, निबंध स्पर्धा व वक्तृत्व स्पर्धा यांचे आयोजन करणे. तसेच अशा विद्यार्थ्यांसाठी वकिलांची व्यावसायिक नितिमत्ता या विषयावर परिसंवादांचे आयोजन करणे.

त्यानुसार गेल्या सात महिन्यांत म्हणजेच १ फेब्रुवारी २०१० ते ३१ ऑगस्ट २०१० या अवधीमध्ये फोरमकडून करण्यात आलेल्या कामाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

**फोरमच्या बैठका:** कायदेविषयक सहाय्य व सल्ला योजनेच्या अंमलबजावणीबाबत विचार करुन धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी आणि कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी दरमहा दुसऱ्या शुक्रवारी फोरमच्या मासिक बैठका घेतल्या जातात. गेल्या सात महिन्यांमध्ये एकूण विविध बैठका पार पडल्या. सरासरी १२ सदस्य प्रत्येक बैठकीला उपस्थित होते.

**उपसमितीच्या बैठका:** एखाद्या विषयासंबंधी सखोल अभ्यास करुन प्रस्ताव तयार करण्यासाठी वेळोवेळी फोरमच्या वेगवेगळ्या उपसमित्या नेमल्या जातात. त्यानुसार खालीलप्रमाणे उपसमित्यांच्या बैठका झाल्या.

**अ) पुस्तक पुनर्मुद्रण समिती:**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईने 'हॅन्डबुक फॉर सिनिअर सिटीझन्स्' या नावाचे पुस्तक प्रकाशित केले आहे. त्या पुस्तकाच्या प्रती संपल्या असल्यामुळे त्या पुस्तकाचे पुनर्विलोकन करुन ते पुन्हा प्रकाशित करण्याचे ठरले आहे. हे काम करण्यासाठी महाराष्ट्र राज्याचे निवृत्त मुख्य सचिव श्री. शरद उपासनी यांच्या अध्यक्षतेखाली एका उपसमितीची निर्मिती करण्यात आली आहे. त्या समितीची पहिली बैठक २९ जुलै २०१० राजी चव्हाण केंद्राच्या पाचव्या मजल्यावरील बोर्ड रुममध्ये संपन्न झाली. बैठकीला ६ सदस्य उपस्थित होते. या बैठकीमध्ये सुधारित पुस्तकाचा आराखडा ठरविण्यात आला.

**ब) सुकाणू समितीची बैठक:**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्टान, मुंबईमार्फत दरवर्षी ऑक्टोबर महिन्यामध्ये ज्येष्ठ नागरिकांचा आनंद मेळावा चव्हाण केंद्रामध्ये आयोजित केला जातो. ऑक्टोबर २०१० मध्ये भरविण्यात येणाऱ्या मेळाव्यासंबंधी विचार करण्यासाठी प्रतिष्ठानच्या सर्व विभागांच्या प्रतिनिधींची बैठक दिनांक ३० जुलै

२०१० रोजी सायंकाळी ४.३० वाजता पाचव्या मजल्यावरील बोर्ड रुममध्ये मा. श्री. शरद काळे, सरचिटणीस यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. बैठकीला १९ प्रतिनिधी उपस्थित होते. या बैठकीमध्ये मेळाव्याचे स्वरुप, कार्यक्रम व इतर बाबीसंबंधी चर्चा होऊन प्रस्ताव तयार करण्यात आले.

**क) अहवाल उप-समिती:**

फोरममार्फत १९९२ पासून विधी साक्षरता कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. १९९२ ते २०१० पर्यंत झालेल्या अशा कार्यक्रमांचा एक संक्षिप्त अहवाल तयार करण्याचे ठरले. त्यानुसार त्याबाबत नियम करण्यासाठी श्री. निलेश पावसकर यांच्या अध्यक्षतेखाली एका उप-समितीची निर्मिती करण्यात आली आहे. त्या समितीची बैठक दिनांक ९ जुलै २०१० रोजी सायंकाळी ५.०० वाजता ग्रंथालयामध्ये झाली. चार सदस्य बैठकीला उपस्थित होते. त्या बैठकीमध्ये सदर अहवाल कसा असावा याचा आराखडा ठरविण्यात आला.

**■ कायदेविषयक सल्ला केंद्र:**

गोरगरीब व सामान्य लोकांना कायदेविषयक तोंडी सल्ला देण्यासाठी दर शुक्रवारी सायंकाळी ५.३० च्या नंतर प्रतिष्ठानच्या ग्रंथालयामध्ये कायदेविषयक मोफत सल्ला केंद्र चालविले जाते. गेल्या सात महिन्यांमध्ये या केंद्राच्या २७ बैठका झाल्या. अंदाजे १०० लोकांनी या केंद्रामध्ये येऊन मोफत सल्ल्याचा लाभ घेतला आहे. या केंद्राचे काम सर्वश्री म. बा. पवार, भूपेश सामंत, दिलीप तळेकर, प्रकाश देशमुख, निलेश पावसकर व हेमंत केंजाळकर या वकिलांनी पाहिले.

**■ मोफत समुपदेशन व तडजोड केंद्र:**

दर मंगळवारी सायंकाळी ५.०० ते ७.०० या वेळांत समुपदेशन व समेट केंद्राचे आयोजन केले जाते. दोन वादग्रस्त पक्षकारांना एकत्र आणून त्यांच्यामध्ये तडजोड घडवून आणण्याचा प्रयत्न या केंद्रामध्ये केला जातो. या कामाला गती देण्यासाठी विशेष प्रयत्न चालू आहेत.

**■ आपल्या कायद्याची माहिती करुन घ्या (Know your Law Lecture Series)**

या व्याख्यानमाले अंतर्गत दरमहा किंवा तीन महिन्यांतून एकदा कायदे पंडितांच्या विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात येते. सध्या इमारतींचे पुनर्विकास व माहितीचा अधिकार व कायद्यावर व्याख्याने आयोजित करण्याचे प्रयत्न चालू आहेत.

**■ वकीलांची व्यावसायिक नीतीमत्ता या विषयावर चर्चासत्र:**

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी अनेक उपक्रम राबविले जातात. त्यापैकी वकीलांच्या व्यावसायिक नीतिमत्ता (Professional Ethics of Lawyers) या बाबत जाणीव करुन देण्यासाठी चर्चासत्राचे आयोजन केले जाते. विधी शाखेतील विद्यार्थ्यांना याचा चांगला उपयोग होतो. सध्या फोरम व न्यू विधी महाविद्यालयक, माहिम येथे अशा कार्यक्रमाचे आयोजन करण्याचे प्रयत्न चालू आहेत.

**■ विधी साक्षरता कार्यशाळा:**

लोकांना सामाजिक किंवा त्यांच्या दैनंदिन जीवनाशी संबंधीत असलेल्या कायद्यांची माहिती करुन देण्यासाठी विविध प्रकारच्या विधी साक्षरता कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. यासाठी समाजाच्या वेगवेगळ्या घटकांसाठी वेगवेगळे प्रकल्प तयार करण्यात आले आहेत. उदाहरणार्थ पौगंडावस्थेतील मुले व मुली, महाविद्यालयीन विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, महिला, सहकारी गृहनिर्माण संस्थांचे सदस्य, सार्वजनिक न्यासाचे विश्वस्त, सार्वजनिक संस्थांचे सदस्य आणि सर्वसामान्य जनता इत्यादी घटकांसाठी विधी साक्षरता कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. गेल्या सात महिन्यांमध्ये अशा प्रकारच्या अनेक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. उदा. फोरम व उरण महिला नागरी पतपेढी मर्यादित, उरण यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १४ फेब्रुवारी २०१० रोजी (सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत) महिलांसाठी एका विधी साक्षरता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. १०० पेक्षा जास्त महिला कार्यक्रमाला उपस्थित होत्या. व्याख्यानाचे माध्यम मराठी होते. अंदाजे ८ कायद्यांसंबंधी माहिती करुन देण्यात आली. समारंभाच्या अध्यक्षस्थानी श्रीमती विभा पाडगांवकर ह्या होत्या. कार्यक्रम सर्वांना आवडला.

**■ शपथ कार्यक्रम:** सर्व विधी साक्षरता कार्यशाळेमध्ये संविधानाच्या प्रास्तविकेचे सांघिक वाचन करण्यात आले. तसेच संविधानातील मूलभूत कर्तव्यपालनासंबंधी शपथा घेण्यात आल्या. त्याचप्रमाणे अविवाहित मुले व मुली यांच्याकडून हुंडाबंदीसंबंधी शपथा घेण्यात आल्या.

**■ निबंधांना बक्षिसे:** विधी साक्षरता कार्यशाळेमध्ये भाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी फोरमची एक खास योजना आहे. त्या योजनेनुसार झालेल्या कार्यशाळेबाबत अथवा कार्यशाळेत शिकविण्यात आलेल्या एका किंवा अनेक विषयाबाबत विद्यार्थ्यांना निबंध लिहिता येतात व त्या निबंधाच्या गुणवत्तेनुसार विद्यार्थ्यांना पुस्तकांच्या स्वरुपात बक्षिसे दिली जातात.

■ **कार्यशाळेमध्ये शिकविलेले कायदे:** विधी साक्षरता कार्यशाळेमध्ये अंदाजे ५० ते ६० कायद्यासंबंधी माहिती करून देण्यात आली. त्यामध्ये प्रामुख्याने पुढील कायद्यांचा समावेश होता. (१) भारतीय संविधान, (२) विधी सेवा प्राधिकरण अधिनियम १९८७, (३) हुंडाबंदी अधिनियम १९६१, (४) भारतीय दंड संहिता १८६०, (५) ग्राहक संरक्षण कायदा १९८६, (६) फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३, (७) हिंदू वारसा हक्क कायदा १९५६ व इच्छा पत्र कायदा, (८) गुंतवणूकीसंबंधीचे नियम, (९) कौटुंबिक हिंसाचारापासून स्त्रियांचे संरक्षण कायदा २००५, (१०) माहितीचा अधिकार कायदा २००५, (११) हिंदू विवाह कायदा १९५५, (१२) मुस्लीम कायदा, (१३) पोटगी संबंधीचे कायदे, (१४) महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकाबाबत (त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्यातबाबत) अधिनियम १९६३, (१५) हिंदू अज्ञानत्व व पालकत्व अधिनियम १९५६, (१६) हिंदू दत्तक व निर्वाह अधिनियम १९५६, (१७) संपत्ती हस्तांतरण अधिनियम १८८२, (१८) विशेष विवाह अधिनियम १९५४, (१९) बाल विवाह बंदी अधिनियम २००५, (२०) महाराष्ट्र विवाह मंडळ नियमन व विवाह नोंदणी अधिनियम १९८८, (२१) न्यायालयांची बहुस्तरीय व्यवस्था (तालुका न्यायालयापासून सर्वोच्च न्यायालयापर्यंतची माहिती), (२२) स्त्रियांचे असभ्य प्रतिरुपण (प्रतिबंध) अधिनियम १९८६, (२३) विकलांग व्यक्तीसाठी (समान संधी, हक्काचे संरक्षण आणि पूर्ण सहभाग) अधिनियम १९९५. The Persons with Disabilities (Equal opportunities, Protection of Rights and Full Participation) Act. 1995 (२४) स्वमग्न असलेल्या, मस्तिष्क घात झालेल्या, मतिमंद व बहुविध विकलांगता असलेल्या व्यक्तींच्या कल्याणाकरिता राष्ट्रीय न्यास अधिनियम १९९९, (The National Trust for Walfare of Persons with Autism, Carebral Palsy, Mental Retardation and Multiple Disabilities Act, 1999) (२५) अनैतिक व्यापार (प्रतिबंध) अधिनियम, १९५६ (The Immoral Traffic (Prevention) Act, 1956 (२६) राष्ट्रप्रतिष्ठा अवमान प्रतिबंध अधिनियम १९७१, (२७) महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४, (२८) महाराष्ट्र रॅगिंग प्रतिबंध अधिनियम १९९९, (३०) महाराष्ट्र विद्यापीठाच्या, मंडळाच्या व इतर विनिर्दिष्ट परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम १९८२, (३१) मुंबई विद्यापीठाचे अध्यादेश क्रमांक २२० (अनुचित प्रथा प्रतिबंध), (३२) मुस्लिम स्त्रिया (घटस्फोटानंतर अधिकार संरक्षण) अधिनियम १९८६, (३३) महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन आणि पुनर्रविकास) अधिनियम १९७१, (३४) भारतीय वारसा हक्क कायदा १९२५, (३५) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०, (३६) मुंबई मुद्रांक कायदा १९५८, (३७) गृहनिर्माण संस्थांचे विनियम, (३८) अनुसूचित जाती आणि जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम १९८९, (३९) मुस्लिम व्यक्ती विषयक विधी (शरियम) प्रयुक्ती अधिनियम १९३७, (४०) नागरी हक्क संरक्षण अधिनियम १९५५, (४१) भारतीय मुद्रांक कायदा १८९९, (४२) भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८, (४३) प्रसूती विषयक लाभ अधिनियम १९६१, (४४) सोसायटी नोंदणी अधिनियम १८६०, (४५) अत्यावश्यक वस्तू अधिनियम १९५५, (४६) मोटर वाहन अधिनियम १९८८, (४७) जन्म व मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९, (४८) मानवी हक्क संरक्षण अधिनियम १९९३, (४९) महाराष्ट्र भाडे नियंत्रण अधिनियम १९९९, (५०) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६, (५१) माता पिता व ज्येष्ट नागरिक यांची पोटगी व कल्याण अधिनियम २००७, (५२) मुंबई पोलीस अधिनियम, १९५०.

■ **कार्यशाळेमध्ये व्याख्यान दिलेले व्याख्याते:** विधी साक्षरता कार्यशाळेमध्ये व्याख्यान देण्यासाठी फोरमने वकीलांचा संच (Faculty) बनविला आहे. वरील कार्यशाळेमध्ये या फॅकल्टीमधील खालील वक्त्यांनी विविध विषयांवर व्याख्याने दिली. (१) ॲड. म. बा. पवार, (२) श्री. प्रमोद ढोकळे, (३) ॲड. निलेश पावसकर, (४) ॲड. हेमंत केंजाळकर, (५) श्री. दिलीप तळेकर, (६) ॲड. अजय केतकर, (७) ॲड. भूपेश सामंत, (८) प्रि. नारायण राजाध्यक्ष, (९) प्रा. डॉ. जे. बी. पाटील, (१०) ॲड. डॉ. प्रकाश देशमुख.

■ **संशोधनाचे काम:** वर सांगितल्याप्रमाणे फोरमतर्फे विधी संशोधनाचे कामसुध्दा केले जाते. महाराष्ट्र हुंडाबंदी नियम २००३ यामध्ये सुधारणा सूचविण्यासाठी संशोधन पूर्ण झाले असून, त्याबाबतचा अहवाल महाराष्ट्र शासनाला पाठविण्यात आला आहे.

■ **आगामी कार्यक्रम:** राज्यातील पोलीस अधिकाऱ्यांसाठी खास विधी साक्षरता कार्यशाळेचे आयोजन करण्यासंबंधी प्रस्ताव विचाराधीन आहे.

❋ ❋ ❋

# महाराष्ट्र महिला व्यासपीठ
# कार्यवृत्त

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, महाराष्ट्र महिला व्यासपीठाच्या वतीने महिलांची शारिरीक, मानसिक, आर्थिक, सामाजिक इत्यादी विविध कार्यक्रम घेतले जातात. संयोजिका रेखा नार्वेकर, कार्यकारी संयोजिक ममता रमेशचंद्र कानडे महाराष्ट्र महिला व्यासपीठाचा कारभार सांभाळतात. त्यांना शोभा लोंढे यांचे सहकार्य लाभते.

**मार्गदर्शन शिबिर**

दिनांक ११/०२/२०१० रोजी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई बेसमेंट हॉल येथे अंदाजे ५० महिलांचे मार्गदर्शन शिबीर झाले. या कार्यक्रमात मा. उर्वशी धराधर (सारस्वत बँकेच्या जनरल मॅनेजर) यांनी बचत गट व बँकेचा व्यवहार याबाबत माहिती दिली. मा. संगीता खरात यांनी येणाऱ्या रंगपंचमी सणाच्या दिवशी 'घरगुती रंग बनवून वापरणे' या बाबत मार्गदर्शन केले. हॅण्डमेड पेपर बनविण्याबाबत प्रात्यक्षिक दाखविले.

कॉलेज ऑफ होम सायन्स निर्मला निकेतन यांच्या संयुक्त विद्यमाने ''गृहव्यवस्थापन प्रशिक्षण'' ही तिसरी बॅच सुरु करण्यासाठी ममता कानडे, शोभा लोंढे यांनी तयारी केली. तसेच रेखा नार्वेकर व शोभा लोंढे यांनी प्रशिक्षणार्थींची मुलाखत घेतली.

**जागतिक महिला दिन कार्यक्रम**

रेखा नार्वेकर व शोभा लोंढे यांनी मिळून 'जागतिक महिला दिन' कार्यक्रमांची तयारी केली. दिनांक ८ मार्च २०१० रोजी दुपारी २.३० वाजता कुमुद विद्यामंदिर, देवनार यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिलादिनानिमित्त कार्यक्रम घेतला. पाहुण्याचे स्वागत मा. मुग्धा फणसे यांनी केले. प्रास्ताविक मीनाताई पाटील यांनी केले. ममता कानडे यांनी सर्वाकडून एक प्रतिज्ञा म्हणून घेतली. महिला दिनांचे महत्व रेखा नार्वेकर यांनी सांगितले. वातावरण व मनाची होणारी जडणघडण या बाबत नीता प्रधान यांनी माहिती दिली. बचत गटातील दोन महिलांनी बचत गट कसा सुरु केला याबाबत माहिती मुलाखतीमधून दिली. बचत गटाचे महत्व व व्यसनमुक्ती याबाबत मा. विजया चौहान यांनी मार्गदर्शन केले.

**बचत गटाबाबत मार्गदर्शन**

दिनांक १५-०३-२०१० रोजी कुमुद विद्यामंदिर देवनार शाळेतील सकाळ व दुपारच्या प्राथमिक विभागातील महिला पालकांची एकत्र बैठकी घेवून शोभा लोंढे यांनी बचत गटाबाबतची माहिती दिली. तसेच त्यातनू येणाऱ्या अडचणी कशा सोडविण्यात याव्यात याबाबत माहिती दिली.

दिनांक ८ एप्रिल २०१० रोजी 'स्वयंसहाय्यता गटांची निर्मिती व बचतीचे मार्गदर्शन' या विषयावर श्री. स्वप्निल अभ्यंकर यांनी मार्गदर्शन केले. तसचे महिलांच्या उन्नत्तीसाठी विविध योजना/उपक्रम या बाबत सौ. मोलिना गुर्जर यांनी माहिती दिली. नवमहाराष्ट्र युवा अभियान व महाराष्ट्र महिला व्यासपीठ यांच्या संयुक्त विद्यमाने 'सहकारी गृहनिर्माण व्यवस्थापन प्रशिक्षण वर्ग' या संदर्भातील माहिती ममता कानडे यांनी दिली.

दिनांक ९ एप्रिल २०१० रोजी 'बचत गटाच्या माध्यमातून बँकेतर्फे आर्थिक सेवेची माहिती' श्री. स्वप्निल अभ्यंकर यांनी दिली. त्यानंतर लघुविमा योजनेबाबत श्री. मुकेश चौहान यांनी मार्गदर्शन केल. 'मार्केटिंग एक आव्हान' यावर श्री. सुधीर कदम यांनी माहिती सांगितली.

**सहकारी गृहनिर्माण व्यवस्थापन प्रशिक्षण कार्यशाळा**

दिनांक १२ एप्रिल २०१० रोजी नवमहाराष्ट्र युवा अभियान व महाराष्ट्र सोसायटी वेल्फेअर असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने 'सहकारी गृहनिर्माण संस्था व्यवस्थापन प्रशिक्षण' कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमांत मा. डॉ. सुधीर गोएल व मा. शरद काळे यांनी मार्गदर्शन केले. मा. रमेश प्रभु यांनी 'सहकारी गृहनिर्माण व्यवस्थापन प्रशिक्षण' कार्यशाळा कशा प्रकारे असेल याबाबत माहिती दिली. यावेळी संयोजिका रेखा नार्वेकर, कार्यकारी संयोजिका ममता रमेशचंद्र कानडे यांनीही आपले विचार व्यक्त केले.

मुंबईमध्ये अनेक सहकारी गृहनिर्माण संस्था आहेत त्यांचे कामकाज योग्य पद्धतीने चालण्यासाठी अनेक विषयांचे ज्ञान असणे आवश्यक आहे. हा विचार लक्षात घेऊन महाराष्ट्र शासनाचे सहकार विभाग, महाराष्ट्र सोसायटी वेलफेअर असोसिएशन व अनेक तज्ज्ञ यांच्या मदतीने अभ्यासक्रम तयार करण्यात आला. मुंबईमध्ये ह्या अभ्यासक्रमांची माहिती निरनिराळ्या माध्यमातून

देण्यात आल्यामुळे पहिल्याच बॅचमध्ये ५० प्रशिक्षणार्थीनी मार्गदर्शन घेतले. हे प्रशिक्षण सुमारे ३६ दिवस चालले व त्यानंतर प्रशिक्षणार्थीची ६०० मार्कांची परीक्षा घेऊन यशस्वी प्रशिक्षणार्थींना प्रमाणपत्र देण्यात आले.

कॉलेज ऑफ होम सायन्स, निर्मला निकेतन यांच्या संयुक्त विद्यमाने ''गृहव्यवस्थापन प्रशिक्षण'' हा दुसरा कोर्स घेण्यात आला. तिसरी बॅच १५ जून २०१० पासून सुरु करण्यात आली. ह्या बॅचमध्ये सुमारे ३० महिलांनी भाग घेतला. यामध्ये २७ विषय शिकविण्यात येतात. स्वत:चे आरोग्य, स्वत:ची स्वच्छता, स्वयंपाकघराची स्वच्छता, महिलांचे कायदे, संभाषण कला, आर्थिक व्यवस्थापन, वेळेचे व्यवस्थापन, वेगवेगळ्या प्रकारचे जेवण बनविणे ज्यामध्ये इटालियन, चायनिज, मुगलाई, साऊथ इंडियन, महाराष्ट्रीयन व बेक डिशेस असे साधारण १०० पदार्थ शिकविण्यात आले. ह्या बॅचची परीक्षा घेऊन त्यांना सर्टीफिकेट देण्यात आले.

दिनांक १९ एप्रिल २०१० रोजी मा. विरकर (मॅनेजमेंट डायरेक्टर आरे डेअरी) यांच्या सोबत ममता कानडे, शोभा लोंढे, दादू बापू पडवळ, शलाका साळवी इत्यादी मिळून बैठक झाली.

या बैठकीत मा. विरकर यांना विनंती केली कीआरे डेअरीचे भरपूर विभागात विक्रि करिता स्टॉल्स आहेत. त्या स्टॉल्स मध्ये बचत गटातील महिलांनी बनविलेले खाद्यपदार्थ विक्री करिता ठेवण्याची परवानगी देण्यात यावी. मा. विरकर यांना ही संकल्पना फार आवडली. ह्या स्टॉल्समध्ये विक्री करणारे पदार्थ कसे निवडले जातात हे त्यांनी सांगितले. सेंटर कँटीनमध्ये तयार केलेलेच पदार्थ अशा स्टॉल्समध्ये विकता येतील असे सांगण्यात आले. ह्या स्टॉल्सचे टेंडर ज्यांना मिळाले आहे. त्यांच्यासोबत चर्चा करुन ह्या महिलांना मार्गदर्शन करुन मदत करता आली तर नक्की आवडेल असे मा. विरकर यांनी सांगितले.

त्यानंतर मा. दादू पडवळ व शलाका साळवी यांच्याशी रेखा नार्वेकर, ममता कानडे व शोभा लोंढे मिळून असंघटित क्षेत्रातील व्यक्ती बाबत कशाप्रकारे कार्य चालू आहे याबाबत माहिती घेतली. असंघटीत घरेलू कामगार संघटनेचे सचिव श्री. पडवळ यांनी महाराष्ट्रात २५,००० महिला व घरेलू कामगार ह्यांचे रजिस्ट्रेशन आहे असे सांगितले. त्यांना महिन्यातून २ दिवसांची सुट्टी, दिवाळीला बोनस व इतर फायदे संघटनेतर्फे कसे मिळवून दिले गेले ते सांगितले.

**महिलां कार्यकर्त्यांची बैठक**

दिनांक २० एप्रिल २०१० रोजी सायन येथील शिव कल्याण केंद्रामध्ये २५ महिलांचा कार्यक्रम घेण्यात आला. ह्या केंद्रात मुख्यत्वे मार्गदर्शन करणाऱ्या मा. अनिता धनोरकर ह्यांच्या मदतीने हा कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमात रेखा नार्वेकर यांनी महाराष्ट्र महिला व्यासपीठाची माहिती दिली. त्यानंतर ममता कानडे यांनी यशवंतराव चव्हाण सेंटर मध्ये महाराष्ट्र महिला व्यासपीठ तर्फे सुरु केलेल्या 'गृहव्यवस्थापन प्रशिक्षण वर्ग' व 'सहकारी गृहनिर्माण व्यवस्थापन प्रशिक्षण वर्ग' या बाबत माहिती दिली. शोभा लोंढे यांनी बचत गट स्थापनेपासून ते हिशोब कशापद्धतीने करण्यात आला पाहिजे. तसेच बँक कर्ज घेताना कोणाच्या मदतीने घेता येते याबाबत माहिती दिली.

अंजली बचत गट, सूतखणी बचत गट व वैभव बचत गट इत्यादींचे प्रतिनिधी उपस्थित होते. विश्व हिंदू परिषद तर्फे हनुमान टेकडी येथे जो ट्रस्ट आहे त्या ट्रस्टमार्फत होणाऱ्या सर्व उपक्रमांची माहिती तेथील व्यवस्थापक पेडणेकर ह्यांनी दिली. गरीब गरजू लोकांना इथे विविध प्रकारचे प्रशिक्षण देण्यात येते. उदा. शिवणकाम, संगणकाचे वेगवेगळे प्रोग्राम शिकवले जातात. वेगवेगळ्या प्रकारच्या पिशव्या, तसेच सॉफ्ट टॉयही बनविण्याचे प्रशिक्षण देण्यात येते. किचन असल्यामुळे यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, महाराष्ट्र महिला व्यासपीठाचा येथे गृहव्यवस्थापन कोर्स सुरु करण्याचे ठरविले आहे. ह्या महिलांनी केलेल्या वस्तूंना मार्केट मिळवून देण्याचे रेखा नार्वेकर ह्यांनी आश्वासन दिले. त्याप्रमाणे कुलाबा महिला मंडळात एक स्टॉल रेखाताईनी उपलब्ध करुन दिला.

महाराष्ट्राच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त महाराष्ट्र महिला व्यासपीठ आणि रंगस्वर यांच्या संयुक्त विद्यमाने 'स्त्री-साहित्य-नव्या दिशा, नव्या वाटा' या विषयावर मंगळवार दिनांक ११ मे २०१० रोजी समग्र चर्चा आयोजित करण्यात आली.

या कार्यक्रमात अंदाजे ६० महिला सहभागी होत्या. या चर्चेच्या अध्यक्षा प्राचार्या पुष्पा भावे होत्या. उर्मिला पवार, कवयित्री नीरजा आणि मोनिका गजेंद्रगडकर यांनी या चर्चेत सहभाग घेतला होता. रेखा नार्वेकर आणि वृषाली मगदूम यांनी संवादक म्हणून चर्चेचे सूत्र सांभाळले होते.

स्त्रियांच्या लिखाणात झालेला बदल कविता, कथा, कादंबरी, आत्मचरित्र, चारित्र या सर्व साहित्यप्रकारातून गेल्या ५० वर्षात समाजाला कसा घडवित गेला. किंबहुना समाजातील

घडामोडींचं, परिवर्तनाचं प्रतिबिंब स्त्रीयांच्या लेखनात कसं उमटत राहिलं यावर सहभागी वक्त्याबरोबर अध्यक्ष प्रा. पुष्पा भावे यांनी आपले विचार मांडले. स्वान्तसुखाय लिहिण्यापेक्षा समाजाला उपयुक्त पडेल असे लिखाण असावे, असाही विचार मांडला गेला. कार्यकारी संयोजिका ममता कानडे यांनी सुरवातीला सर्वांचे फुले देऊन स्वागत केले. श्रोत्यांचा या कार्यक्रमास उत्तम प्रतिसाद होता.

नवी मुंबई स्वयंसेवी समन्वय संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार १९ जून २०१० रोजी सकाळी ११.०० ते ५.०० या वेळेत बचतगटातील महिलांसाठी स्वयंरोजगार प्रशिक्षण कार्यशाळा आयोजिण्यात आली होती. यावेळी सुरुवातीला नवीमुंबई स्वयंसेवी समितीच्या अध्यक्षा वृषाली मगदूम यांनी सर्वांचे स्वागत केले. त्यानंतर कार्यशाळेचे उद्‌घाटन सावित्रीबाई फुले यांच्या फोटोला हार घालून, महाराष्ट्र महिला व्यासपीठाच्या संयोजिक रेखा नार्वेकर यांनी केले.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या वतीने कार्यरत असलेल्या नवमहाराष्ट्र युवा अभियान, लिगल एड फोरम, रंगस्वर, कृषी सहकार विभाग इत्यादी विभागांची माहिती रेखा नार्वेकर यांनी आपल्या उद्‌घाटनपर भाषणात दिली.

त्यानंतर महाराष्ट्र महिला व्यासपीठाच्या वतीने घेण्यात येणाऱ्या स्वयंरोजगार प्रशिक्षण, कायदेविषयक कार्यशाळा, किशोरवयीन मुलींसाठी कार्यशाळा, उत्तुंग भरारी (महिलांना प्रोत्साहन धैर्य देण्यासाठी), गृहव्यवस्थापन प्रशिक्षण कार्यशाळा, सहकारी गृनिर्माण संस्था, प्रशिक्षण कार्यशाळा इत्यादी कार्यक्रम/ उपक्रम योजनांची माहिती रेखा नार्वेकर यांनी दिली.

अन्नपूर्णा महिला मंडळाचे सल्लागार श्रीयुत पिसाळ यांनी मंडळाच्यावतीने स्थापन केलेल्या ७०० बचत गटाविषयी आणि मायक्रो फायनान्स संबंधी माहिती दिली.

संध्याकाळच्या सत्रात महाराष्ट्र महिला व्यासपीठातर्फे प्रशिक्षक दिप्ती पटेल यांनी महिलांना फिनेल, अगरबत्ती, लिक्विड सोप आणि मेणबत्ती या वस्तू बनविण्याचे प्रशिक्षण दिले.

नूतन महिला मंडळ, स्त्री मुक्ती संघटना, महिला एकता संस्था, विश्व बालक केंद्र व संस्कार भारती अशा ३०-३५ सामाजिक संस्थांचे पदाधिकारी या शिबिराला उपस्थित होते. प्रश्नोत्तरांच्या देवाणघेवाणीतून महिलांनी महिलांसाठी संयुक्तविद्यमाने अनेक विधायक कार्यक्रम राबवावे असे ठरले.

❋ ❋ ❋



# सृजन आणि रंगस्वर
# कार्यवृत्त

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या, रंगस्वर विभागातर्फे शालेय विद्यार्थ्यांच्या विकासाकरता सृजन हा अभिनव उपक्रम चालविण्यात येतो. सृजनच्या माध्यमातून समाजातील मान्यवर व्यक्तींच्या सर्जनशीलतेचा अविष्कार विद्यार्थ्यांसोबत घडवून त्यांच्यामधील सुप्त कलागुणांना वाव देण्याचा हा प्रयत्न आहे.

सृजन संकल्पना आणि संयोजन मा. सुप्रियाताई सुळे यांची असून यामध्ये सन्मानीय सल्लागार म्हणून सुप्रसिद्ध चित्रकार श्री. डग्लस जॉन आणि सुलेखनकार श्री. शुभानंद जोग हे काम पहातात. दर महिन्याच्या पहिल्या रविवारी सृजन कार्यशाळा ९.०० वाजता चव्हाण सेंटरमध्ये आयोजित करण्यात येते. श्री. विद्याधर खंडे त्यांना सहाय्य करतात.

## सृजनतर्फे घेण्यात आलेले विविध कार्यक्रम

| क्रमांक | दिनांक | विषय | प्रशिक्षक |
|---|---|---|---|
| १ | ३ जानेवारी | स्टडी डेव्हलपमेंट | अरुण नाईक |
| २ | ७ फेब्रुवारी | रिसायकल मटेरिअल | विवेक टेटविलकर |
| ३ | ६ जून | ड्रॉईंग | डग्लस जॉन |
| ४ | ४ जुलै | ओरिगॅमी | सम्यका अहिरे |
| ५ | १ ऑगस्ट | क्ले | स्वाती गांगल आणि अमरजीत सिंह |
| ६ | ५ सप्टेंबर | कॅलिग्राफी | शुभानंद जोग |
| ७ | ३ ऑक्टोबर | सिव्हिल डिफेंस | सिव्हिल डिफेंस डिपार्टमेंट |
| ८ | ७ नोव्हेंबर | फोटोग्राफी | सुधाकर ओळवे |

## रंगस्वर

यशवंतराव चव्हाण सेंटरच्या मुंबई येथील सभागृहात विविध सांस्कृतिक कार्यक्रम रंगस्वरच्या वतीने नियमितपणे सादर केले जातात. सर्व सभासद व रसिकांसाठी विनामूल्य प्रवेश दिला जातो. श्री विजय देसाई व सहकारी त्याचे नियोजन व आयोजन करतात.

# यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय ग्रंथालय
# कार्यवृत्त

ग्रंथालय या संकल्पनेचे आस्तित्व २५ शतकापूर्वीचे आहे असे मानले जाते. ग्रंथालयाचे महत्व हे सर्वसामान्य आहे. ती एक सामाजिक संस्था आहे, ज्यात ज्ञानाचे पेव दडलेले आहे. ग्रंथालयास संस्कृतीचे मंदिर असेही म्हटले जाते. दुसऱ्या महायुध्दानंतरच्या औद्योगिक क्रांतीच्या पार्श्वभुमीवर जेव्हा छापखान्याचा शोध लागला तेव्हापासून ग्रंथालय चीनमध्ये झाँग डायनॅस्टीच्या (CA110040) काळात होते. यामध्ये जवळजवळ २००० दगडावर कोरलेले ग्रंथ होते. हे ग्रंथालय पुढील पाच शतकात विकसित होत गेले व टिकले. मोठ्यात मोठ्या असलेल्या ग्रंथावर - म्हणजे दगडावर कविता, गोष्टी व ऐतिहासिक दस्तऐवज कोरलेले होते.

पुराणकाळची ग्रंथालये ही समाजातील उच्च सुशिक्षित अशा छोटयाशा समुहासाठीच उपलब्ध होती. मध्यकाळातील विद्यापीठ ग्रंथालये ही Chained Book साखळदंडाने बांधलेल्या ग्रंथसंग्रहासाठी प्रसिध्द होती. १९ व्या शतकात सार्वजनिक ग्रंथालय चळवळ अस्तित्वात आली आणि ग्रंथालयाचा खऱ्या अर्थाने वाचकाभिमुख प्रवास सुरु झाला. तालिकेच्या आधारे शोधलेले ग्रंथ कांऊटरपलीकडून दिले जाऊ लागले. २० व्या शतकात मुक्तदार (Open Access) पध्दतीचा स्वीकार ग्रंथालयानी केला.

आजच्या घडीस आपण डिजीटल ग्रंथालयाच्या उबंरठ्यावर उभे आहोत. माहितीच्या क्रांतीमुळे व माहिती तंत्रज्ञानाच्या विकासामुळे माहितीच्या हाताळणीत तांत्रिक अश्वशक्ती उपलब्ध झाली आहे.

पारंपारिक पुस्तके व मासिके संबंधित सेवा देणाऱ्या ग्रंथालयात काळानुरूप संगणकीय ग्रंथालयांच्या युगातील ई-माहितीपत्रकाद्वारे निवडक माहिती वितरक वृत्तपत्र, कात्रण, मानके ट्रेड कॅटलॉग हे पारंपारिक ग्रंथालयीन सेवा उपलब्ध होत्या, या सेवांना मिळणारा वाचकांचा ग्रंथालय सेवेला संगणकांच्या आधुनिक माध्यमातून डिजिटल लायब्ररीचे स्वरुप प्राप्त झाले. ग्रंथालयीन सेवा अचूक व्यवस्थापन व माहिती तंत्रज्ञान या शास्त्राचा योग्य वापर केल्यामुळे ज्ञानव्यवस्थापनास महत्व आले आहे.

जागतिक स्थरावर ज्ञान आणि माहिती हे एक खणखणीत वाजणारे चलन बनले आहे. त्यामुळेच ज्ञान व्यवस्थापन शास्त्रात डिजीटल ग्रंथालयाला महत्त्व आले आहे. आधुनिक डिजीटल ग्रंथालयात इंटरनेट पासून ते ग्रंथालय नेटवर्क पर्यन्त संगणकीय युगातील डिजीटल, लायब्ररी, नॉलेज मॅनेजमेंट, मशिन लर्निंग या शास्त्राचे काळानुरूप वाढते महत्व लक्षात घेता ज्ञानव्यवस्थान क्षेत्रात डिजीटल ग्रंथालयास महत्त्वाचे स्थान आहे, विशेष म्हणजे इंटरनेटच्या सहाय्याने ग्रंथालयीन नेटवर्क उदा. डेलनेट, इन्फलीबवेट, अरनेट इ. च्या माध्यमातून वाचकांना ऑनलाईन ग्रंथालयीन सेवा देता येतात.

**निवडक माहिती प्रसारण:**

ग्रंथालयाची उपयुक्तता प्रमुख व्यवस्थापकापासून ते सर्व विभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना असते, त्यानुसार सर्वोच्च अधिकारी, मनुष्यविकास, संशोधन, लॉजिस्टीक्स अशा सर्व विभागातील त्यांच्या उपयुक्त सतत माहितीचे वितरण केल्यास ज्ञानव्यवस्थापनाचे महत्व लक्षात येते, वाचकाकरिता नेटद्वारे उपयुक्त माहिती शोधणे व ती वेगवेगळ्या विषयानुसार ऑनलाईन-ई मेल न्युजरने प्रसारित करणे, विषयानुसार मथळा व शोधलेली माहिती संक्षिप्त रुपात संगणकात सुरक्षित ठेवून ती डेटाबेसमध्ये वापरता येते.

विसाव्या शतकाच्या सुरुवातीच्या काही वर्षात औद्योगिकरण सुरु झाले. तेव्हा विशेष ग्रंथालये अस्तित्वात येऊ लागली. त्या वेळच्या औद्योगिक व व्यावसायिक संस्थांची ग्रंथालये ही आजच्या विशेष ग्रंथालयाची सुरुवात होती. संसद, सरकारी विभाग, संशोधन विभाग, व्यावसायिक व औद्योगिक संघ संग्रहालये अशा संस्थाची ग्रंथालये ही ग्रंथालये असतात.

मागील काही वर्षात शास्त्रीय व इतर संशोधनाचा वेगाने विकास होऊ लागला आणि माहितीच्या संप्रेषनाच्या साधनामध्ये बदल झाले. दररोज होत असलेले नवीन संशोधन व नवे शोध यामुळे लिखित ज्ञानात व माहितीत भर पडली. अशी प्रचंड प्रमाणातील माहिती जमवून ठेवणे व तिच्या उपविषय यावरील माहितीची व्यवस्था करण्यासाठी विशेष केंद्राची गरज निर्माण

झाली. माहिती संग्रहीत करुन प्रतिप्राप्ती करुन देण्यासाठी त्या केद्रांना इतर मोठ्या ग्रंथालयावर अवलंबून राहावे लागले. म्हणून विशेष ग्रंथालये अस्तित्वात आली आहेत. विशिष्ट संस्थेसाठी वा संशोधनासाठी माहिती मिळविणे, तिचे निर्देशन आणि प्रसारण करणे यासाठी जबाबदार असणारा विभाग म्हणून विशेष ग्रंथालयांना महत्त्व आहे.

गेल्या वीस वर्षात विज्ञान आणि तंत्रज्ञानाने जी झेप घेतली आहे, त्यामुळे माहितीच्या क्षेत्रात लक्षणीय परिवर्तन झाले आहे. सध्याचे युग हे माहिती तंत्रज्ञानाचे युग असून या तंत्रज्ञानाचा विकास झपाट्याने होत आहे. ग्रंथालय व माहिती केंद्रे हे माहिती तंत्रज्ञानाचे जवळचे क्षेत्र असल्याने जास्तीत जास्त प्रगत माहिती-तंत्रज्ञानाचा वापर या क्षेत्रात होत आहे. सध्या सर्वत्र ग्रंथालये व माहिती केंद्रे स्थानिक, प्रादेशिक आणि जागतिक पातळीवर स्थापन झाली आहेत आणि ती ज्ञान प्रसाराच्या क्षेत्रात महत्वाची भुमिका बजावत आहेत. ग्रंथालयामधून संदर्भ ग्रंथ, ग्रंथ पुस्तिका, नियतकालिके आणि इतर वाचन साहित्य विषयाप्रमाणे व्यवस्थित ठेवलेले असते. विज्ञान आणि माहिती तंत्रज्ञान युगात ग्रंथालयातून एखाद्या विषयावर विद्यार्थी विद्वान व संशोधक यांना स्थूल अथवा सूक्ष्म माहिती सेवा ग्रंथालयांना द्यावी लागते. ग्रंथालयांना माहिती जमवणे, तिचे प्रसारण व परिचलन करणे, प्रदर्शन करणे ती माहिती सुरक्षित ठेवणे आणि प्रतिप्राप्ती करणे हि कामे करावी लागतात.

ऑटोमेशन आणि ग्रंथालयातील जाळे (नेटवर्क) यांनी ग्रंथालयातील साधन संपत्तीच्या देवघेवीला नवी दिशा दिली आहे, या अनुषंगाने वाचकाना माहिती सेवेकरीता आपल्या ग्रंथालयांनी विविध ग्रंथालयीन नेटवर्कच्या सुविधा पैकी डेलनेटची (डेव्हलपिंग लायब्ररी नेटवर्क) सुविधा देण्याचा उपक्रम सुरु केला आहे.

**ग्रंथालयाविषयी माहिती**

यशवंतराव चव्हाण ग्रंथालयामध्ये समाजशास्त्र, राज्यशास्त्र, शेती, सहकार, इतिहास, कायदा, संस्कृती इत्यादि विषयांवरील पुस्तके, चरित्रे व आत्मचरित्रे, धर्मकोष, विश्वकोष, मराठी विश्वकोष, गॅझेटियर, ॲटलॉस, इअर बुक, डिक्शनरीज इत्यादि संदर्भ ग्रंथ उपलब्ध आहेत. तसेच वेळोवेळी संबंधित विषयाला अनुसरुन नवीन पुस्तके ग्रंथालयासाठी घेण्यात येतात. ग्रंथालयामध्ये एकदंरीत २०,१९० इतका ग्रंथसंग्रह उपलब्ध करण्यात आला आहे. ग्रंथालयामध्ये असलेली पुस्तके आणि नव्याने खरेदी करण्यात येणारी पुस्तके वाचताना सहज उपलब्ध व्हावी याकरीता ओपॅक, कॅटलॉग सुरु केला आहे. यामध्ये लेखक, ग्रंथनाम, प्रकाशन, विषय, वर्गांक यासंज्ञेच्या सहाय्याने वाचताना माहिती मिळविता येते आणि पाहिजे त्या ग्रंथाचा शोध घेता येतो.

**ग्रंथालयाचे नियम:**

यशवंतराव चव्हाण ग्रंथालयाचे सभासद होण्याकरिता नमुना अर्ज तयार केला आहे. या अर्जामध्ये स्वत:च्या हस्ताक्षरात परिपूर्ण माहिती भरून त्यासोबत पुढीलप्रमाणे वर्गणी भरणे आवश्यक आहे.

**अ) सर्वसाधारण सभासद:**

सर्वसाधारण सभासदाकरिता रु. २५०/- वार्षिक वर्गणी तसेच रु. २५०/- अनामत रक्कम (१९९६ पासून)

**ब) विद्यार्थी सभासद:**

महाविद्यालयीन/उच्चशिक्षण/संशोधक विद्यार्थ्याकरिता वार्षिक रु. ५०/- नाममात्र वर्गणी व अनामत रक्कम रु. १००/-

**क)** यशवंतराव चव्हाण ग्रंथालयामध्ये संदर्भाकरिता काही विद्यार्थी एक दिवस ते एक आठवडा या कालावधीकरिता ग्रंथालयाचा लाभ घेतात. या विद्यार्थ्याकडून रु. १५/- एका आठवड्याला फी आकारण्यात येते. त्यांच्याकडून फक्त एका कार्डवर त्यांची वैयक्तिक माहिती भरुन घेण्यात येते.

**ड)** माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनी शिक्षण घेणारे विद्यार्थी संगणकविषयक पुस्तकांचा लाभ घेतात. त्याकरिता ग्रंथालय वेगळी फी आकारत नाही.

**इ-१) संयुक्त संस्था सभासदत्व (Corporate Membership)**

कार्पोरेट या शब्दाच्या व्याख्येत बसणारी संस्था या सभासदत्वासाठी पात्र असेल. एकावेळची वर्गणी रु. ५०,०००/-, ५ वर्षासाठी.

अनामत रक्कम: सर्वसाधारणपणे अनामत रक्कम घेण्यात येणार नाही. परंतु एखाद्या दुर्मिळ व किंमती पुस्तकासाठी प्रतिष्ठान निश्चित करेल तेवढी रक्कम घेण्यात येईल.

एका वेळी देण्यात येणारी पुस्तके: एकावेळी जास्तीत जास्त १० पुस्तके देता येतील.

**इ-२) संस्था सभासदत्व (Institutional Membership)**

या साठी शिक्षण व संशोधन संस्था व सांस्कृतिक संस्था पात्र राहतील. परंतु शिक्षण व संशोधन संस्था ही युजीसी आय.सी.एस.एस.आर., आय. सी. सी. आर किंवा आय. सी. एच.

आर. यांच्याकडून मान्यता प्राप्त झालेली असावी, तर सांस्कृतिक संस्था ही महाराष्ट्र शासन, केंद्र शासन किंवा मान्यता प्राप्त अधिघोषित विद्यापीठ यांनी मान्यता दिलेली असावी.

**संस्था सभादत्वासाठी:** प्रवेश फी रु. १,०००/- ना परतावा

**वार्षिक वर्गणी:** रु. ५,०००/-

**दिर्घ कालावधीसाठी संस्था सभासद:** एकावेळी ५ वर्षासाठी वर्गणी रु. २०,०००/-

**एका वेळी देण्यात येणारी पुस्तके:** एकावेळी जास्तीत जास्त १० पुस्तके देण्यात येतील. इ-१ व इ-२ येथील सभासदत्व हे संबंधित संस्थेच्या प्रमुखास देण्यात येईल. त्यांना ग्रंथालयाचे ओळखपत्र देण्यात येईल. संस्थेच्या प्रमुखास आवश्यक वाटल्यास ते त्यांच्या एक किंवा दोन कर्मचाऱ्यांना त्यांच्या वतीने पुस्तके घेण्यास/परत करण्यास नामनिर्देशित करु शकतील, नामनिर्देशन अधिकृत पत्राने करावे लागेल. मात्र पुस्तके अबाधितपणे वेळेवर परत करणे व ग्रंथालयाच्या नियमांचे पालन करणे यांची जबाबदारी संस्था प्रमुखांची असेल.

वरील सभासदत्व देण्याचा किंवा कारण न देता नाकारण्याचा पूर्ण अधिकार प्रतिष्ठानला राहील.

**सर्वसाधारण सभासद:** सभासदांना एकावेळी एक पुस्तक/ग्रंथ देण्यात येईल ते आठ दिवसात परत करणे आवश्यक आहे. तसेच संदर्भग्रंथाचा उपयोग ग्रंथालयातच करता येईल. संदर्भ ग्रंथ घरी नेता येणार नाही. पुस्तकाची किंमत भरलेल्या अनामत रक्कमेपेक्षा जास्त असेल तेव्हा अधिक अनामत रक्कम किंवा त्या पुस्तकांच्या किंमत भरलेल्या अनामत रक्कमेपेक्षा जास्त असेल तेव्हा अधिक अनामत रक्कम किंवा त्या पुस्तकांच्या किमंतीएवढी अनामत रक्कम भरुन पुस्तक घरी नेता येईल.

महाविद्यालयीन व उच्चशिक्षण घेणारे विद्यार्थी/संशोधक यांना ग्रंथ, संदर्भ ग्रंथ, नियककालिके ग्रंथालयात बसून वाचण्यासाठी/संदर्भासाठी देण्यात येतात. घरी/ग्रंथालयाबाहेर नेमण्याकरिता देण्यात येणार नाही.

* * *

# विभागीय केंद्र, नाशिक
# कार्यवृत्त

### कागदी होड्या बनविण्याची कार्यशाळा

बालवयापासूनच विद्यार्थ्यांनी आपल्याजवळ असलेल्या उपजत कलेची जपणूक करावी व अभ्यासाबरोबरच कलागुणांचा विकास होण्यासाठी प्रयत्न करावेत त्यासाठी विविध स्पर्धा, शिबिरे यात सहभागी होऊन स्वत:चा अष्टपैलू विकास साधावा तोच खरा आनंदी जगण्याचा मार्ग आहे. असे प्रतिपादन सुप्रसिध्द बांधकाम व्यावसायिक सुनिल कोतवाल यांनी केले.

शालेय विद्यार्थ्यांसाठी सुप्रसिद्ध ओरिगामी कलाकार मधुकर आठल्ये यांच्या 'कागदी होड्या' बनविण्याच्या प्रात्यक्षिक कार्यशाळेच्या उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते.

ते म्हणाले की, जीवनाकडे सकारात्मक दृष्टीने बघण्यासाठी कलेचा निश्चितच उपयोग होतो व जीवनात उमेद निर्माण करण्यासाठी त्याचा उपयोग करावा व आपल्यातील क्षमतेचा विकास साधावा.

कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक करतांना कोषाध्यक्ष विश्वास ठाकूर म्हणाले की, शालेय, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी व्यक्तिमत्व विकासाचे विविध उपक्रम सातत्याने राबविण्यात येतात. त्या निमित्ताने त्यांच्या सर्जनशीलतेला मुक्त व्यासपीठ करुन देण्याचा प्रतिष्ठानचा प्रयत्न आहे.

यावेळी मधुकर आठल्ये यांनी होड्यांच्या गमतीदार जन्मकथा व होड्या बनविण्याच्या साध्या, सोप्या पद्धती सांगत उपस्थित विद्यार्थ्यांकडून होड्या बनवून घेतल्या. त्यात होडकं, शिकारी होडी, काळू-बाळू होडी, रॉकेट होडी, भरारी होडी, मयूरपंखी होडी, नाग होडी, म्हातारीचा बुड होडी, तरते रंगमंच होडी, फुलपाखरु होडी, राजा-राणी होडी, सुळकाशीड होडी अशा विविध प्रकारच्या होड्यांचा समावेश होता.

या कार्यशाळेसाठी नाशिकमधील विविध शाळांमधील विद्यार्थ्यांनी उत्स्फुर्त प्रतिसाद दिला. विनायक रानडे यांनी आठल्ये यांचा परिचय करुन दिला.

### पोलिस प्रशासनाची नवी दिशा-व्याख्यान

देशातील पोलिस प्रशासन व्यवस्था कालबाह्य झाली असून यात बदल करणे आवश्यक असल्याचे मत मुंबईचे विशेष पोलिस महानिरीक्षक सुरेश खोपडे यांनी केले. यशवंतराव चव्हाण यांच्या ९७ व्या जयंतीनिमित्त प्रतिष्ठानच्या नाशिक विभागीय केंद्राच्यावतीने प्रतिष्ठानच्या सभागृहात 'पोलिस प्रशासनाची नवी दिशा' या विषयावर आयोजित करण्यात आलेल्या व्याख्यानात खोपडे बोलत होते. यावेळी मार्गदर्शन करतांना ते म्हणाले की, ''भारतात प्रचलित असलेली पोलिस व्यवस्था कालबाह्य झाली आहे. रोज निर्माण होणाऱ्या समस्यांना तोंड देण्यात सध्याची यंत्रणा अपुरी पडत आहे. २६ नोव्हेंबर रोजी मुंबईवर झालेला दहशतवादी हल्ला सर्व जगाने दूरचित्रवाहिन्यांवरुन बघितला. देशावर हल्ला करण्यासाठी पाकिस्तानातून आलेल्या अतिरेक्यांचा मुकाबला करण्यास सर्व यंत्रणा अपुरी पडली ही पोलिसांची हतबलता आहे. दहा अतिरेक्यांचा सामना करण्यासाठी वेळप्रसंगी दहा जवान तयार होऊ शकत नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. अतिरेक्यांचे संकट प्रत्येकाच्या दारासमोर उभे ठाकल्याने सध्याची पोलिस यंत्रणा बदलण्याची गरज आहे.

कार्यक्रमाचे प्रास्तविक व स्वागत प्रतिष्ठानचे कोषाध्यक्ष विश्वास ठाकूर यांनी केले. सुरेश खोपडे यांचा परिचय दिपाली मानकर यांनी करुन दिला. याप्रसंगी विश्वस्त गुरमित बग्गा, अश्विनी बोरस्ते आदी मान्यवर उपस्थित होते.

### यशवंत काव्योत्सव

कलाकृतीचे वर्गीकरण करता येत नाही. मानवी जीवनाविषयीच ती बोलत असते. कलाकृती सुंदर तर असलीच पाहिजे; पण तितकीच ती अस्वस्थही करणारी असावी. कवितेचा अर्थ उलगडण्यासाठी तिचे सूक्ष्म वाचन आवश्यक असल्याचे प्रतिपादन कवी वसंत आबाजी डहाके यांनी यशवंत काव्योत्सवाच्या उद्‌घटनाप्रसंगी बोलताना केले.

उत्तर महाराष्ट्रातील कवींना व्यासपीठ मिळावे यासाठी सावरकरनगर येथील सभागृहात यशवंत काव्योत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी प्रतिष्ठानचे अध्यक्ष विनायकदादा पाटील होते. यावेळी साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल वसंत आबाजी डहाके यांचा नाशिककरांच्या वतीने विनायकदादा

पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी कवितेविषयी मुक्त चिंतन करताना डहाके यांनी सांगितले की, 'आशय शब्दात मांडता येत नाही. केवळ त्यांचे रसग्रहण करता येते. कविता ही शब्दांनीच लिहिलेली असते; पण तिचा अर्थ शब्दांनी सांगता येत नाही. तो आतून जाणवत असतो. भिन्न भिन्न वाचकांना कवितेचा वेगवेगळा अर्थ जाणवतो. हा अर्थ पोहोचणे म्हणजे कलाकृतीच्या साक्षात्काराचा क्षण म्हणता येईल. कलाकृतीने आनंद देण्याबरोबरच अस्वस्थही केले पाहिजे. तेच त्या कलाकृतीचे साध्य असते.'

सूत्र संचालन प्रतिष्ठानचे कोषाध्यक्ष विश्वास ठाकूर यांनी केले. विनायक रानडे यांनी परिचय करुन दिला, तर चारुहास कुलकर्णी यांनी काव्योत्सवाची भूमिका स्पष्ट केली. प्रारंभी शिक्षणमहर्षी भाऊसाहेब थोरात, नाट्यनिर्माता मोहन वाघ, कविवर्य विंदा करंदीकर या दिवंगतानां श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

स्वानंद बेरकर व अभय सदावर्ते यांनी 'गोदातटीचा काव्यतिहास' या कार्यक्रमातून नाशिकच्या दिवंगत कवितांचा अभ्यासपूर्ण वेध घेतला.

काव्योत्सवाच्या दुसऱ्या सत्रात अनेक मान्यवर कवींनी आपल्या कविता सादर केल्या. निसर्गातून देवत्वाचा अंश कसा दिसतो, त्याचे प्रत्यंतर कमलाकर देसले यांनी त्यांच्या 'पाहिले पत्थरातून डोलणारे फूल मी, ईश्वरा घेतली बघ तुझी चाहूल मी' या कवितेतून उलगडून दाखविले, तर संदीप देशपांडे यांनी 'दंगलीचे वृत्त पसरताच, पाखरं स्तब्ध झाली, स्वच्छंदीपणा हिरावून घेणाऱ्या माणसाच्या वृत्तीविरुद्ध पाखरं आता आंदोलनाच्या तयारीत आहे' अशी दंगलीतले क्रौर्य उलगडून दाखविणारी कविता सादर केली. त्याशिवाय सुरेश मेणे (वर्तमानपत्र), हर्षाली देशमुख (देश है या मंदिर है ये), रजनी ठाकूर (तनहाई), शशीकला देशमाने (मां मै तेरा भी अंश), काशीनाथ वेलदोडे (जीवन एक सुलभ शौचालय), राम पाठक, योगेश जाधव (आकाश), प्रशांत केदळे (कविता), संजीव अहिरे (हताश नोटा), दयाराम अहिरे (कष्टकरी बाप), गणेश मोहाळ (शहरातील पोरी), विनय मिठे (शेतकऱ्याचा आसूड), गिरीश पाटील (मी मंदिर सोडून हिंडतो), स्मिता जाधव (गझल), राजेंद्र सोमवंशी (लेक), अशोक भालेराव (धरती झाली कोरी), निशिगंधा घाणेकर (सोनसळी-सोनसळी), सोमनाथ साखरे (गझल), अरविंद गाडेकर (महागाईची चव), ज्ञानेश अकसाल (धूळ आणि माती), सविता पन्हाळे (प्रिया) आदि कवींनी कविता सादर केल्या. प्रख्यात कवी अरुण म्हात्रे यांनी अत्यंत प्रभावीपणे सूत्रसंचालन करुन कार्यक्रमात रंगत भरली.

**सुजाण नाट्य प्रशिक्षण शिबीर**

नाट्य कलेविषयी अभिरुची व जाणीव घडण्यासाठी व व्यक्तिमत्व विकासासाठी नाट्य प्रशिक्षण शिबीर ही महत्वाची गरज असून त्यातूनच उद्याचे नाट्य-चित्रपट क्षेत्रातील कलाकार निर्माण होतील व कलेचा नवा अविष्कार पेश करतील असे प्रतिपादन अखिल भारतीय नाट्य परिषदेचे कार्यवाह जयप्रकाश जातेगावकर यांनी केले. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, विभागीय केंद्र नाशिकतर्फे आयोजित सुजाण नाट्य प्रशिक्षण शिबिराच्या समारोपप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. श्री. जातेगावकर पुढे म्हणाले की, आजच्या रंगभूमीला, चित्रपट क्षेत्राला नव्या लेखक, दिग्दर्शक कलाकारांची गरज असून अशा शिबिरातूनच प्रतिभावंत कलावंत निर्माण होतील. यासाठी कुठल्याही स्पर्धेत न अडकता प्रामाणिकपणे काम करीत राहणे हे कलाकाराने पहिले कर्तव्य मानले पाहिजे. यावेळी त्यांनी कला क्षेत्रातील बदल, नाटक-चित्रपटांचे समकालीन विषय यांचाही आढावा घेतला. यावेळी जातेगावकर यांच्या हस्ते सहभागी शिबिरार्थींना प्रशस्तीपत्रे देण्यात आली. शिबिराच्या मार्गदर्शक सुप्रसिद्ध अभिनेत्री अनिता दाते म्हणाल्या, मुंबई, पुण्या बाहेरच्या कलावंतांमध्ये आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी अशी शिबिरे पूरकच आहेत. शिबिरार्थींनी यावेळी पर्यावरण संतुलन, सामाजिक एकोपा या विषयावरील नाटीका सादर केल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विनोद राठोड यांन केले. या शिबिरात वाचिक अभिनय, शब्दोच्चार अशा अनेक विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले.

**सुवर्णयुगाच्या स्वप्नांसाठी - व्याख्यानमाला**

हिंदवी स्वराज्यासाठी लढणे हा वारसा छत्रपती शिवाजी महाराजांनी महाराष्ट्राला दिलेला आहे. वारकरी-भक्तीसंप्रदायाने महाराष्ट्र जागा केला. अखंड भारतासाठी लढणे आणि भारताच्या सुवर्णयुगाचे स्वप्न पाहणे हे महाराष्ट्राचे काम असल्याचे प्रतिपादन चाणक्य मंडळाचे संस्थापक अविनाश धर्माधिकारी यांनी नाशिक वसंत व्याख्यानमालेत बोलताना केले.

यशवंतराव महाराज पटांगणावर यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या नाशिक विभागीय केंद्राच्या सहकार्याने आयोजित व्याख्यानमालेत 'सुवर्णयुगाच्या स्वप्नांसाठी' या विषयावर बोलताना धर्माधिकारी यांनी सांगितले की, महाराष्ट्राचा आत्मा दोन सूत्रात बांधलेला आहे. 'अवघे विश्वची माझे घर' असे सांगणाऱ्या ज्ञानोबा आणि तुकोबांचा वारसा महाराष्ट्राला लाभलेला आहे. तिथे अद्वैत भक्ती आहे. विषमतेला थारा नाही. एकच ईश्वर सर्वांमध्ये भरलेला आहे. दुसरे सुत्र हे हिंदवी स्वराज्याचे स्वप्न आहे. महाराष्ट्राने

भारतासाठी लढायेच त्यात महाराष्ट्राचे महाराष्ट्रपण आहे. छत्रपती शिवरायांनी विशिष्ट जातीच्या भल्यासाठी लढण्याचा वारसा दिलेला नाही. उभा हिंदुस्थान परकीयांच्या जोखडातून मुक्त करण्याचे सांगणारे शिवाजी महाराज हे एकमेव महापुरुष होते. महाराष्ट्राला पराक्रमाचा वारसा आहे. मराठ्यांच्या इतिहासाचा आम्हा सर्वांना अभिमान आहे. जातीचे दुकान चालवून सत्तासंघर्ष करणे यात महाराष्ट्रपण नाही. हिंदुस्थानची समृद्धी हे प्रत्येकाचे स्वप्न असले पाहिजे. सुवर्णयुगाच्या स्वप्नासाठी प्रत्येकाने पेटलेली समिधा बनावे. आपण वेळेत शहाणे झालो तर सुवर्णयुगाकडे वाटचाल सुलभ होऊ शकते, असेही धर्माधिकारी यांनी सांगितले.

स्वातंत्र्यानंतर नवा भारत उदयाला आला आणि आज ६३ वर्षानंतरही राष्ट्रीयत्वाची भावना टिकवून ठेवत भारत आव्हानांना पुरुन उरतोय. भारताचे अनेक तुकडे होतील हे अनेकांनी वर्तवलेले भाकीत भारतीय जनेच्या एकतेने खोटे ठरविले आहे. भारतीय लोकशाही बळकट राज्यघटनेच्या पायावर भक्कमपणे उभी असल्याचे सांगितले.

अविनाश धर्माधिकारी यांचा परिचय प्रतिष्ठानचे कोषाध्यक्ष विश्वास ठाकूर यांनी करुन दिला. याप्रसंगी वसंत व्याख्यानमालेचे अध्यक्ष श्रीकांत बेणी, वसंतोत्सवाचे अध्यक्ष अनंत राजेगावकर, कार्याध्यक्ष मधुकर झेंडे, अशोक देशमुख, अरुण शेंदुर्णीकर, सावळीराम तिदमे व असंख्य रसिक उपस्थित हाते.

**असाही एक महाराष्ट्र – छायाचित्र प्रदर्शन**

नागरी विकासापूसन खूप दूर असलेल्या आणि आर्थिक संपन्नतेच्या जंजाळात दुलर्क्षित आणि उपेक्षित राहिलेल्या बिनचेहऱ्यांच्या माणसांचा महाराष्ट्र प्रसिद्ध छायाचित्रकार संदेश भंडारे यांनी आपल्या कॅमेऱ्यात बंदिस्त केला आणि महाराष्ट्राच्या सुवर्णमहोत्सवी वर्षाचे औचित्य साधत छायाचित्र प्रदर्शनाच्या माध्यमातून 'असाही एक महाराष्ट्र' नाशिककरांसमोर चिंतनासाठी ठेवला.

या छायाचित्र प्रदर्शनाचे उद्‌घाटन प्रसिद्ध लेखक दीनानाथ मनोहर यांच्या हस्ते झाले. संदेश भंडारे यांनी आपल्या छायाचित्रांतून कष्टकरी समाजाचे जगणे परिणामकारकरित्या टिपले असून, महाराष्ट्रातील समाजजीवनाचा चेहरा नागरी जीवन अनुभवणाऱ्या नागरिकांसमोर आणला आहे. त्यांनी छायाचित्राला कलेच्या पातळीवर नेऊन ठेवले आहे. एका चौकटीत जगण्याचे वास्तव दाखविण्यात भंडारे यशस्वी ठरल्याचे दीनानाथ मनोहर यांनी यावेळी बोलताना सांगितले. ते म्हणाले की, धार्मिक चित्रांमध्ये पहाणाऱ्याच्या मनावर ठसवण्यासाठी देवाचे चित्र मोठे रेखाटले जाते तसे भंडारे यांनी विषयातील आकर्षक घटक परिणामकारक पद्धतीने प्रेक्षकांच्या मनावर बिंबवला आहे. नागरी जीवनापासून दूर असलेल्या ग्रामीण जीवनाचे अस्सल दर्शन त्यांच्या छायाचित्रातून घडते. सामान्य माणसाच्या नजरेतून सुटलेल्या संवेदनशील वास्तवाचे चित्रण येथे दिसते.

यावेळी मनोगत व्यक्त करताना संदेश भंडारे म्हणाले, घडणाऱ्या प्रसंगाचा छायाचित्रकार म्हणून मनावर होणारा परिणाम हे या प्रदर्शनामागचे सूत्र आहे. माणसांचा, त्यांच्या जगण्यामरण्याशी निगडित विषयांचा शोध या प्रयोगातून पोहचावा हा 'असाही एक महाराष्ट्र' या प्रदर्शनाचा उद्देश आहे. याप्रसंगी प्रतिष्ठानचे विश्वस्त गुरुमित बग्गा, विनायक रानडे, ज्येष्ठ चित्रकार शिवाजी तुपे, चित्रकार मुक्ता बालिगा, बाळ नगरकर, अशोक धिवरे आदि उपस्थित होते. कार्यक्रमाचे स्वागत व सूत्रसंचालन हरिभाऊ कुलकर्णी यांनी केले.

**पर्यावरण शिक्षण शिबीर**

पृथ्वीवरील नैसर्गिक स्त्रोत मर्यादित असल्यामुळे विकासाला मर्यादा येणारच, याची जाणीव आता होऊ लागलेली आहे. म्हणूनच मानवी महत्वाकांक्षेला लगाम घालणे गरजेचे बनले आहे. दुय्यम गरजांसाठी पर्यावरणीय संसाधनांचा अवाजवी वापर थांबवणे ही काळाची गरज बनली आहे, असे प्रतिपादन यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईचे सरचिटणीस शं. ग. काळे यांनी केले. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, विभागीय केंद्र नाशिक व विश्वास ज्ञान प्रबोधिनी अ‍ॅण्ड रिसर्च इन्स्टिट्यूट यांच्यातर्फे आयोजित तीन दिवसीय पर्यावरण शिक्षण शिबिराचा समारोप करतांना ते बोलत होते. ते पुढे म्हणाले की, सौरऊर्जेच्या तंत्रज्ञानात क्रांतिकारक विकास घडून आल्यास ऊर्जेची फार मोठ्या प्रमाणातील गरज भागू शकते. विशेषत: भारतीय उपखंडाला या सौरऊर्जेचा फायदा होऊ शकतो, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

माजी वनमंत्री व यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नाशिकचे अध्यक्ष विनायकदादा पाटील म्हणाले की, पर्यावरणाचा ऱ्हास मानवाने आपल्या सोईसाठी केलेला आहे. आता त्याचे दुष्परिणाम जाणवू लागत असल्यामुळे पर्यावरण संरक्षणासाठी प्रयत्न होतांना दिसत आहेत. याकामी स्थानिकांचा सहभाग महत्वाचा राहणार आहे.

कोषाध्यक्ष विश्वास ठाकूर म्हणाले की, या क्षेत्रामध्ये कार्य करणाऱ्या सामाजिक संस्था, संघटनांनीही पर्यावरण संरक्षणासाठी विकास कामांना नुसता विरोध न करता विकास व पर्यावरण संवर्धन यांचे संतुलन कसे साधता येईल, यासाठी पर्याय सुचवावेत.

पर्यावरणतज्ज्ञ पार्थ बापट व दीप्ती बापट यांनी पर्यावरण स्तुप याविषयी सविस्तर वर्णन करतांना पर्यावरणातील जीवांचे परस्परावलंबित्व व अन्नसाखळीवर बदलत्या वातावरणाचा होणाऱ्या विपरित परिणामांची भीषणता स्पष्ट केली. वृक्षफेरी, फिल्म या माध्यमांचाही प्रशिक्षणासाठी वापर करण्यात आला.

यावेळी नवमहाराष्ट्र युवा अभियानाचे संयोजक दत्ता बाळसराफ, संघटक नीलेश राऊत, उमाकांत जगदाळे, सुषमा खिल्लारे, अभिजीत विटोरे, डॉ. अमित नागरे व तीसहून अधिक शिबिरार्थी उपस्थित होते.

**रोजगार हमी योजना कृती कार्यक्रम बैठक**

रोहयोतील समस्यांचे व्यापक परिणाम, संभाव्य उपाय, आपापल्या कामाच्या पद्धतींचे यशापयश आणि सामूहिक कृती बाबत विचार विनिमय करण्यासाठी गुरुवार, दिनांक ५ ऑगस्ट २०१० रोजी नाशिक येथे एक दिवसीय रोहयो कृती कार्यक्रम बैठक नवमहाराष्ट्र युवा अभियान, विश्वास ज्ञान प्रबोधिनी अँड रिसर्च इन्स्टिट्यूट आणि प्रगती अभियान, नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आली होती. बैठकीसाठी महाराष्ट्रातल्या वेगवेगळ्या भागातील २५ कार्यकर्ते एकत्र आले होते.

पहिल्या सत्रात रोहयोतील 'मागेल तेव्हा काम, मागेल तितके दिवस काम, वेळेवर मजुरी आणि योग्य मजुरी' हे चार मुलभूत हक्क मिळवतांना लोकांना येणाऱ्या अडचणींबाबत चर्चा झाली.

दुसऱ्या सत्रात माहिती तंत्रज्ञानाचा वापर करुन रोहयोतील मस्टर, मोजमाप, माहिती संकलन इत्यादी प्रक्रिया अधिक कार्यक्षम कशा करता येतील याबाबतच्या आपल्या कामाची निर्माण गटाचे धनंजय मुळी ह्यांनी मांडणी केली. रोहयोच्या संकेतस्थळावरील जॉबकार्डवरील माहिती संक्षिप्त स्वरुपात मजुराला उपलब्ध करुन देण्यासाठी निर्माण गटाने तयार केलेल्या सॉफ्टवेअरचीसुद्धा मांडणी करण्यात आली. त्याचा उपयोग करुन घेत जव्हार मधील मिलिंद थत्तेंच्या मार्गदर्शनाखाली काम करणाऱ्या 'वयम्' गटाचे विनायक थाळकरांनी तिथल्या गावांमधील भ्रष्टाचार उघडकीस आणण्याचा आपला अनुभव मांडला. ऑनलाईन तक्रार निवारण पद्धतीच्या आपल्या अनुभवाची मांडणी प्रगती अभियानच्या अश्विनी कुलकर्णींनी केली.

तिसऱ्या सत्रात मिटींगसाठी जमलेल्या कार्यकर्त्यांना सामूहिक कृतीची गरज प्रकर्षाने जाणवल्यामुळे रोहयो कृती समितीची स्थापना करण्यात आली. अश्विनी कुलकर्णी या गटासाठी मार्गदर्शक म्हणून काम पाहतील असे ठरले.

बैठकीचा समारोप नवमहाराष्ट्र युवा अभियानाचे संयोजक दत्ता बाळसराफ यांनी केला.

**हाक ... एक आठवण**

केवळ गप्पा आणि जुन्या आठवणींना मारत असणाऱ्या हाका अशा अनोख्या संकल्पनेतून साकारलेला 'हाक... एक आठवण' या अभिनव संगीत मैफलीचे यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानने आयोजन केले होते.

डोळ्यामधल्या पाण्याला आणि कपाळावरच्या आठ्यांना माळ्यावर कोंडून ठेवणारी नव्या गीतांची आणि गप्पांची ही मैफल नाशिककर रसिकांना स्वरधारांचा अनोखा अनुभव देणारी होती.

गीते आणि कविता पुण्यातील डॉ. राहूल देशपांडे यांची होती. डॉक्टर म्हणून कार्यरत असतांनाही काव्याशी नातं जोपासणाऱ्या या कलाकाराने जुन्या आठवणींना हाका मारतांना प्रत्येक हाकेला मिश्किलपणाची झालर दिली होती. 'टिंग्या' आणि 'प्रतिसाद' या मराठी चित्रपटांमुळे प्रसिद्धीस आलेल्या रोहित नागभिडे आणि धनश्री गणात्रा यांचे संगीत या कार्यक्रमाला लाभले.

चंद्रशेखर महामुनी, रमा कुलकर्णी , धनश्री गणात्रा, आमोद कुलकर्णी, निखिल महामुनी, रोहित नागभिडे आणि डॉ. राहूल देशपांडे यांनी यातील गीतांचे गायन केले. तबल्याची जबाबदारी आमोद कुलकर्णी यांनी सांभाळली. या संपूर्ण कार्यक्रमाची संकल्पना त्यांची असून त्यांच्या ठेक्यामुळे हा संपूर्ण कार्यक्रम एक वेगळीच उंची गाठतो.

कार्यक्रमाचे स्वागत प्रास्तविक कोषाध्यक्ष विश्वास ठाकून यांनी केले. कार्यक्रमास विश्वस्त ॲड. विलास लोणारी, अश्विनी बोरस्ते, भास्करराव कोठावदे, डॉ. स्वाती करकरे व मोठ्या संख्येने रसिक उपस्थित होते.

**ए जर्नी फॉर एव्हर : इंस्किलार ॲन्ड अदर स्टोरीज पुस्तक प्रकाशन समारंभ**

अनुवादित कलाकृतीकडे वाचकांनी स्वतंत्र वाङमयीन कलाकृती म्हणूनच पहावे व आस्वाद घ्यावा. मूळ कलाकृतीशी तुलना करु नये. संशोधकाची व आस्वादकाची भूमिका वेगळी असते. भाषांतरकाराला आंतरसंहिता सापडली की उत्कृष्ट भाषांतर होते. इंग्रजीच्या अनेक नामवंत प्राध्यापकांनी इंग्रजी साहित्यातले नवनवे प्रवाह व विचार भाषांतरित करुन मराठीत आणले. डॉ. विलास साळुंके यांनी साक्षेपी अनुवादाने मोलाची भर इंग्रजी साहित्यात घातली आहे. असे प्रतिपादन ज्येष्ठ समीक्षक

# विविध विभाग व विभागीय केंद्रांच्या उपक्रमांची क्षणचित्रे




महाराष्ट्र महिला व्यासपीठ – स्वयंरोजगार मार्गदर्शन शिबीर



स्वातंत्र्यज्योत रॅली – यवतमाळ



व्हिजन करिअर फेअर – बदलापूर




नवमहाराष्ट्र युवा अभियान – युवती मेळावा, बदलापूर





शिक्षण विकास मंच – दत्तक शाळा प्रकल्प – भूतोंडे, ता. भोर, जि. पुणे



नाशिक विभागीय केंद्र – युनिकोड प्रशिक्षण कार्यशाळा



अपंग हक्क विकास मंच – कृत्रिम साहित्य – साधन वाटप



औरंगाबाद विभागीय केंद्र – युनिकोड प्रशिक्षण कार्यशाळा



औरंगाबाद विभागीय केंद्र – उर्दु–मराठी ग़ज़ल कार्यक्रम



नागपूर विभागीय केंद्र – ग्रंथ प्रकाशन सोहळा



व्हिजन करिअर फेअर कार्यक्रम – चिपळूण



लातूर विभागीय केंद्र - सत्कार समारंभ



लातूर विभागीय केंद्र - राजर्षी शाहू महाराज जयंती कार्यक्रम





कोकण विभागीय केंद्र - सुवर्ण महोत्सवी महाराष्ट्र कार्यक्रम



कराड विभागीय केंद्र




नाशिक विभागीय केंद्र - चर्चासत्र



नागपूर विभागीय केंद्र – चर्चासत्र



नागपूर विभागीय केंद्र – नागरी सत्कार सोहळा कार्यक्रम






पुणे विभागीय केंद्र – जेष्ठ नागरीकांचा कार्यक्रम



पर्यावरण शिबीर , नाशिक विभागीय केंद्र



महाराष्ट्र महिला व्यासपीठ – महिला दिन कार्यक्रम

व अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. द. भि. कुलकर्णी यांनी केले.

मराठीतील प्रख्यात कथालेखक जी. ए. कुलकर्णी यांच्या चौदा निवडक कथा डॉ. विलास साळुंखे यांनी अनुवादित केलेल्या 'द जर्नी फॉरअेव्हर : इस्किलार अँड अदर स्टोरीज' या पुस्तकाचे प्रकाशन डॉ. द. भि. कुलकर्णी यांच्या हस्ते करण्यात आले. सावरकरनगरमधील सभागृहात हा कार्यक्रम झाला. प्रारंभी कोषाध्यक्ष विश्वास ठाकूर यांनी स्वागत केले.

डॉ. द. भि. कुलकर्णी म्हणाले, कथा म्हणजे फसलेली कादंबरी असे विधान अनेकजण करतात. त्याचा मी निषेध करतो. कथा म्हणजे भावकाव्य असते. बालकवी आणि मर्ढेकरांच्या कवितांचा प्रभाव जी. ए. कुलकर्णींवर होता. त्यांच्या अनेक कथांची शीर्षके बालकवींच्या कवितांमधून आली आहेत. जीएंच्या रुपककथा लहानशा पण प्रभावी आहेत. शाश्वताचा शोध त्यांच्या कथांमधून ते घेत.

प्रारंभी मनोगत व्यक्त करतांना डॉ. विलास साळुंके म्हणाले, कुसुमाग्रजांच्या कवितांचा इंग्रजीत अनुवाद केला. जीएंनी अनुवादकाला स्वातंत्र्य असतं हे पत्रातून कळवले. त्यांच्या या शब्दांनी प्रेरणा मिळाली व त्यांचं साहित्य पेलण्याचे अवघड काम करण्याचे बळ मिळाले.

यावेळी सुधाकर जोशी म्हणाले, साळुंखे यांनी जबाबदारी व जोखीम योग्य पद्धतीने पार पाडली आहे. मराठीतल्या अनेक दर्जेदार लेखकांचे साहित्य इंग्रजीत अनुवादित झाले तर ती मातृभाषेचीच सेवा ठरेल.

डॉ. अंजली पटवर्धन-कुलकर्णी म्हणाल्या, साळुंके यांनी जिद्द व अथक परिश्रमातूत अनुवादाचे आव्हान पेलले आहे.

कार्यक्रमासाठी दैनिक लोकमताचे माजी संपादक दत्ता सराफ, साहित्यिक चंद्रकांत महामिने, डॉ. पी. एस. पवार, गणेश ओतूरकर, कवी किशोर पाठक, कवी राम पाठक, डॉ. यशवंत बर्वे, प्रा. अनंत येवलेकर, बाळासाहेब सराफ, स्वानंद बेदरकर व मोठ्या संख्येने रसिक उपस्थित होते.

**महाराष्ट्रातील प्रसार माध्यमे आणि प्रसार माध्यमातील महाराष्ट्र : परिसंवाद**

साधारणत: कोणत्याही क्षेत्रातील परीक्षांमध्ये पहिल्या पाच क्रमांकांवर मुलीच असतात परंतु नंतर त्या कुठे जातात हे कळत नाही ही चिंताजनक बाब आहे. तसेच इंग्रजी आणि अन्य भाषिक वृत्तपत्रांमध्ये अनेक महिला संपादक, संपादनाची जबाबदारी यशस्वीरित्या पार पाडत असताना. मराठी वृत्तपत्रांमध्ये एकही महिला संपादक नाही ही महाराष्ट्राच्या दृष्टीने शोकांतिका असल्याची खंत आयबीएन लोकमत नाशिकच्या ब्युरो चिफ दीप्ती यांनी व्यक्त केली.

स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे नवमहाराष्ट्र युवा अभियान, एचपीटी महाविद्यालय आणि विश्वास ज्ञान प्रबोधिनी अँड रिसर्च इन्स्टिट्युट यांच्या विद्यमाने आयोजित युवा परिसंवादामध्ये 'महाराष्ट्रातील प्रसारमाध्यमे आणि प्रसारमाध्यमातील महाराष्ट्र' या विषयावर प्रमुख वक्त्या म्हणून त्या बोलत होत्या. कार्यक्रमाचे उद्घाटन एचपीटी महाविद्यालयाचे प्राचार्य व्ही.एम. सूर्यवंशी व विद्यार्थी प्रतिनिधी यांनी मशाल पेटवून केले. यावेळी पत्रकारिता विभागाच्या प्रमुख प्रा. वृंदा भार्गवे, नवमहाराष्ट्र युवा अभियानचे विभागीय समन्वयक दीपाली मानकर, राज्य सहसंघटक डॉ. अमित नागरे उपस्थित होते.

परिसंवादामध्ये भूमिका मांडताना डॉ. अमित नागरे यांनी प्रतिष्ठानची युवा चळवळ असलेल्या नवमहाराष्ट्र युवा अभियानाने राज्यातील अनेक सामाजिक संस्थांना बरोबर घेऊन महाराष्ट्र राज्यासाठी युवा धोरण बनवून शासनास सादर केले आहे. याबरोबरच युवा अभिसरण, युवा फेलोशिप, शैक्षणिक प्रदर्शने, युवती मेळावे यासारखे नाविन्यपूर्ण उपक्रम हाती घेतले असल्याचे यावेळी सांगितले.

**युनिकोड कार्यशाळा**

लोकभाषा, व्यवहार भाषा आणि ज्ञान भाषा म्हणून मराठीचे वेगाने उच्चाटन होत आहे. हे होऊ द्यायचे नसेल तर शिक्षणाच्या माध्यमापासून न्याय व्यवहारातील मराठीपर्यंत सर्वच क्षेत्रात मराठीला मानाचे स्थान मिळवून देण्याकरिता जिकरीने प्रयत्न करणे गरजेचे आहे. मराठी अभ्यास केंद्र आणि नवमहाराष्ट्र युवा अभियान यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या मराठी युनिकोड कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी दीपक पवार यांनी सांगितले.सदर कार्यशाळा ही नाशिकमध्ये दोन ठिकाणी संपन्न झाली. पहिली कार्यशाळा ही गोपाळकृष्ण गोखले स्कूल ऑफ मास कम्युनिकेशन अँड जर्नालिझम यांच्या विद्यमाने पत्रकारितेच्या विद्यार्थ्यांकरिता आयोजित करण्यात आलेली होती. यामध्ये विद्यार्थ्यांना संगणकीय व्यवहारांसाठी युनिकोड या संकेत पद्धतीच्या वापराचे सादरीकरण व प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. यानंतरची कार्यशाळा ही विश्वास ज्ञान प्रबोधिनी अँड रिसर्च इन्स्टिट्युटच्या विद्यमाने त्यांच्या सभागृहामध्ये आयोजित करण्यात आलेली होती. नवमहाराष्ट्र युवा

अभियानाच्या संयुक्त विद्यमाने अशा कार्यशाळा महाराष्ट्रातील विविध शहरांमध्ये आयोजित करण्याचे ठरविले आहे असेही यावेळी श्री. पवार यांनी सांगितले.

संगणकावर मराठी भाषा वापरण्याकरिता उपलब्ध असलेल्या अनेक सॉफ्टवेअर्स व टंकांमुळे मराठीचा वापर वाढण्याऐवजी गोंधळ निर्माण झाला आहे. संगणकातील युनिकोड या संकेत पद्धतीमुळे संगणकावर मराठीच्या वापराचे प्रमाणीकरण या अगोदरच झालेले असल्यामुळे इंग्रजीसारखे सर्व प्रगत संगणकीय व्यवहार मराठीतही सहजपणे करता येतात. युनिकोड विनामूल्य उपलब्ध असून संगणकाच्या ऑपरेटिंग सिस्टिममध्येच बसविलेली असते. त्यामुळे युनिकोडद्वारे एम. एस. वर्ड, एक्सेल, पॉवर पॉईंट यासारखे नित्य वापरातील व्यवहार मराठीतून सहजपणे करता येतात अशी माहिती या कार्यशाळेमध्ये देण्यात आली. मराठी अभ्यास केंद्राच्या पाठपुराव्यामुळे संगणकावर मराठीच्या व्यवहाराकरिता युनिकोडचा वापर व्हावा यासाठी महाराष्ट्र शासन आणि सिडॅक यासारख्या यंत्रणांनी महत्वपूर्व निर्णय घेतलेले आहेत. अभ्यास केंद्राने मराठी शाळेच्या सक्षमीकरणासाठीही कृती आराखडा तयार करुन विविध संस्थांच्या मदतीने प्रयत्न करण्याचे ठरविले आहे. याकरिता नवमहाराष्ट्र युवा अभियान आणि विश्वास ज्ञान प्रबोधिनी अँड रिसर्च इन्स्टिट्यूटतर्फे सर्व ते सहकार्य करण्याचे आश्वासन प्रबोधिनीचे सचिव विश्वास ठाकूर यांनी दिले.

**घन गरजे; संगीत मैफल**

नाशिक केंद्राच्या वतीने शास्त्रीय, उपशास्त्रीय वर्षा ऋतु संगीत मैफिलीचे आयोजन करण्यात आले होते. पं. जितेंद्र अभिषेकी यांचे शिष्य मकरंद हिंगणे व सुखदा बेहेरे यांनी ही मैफल सादर केली. कार्यक्रमाची सुरुवात मियॉमल्हार रागातील पारंपारिक ख्यालाने झाली. त्यानंतर गौड मल्हार, सूर मल्हार, मेघ मल्हार, केदार, दुर्गा या रागातील विविध गीतांनी कार्यक्रमात चांगलाच रंग भरला. सुंदर बंदिशी, तराने विविध तालात सादर केले. उपशास्त्रीय संगीतात मीरा भजन, आली पियाबिन हा दादरा, रंध्रात 'पेरिली आषाढ दर्द गाणी' ही गझल हळूवारपणे त्यांनी सादर केली. 'पाण्यात खोल कोसळले आभाळ' ही लोकगीताच्या चालीची रचना तसेच एकवेळी पावसाळी आणि घन नव्हे मन या सुगम रचना सादर केल्या.

कार्यक्रमासाठी संगीत साथ प्रमोद भडकमकर (तबला), अनिल दैठणकर (व्हायोलिन) यांनी केली तर चारुदत्त कुलकर्णी उर्फ कवी अज्ञात यांनी निवेदन केले. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्तविक हरी विनायक कुलकर्णी यांनी केले.

**गीत विंदा; संगीत मैफल**

केंद्राच्या वतीने तत्वप्रधान कविता लिहिणाऱ्या कवी विंदा करंदीकरांच्या शब्दांना सप्तसुरांमध्ये गुंफण्याचा प्रयत्न नाशिकच्या कलावंतांनी केला. 'गीत विंदा' या मैफलीच्या माध्यमातून मोहक संगीतानुभव नाशिककर रसिकांच्या मनपटलावर कायमचा कोरला गेला. विंदा करंदीकर यांच्या स्मृतीनिमित्ताने सदर कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

विंदा करंदीकर यांच्या काही निवडक कवितांना मोहन उपासनी यांनी अनवट चाली देण्याचा प्रयत्न केला आणि श्रीराम तत्ववादी, रागिणी कामतीकर, पुष्कराज भागवत यांनी त्यांना स्वरबद्ध करत उपस्थितांकडून दाद मिळविली. पुष्काराज भागवत यांनी 'ऊठ ऊठ सह्याद्रे' हे गीत सादर करत मैफलीला प्रारंभ केला. श्रीराम तत्ववादी यांनी 'सारे तिचेच होते, सारे तिच्याच साठी' ही गझल सादर करत मैफलीत रंग भरले. राजन अग्रवाल यांची ढोलकीवर ढाप पडली आणि रागिणी कामतीकर यांनी विंदाच्या 'तुझे नी माझे अपुरे मीलन' या कवितेला लावणीच्या ठेक्यावर स्वरबद्ध करत मैफलीचे रंग आणखी गडद केले. मोहन उपासनी यांनी गायिलेल्या 'डराँव डराँव' या बालगीताला रसिकांनी टाळ्यांच्या गजरात साथ दिली. कार्यक्रमाला सतीश पेंडसे, अभिजित शर्मा, अनिल धुमाळ, अनिल दैठणकर, कृष्णा अय्यर, भूषण कोथमिरे, आनंद ओक, महेंद्र फुलफगर या प्रतिभाशाली कलावंतांनी तितक्याच दमदारपणे संगीतसाथ केली. मैफल प्रवाही ठेवण्याचे काम स्वानंद बेदरकर यांच्या अभ्यासपूर्ण निवेदनशैलीने केले.

कार्यक्रमास कोषाध्यक्ष विश्वास ठाकूर, विश्वस्त ॲड. विलास लोणारी, माधवराव पाटील, लक्ष्मण सावजी, मधुकर झेंडे व मोठ्या संख्येने रसिक उपस्थित होते.

* * *

# विभागीय केंद्र, नागपूर
## कार्यवृत्त

**डॉ. द. भि. कुळकर्णी यांचा नागरी सत्कार**

८३ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावर नियुक्ती झाल्याबद्दल नियोजित अध्यक्ष डॉ. द. भि. कुळकर्णी यांच्या सत्कार समारंभाचे आयोजन ११ फेब्रुवारी, २०१० रोजी धरमपेठ वाचनालय, नागपूर यांच्या संयुक्त वतीने सायंटिफिक सभागृहात करण्यात आले.

समारंभाचे अध्यक्षस्थानी राष्ट्रसंत तुकडोजी महागाज नागपूर विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. श. नू. पठाण होते. प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ पत्रकार मा. श्री. अनंतराव दीक्षित, मराठी स्नातकोत्तर विभागाचे प्रमुख डॉ. अक्षयकुमार काळे, प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष विजय जिचकर, संजय कोंडावार, अनिल चनाखेकर व्यासपीठावर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रतिष्ठानचे अध्यक्ष गिरीश गांधी यांनी केले.

व्यासपीठावर उपस्थित मान्यवरांच्या हस्ते दभिंना शाल, श्रीफळ आणि संत ज्ञानेश्वरांची मूर्ती देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.

डॉ. कोमल ठाकरे यांनी संचालन केले तर डॉ. प्रमोद मुनघाटे यांनी आभार मानले.

**नव्या जाणिवांचे कवी**

दर महिन्याच्या दुसऱ्या रविवारी आयोजित करण्यात येणाऱ्या 'नव्या जाणीवांचे कवी' या काव्यउपक्रमाचे आयोजन दि. १४ फेब्रुवारी, २०१० शंकरनगर चौक, येथील स्व. श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृहात गिरीश गांधी यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले.

याप्रसंगी बोलताना ते म्हणाले की, प्रत्येकाच्या मनामध्ये जे असते ते व्यक्त व्हायलाच पाहिजे. त्या प्रत्येकासाठी हक्काचे व्यासपीठ मिळाले पाहिजे. प्रतिष्ठानचे हे व्यासपीठ सर्वांसाठी आहे. आजपर्यंत विविध क्षेत्रातील बाराशे व्यक्तींनी या व्यासपीठावरून आपली विचारसुमने रसिकांना अर्पण केली आहेत. गडचिरोली, चंद्रपूरपासून ते बुलढाण्यापर्यंत या काव्य उपक्रमाने आपले नाव केले आहे, हे या उपक्रमाचे यश आहे.

काव्यचर्चेला प्रमुख अतिथी म्हणून डॉ. प्रमोद मुनघाटे होते तर हिरूरकर, मधुकर कडू, नजीमखान, रेणुकादास मुळे या कविंनी आपल्या कविता सादर केल्या.

मनीषा साधू यांनी प्रास्ताविक केले तर सूत्रसंचालन व आभार विजया मारोतकर यांनी केले. माजी कुलगुरु प्रा. योगानंद काळे, नेहा भांडारकर, मेघा देशपांडे, कवी क्रांती, गणेश भाकरे, प्रकाश एदलाबादकर, प्रा. ज्ञानेश वाकुडकर यांनी काव्यचर्चेत सहभाग घेतला.

**'कवियुगातील ध्रुवतारा' काव्यसंग्रह प्रकाशन :**

साहित्य प्रसार केंद्र नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. संजय पोहरकर यांच्या 'कलियुगातील ध्रुवतारा' या काव्यसंग्रहाचा प्रकाशन समारंभ गिरीश गांधी यांच्या अध्यक्षतेखाली श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृहात दि. १७ फेब्रुवारी, २०१० रोजी आयोजित करण्यात आला.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. श. नू. पठाण, कविकुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पंकज चांदे, राजाभाऊ कुळकर्णी, रत्नप्रभा अंजनगावकर, ज्येष्ठ पत्रकार श्रीधर भावे, विजय जिचकार यांच्या प्रमुख उपस्थितीत विचारवंत व ज्येष्ठ पत्रकार मा. गो. वैद्य यांच्या हस्ते हा प्रकाशन सोहळा संपन्न झाला.

**जागतिक महिला दिन**

जागतिक महिला दिनाच्या पार्श्वभूमिवर आकांक्षा प्रकाशन, नागपूर, यांच्या संयुक्त विद्यमाने ''आधुनिक महाराष्ट्राच्या वाटचालीत महिलांचे योगदान'' या विषयावरील परिसंवादाचे आयोजत करण्यात आले.

अध्यक्षस्थानी नगरसेविका मा. प्रगतीताई पाटील होत्या. परिसंवादात डॉ. कल्पना पाटणकर, सविता हरकरे, अरुण सबाने सहभागी झाल्या होत्या.

महिलांना आधुनिक काळात जेवढ्या सोयी-सुविधा उपलब्ध होत आहेत तेवढेच त्यांच्यावरील अत्याचाराचे प्रमाणही वाढत आहे. नोकरी करणे म्हणजे स्त्री स्वयंपूर्ण झाली ही व्याख्या संकुचित मनोवृत्तीचे प्रकटीकरण करणारी असून महिलांच्या विकासाची व्यापक व्याख्या करण्याची गरज आहे. असा सूर परिसंवादात उमटला.

स्त्री-भ्रूण हत्तेचे वाढते प्रमाण लक्षात घेता, भविष्यात जागतिक महिला दिन साजरा करण्यासाठी महिलांच उरणार नाहीत अशी परिस्थिती निर्माण होण्याची शंका व्यक्त केली. व्यासपीठावर मा. श्री. विजय जिचकार, मनिषा साधू प्रामुख्याने उपस्थित होते. संचालन उज्वला अंधारे यांनी केले. प्रास्ताविक मनीषा साधू यांनी केले.

**मा. यशवंतराव चव्हाण यांची ९७ वी जयंती**

यशवंतराव चव्हाण यांच्या ९७ व्या जयंतीनिमित्त ''राज्य निर्मितीच्या वेळी यशवंतराव चव्हाण यांनी बघितलेली स्वप्ने आणि त्याची फलश्रुती'' या विषयावर मा. श्री. मधुकर भावे, मुंबई यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी बोलताना ते म्हणाले की, यशवंतरावांनी संयुक्त महाराष्ट्राचे मुख्यमंत्रीपद स्वीकारल्यानंतर त्यांना राजकीय, सामाजिक आंदोलनाला तोंड द्यावे लागले. प्रत्येक वेळी त्यांनी सुसंवादाने प्रत्येक प्रश्नावर तोडगा काढला. प्रसंगी त्यांच्यावर टिकाही झाली. मात्र एका मुत्सद्दी राजकारण्यांप्रमाणे त्यांनी सर्व प्रश्न हाताळल्याने महाराष्ट्राची देशभरात स्वतंत्र ओळख निर्माण झाली. त्यांच्या इतकी दूरदृष्टी असलेला राजकीय नेता महाराष्ट्राच्या इतिहासात यापुढे कधीच निर्माण होणार नाही.

यावेळी दैनिक सकाळचे संपादक श्रीपाद अपराजित यांनीही यशवंतराव चव्हाण यांच्या संयुक्त महाराष्ट्राच्या भूमिकेचा आढावा घेतला. कार्यक्रमाचे प्रास्ताविकातून मा. श्री. गिरीश गांधी यांनी यशवंतरावांच्या विचारांचे प्रकटीकरण केले. यावेळी व्यासपीठावर विजय जिचकर, कवी ज्ञानेश वाकुडकर, डॉ. कोमल ठाकरे, चंद्रभान भोयर उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन डॉ. प्रमोद मुनघाटे यांनी केले तर विजय जिचकार यांनी आभार मानले.

**नव्या जाणिवांचे कवी**

दि. १४ मार्च, २०१० रोजी दर महिन्याला सादर होणाऱ्या उपक्रमाअंतर्गत 'नव्या जाणिवांचे कवी' या काव्य उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी कवी अनिल जवंजाळ सावनेर, रेवानंद मेश्राम, ब्रह्मपूरी, विशाल देवतळे, पवनकुमार कामडी या कवींनी सहभाग घेऊन आपल्या कविता सादर केल्या.

काव्यचर्चेचे अध्यक्ष डॉ. कोमल ठाकरे यांनी कवितांवर भाष्य केले. ज्येष्ठ कवी प्रा. ज्ञानेश वाकुडकर, मनीषा साधू यांनी समायोजित मार्गदर्शन केले. काव्यचर्चेत हिरामन लांजे, प्रभाकर कुबडे, अजय वाघ, बाळ कुळकर्णी यांनी भाग घेतला.

दरम्यान केंद्राचे अध्यक्ष गिरीश गांधी यांच्या उपस्थितीत कवी सुरेश भट, विं. दा. करंदीकर, ज्येष्ठ रंगकर्मी केशवराव धुळधुळे व भाऊसाहेब थोरात यांना आदरांजली वाहण्यात आली.

प्रा. विजया मारोतकर यांनी संचालन केले. धनंजय मांडवकर यांनी आभार मानले.

**विंदा करंदीकर यांना श्रद्धांजली**

ज्ञानपीठ पुरस्कार विजेते ज्येष्ठ कवी विंदा करंदीकर यांच्या निधनाने साहित्य विश्वात एक पोकळी निर्माण झाली. विंदांच्या कार्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी विदर्भ साहित्य संघ व विभागीय केंद्र नागपूरच्या वतीने शोकसभेचे आयोजन करण्यात आले.

शोकसभेच्या अध्यक्षस्थानी डॉ. यशवंत मनोहर होते. त्यांनी याप्रसंगी आपली शोकसंवेदना व्यक्त केली. डॉ. वि. स. जोग, डॉ. आशा सावदेकर, डॉ. प्रदीप विटाळकर, कवी प्रफुल्ल शिलेदार यांनीही आपल्या शोकसंवेदना व्यक्त केल्या. मनोहर म्हैसाळकर, गिरीश गांधी यावेळी व्यासपीठावर उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन प्रकाश एदलाबादकर यांनी केले. विंदांची 'माझ्या मना बन दगड' ही कविता त्यांनी सभेच्या शेवटी सादर केली.

**पुस्तक प्रकाशन समारंभ**

बकुल प्रकाशन यांच्या संयुक्त विद्यमाने प्रा. संयुक्ता थोरात यांच्या ''**कमरा नं. १३**'' या कथासंग्रहाचा प्रकाशन सोहळा मा. गिरीश गांधी यांच्या हस्ते संपन्न झाला. कार्यक्रमाला ज्येष्ठ चित्रकार चंद्रकांत चन्ने, पराग घोंगे, जगदीश शाहू व्यासपीठावर उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन अहिंसा तिरपुडे यांनी केले. प्रा. संयुक्ता थोरात यांच्या कथा मानवी नातेसंबंध उलगडणाऱ्या आहेत असे प्रतिपादन गिरीश गांधी यांनी केले.

**निर्भय-निर्गुण**

भारतीय शास्त्रीय संगीताच्या अवकाशात आपल्या स्वयंभू तेजाने चकाकणारे जे अनेक तारे आहेत त्यात पं. कुमार गंधर्व यांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते. कुमारांना हे जग सोडून ८१ वर्षे झाली, पण त्यांची अप्रतिम स्वरस्मरणे अजूनही जातिवंत रसिकांच्या मनात रुंजी घालतात. पं. कुमार गंधर्व यांच्या याच स्वरविलासाचा पुन:प्रत्यय देणारा 'निर्भय-निर्गुण' हा कार्यक्रम विभागीय केंद्र नागपूरच्या वतीने आयोजित करण्यात आला.

या कार्यक्रमात नागपुरातील युवापिढीच्या गायक-गायिकांच्या तोलामोलाचा सहभाग तर होताच. पण दृकश्राव्य ध्वनी-चित्रफितीच्या आधारे कुमारांचे गाणे, बोलणे, संवाद,

स्मरणचित्रे यांनी कार्यक्रमाची उंची वाढविली. याचे महत्तम श्रेय डॉ. साधना शिलेदार यांनी आरेखित केलेल्या प्रवाही व गतिमान संहितेला जाते. संजय इंदूरकर (संवादिनी) कांचन घाटोडे (तबला) यांनी उत्तम संगती केली. संकेत-विभास यांनी तांत्रिक बाजू सांभाळली. नेहा रामेकर व साधना शिलेदार यांनी निवेदन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष गिरीश गांधी, प्रमुख अतिथी भैय्याजी हारोडे, आशा बगे, प्रा. महेश एलकुंचवार, यांनी प्रारंभी दीप प्रज्वलन केले. गिरीश गांधी यांनी कलावंतांचे स्वागत केले. कार्यक्रमाला रसिकांची भरगच्च उपस्थिती होती.

**ग्रामगीता सुबोध निरुपण प्रकाशन**

महाराष्ट्र राज्यभाषा सभा यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. अशोक कामत यांनी लिहिलेल्या व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विरचित ''ग्रामगीता सुबोध निरुपण'' या ग्रंथाचे प्रकाशन कुलगुरु डॉ. श. नू. पठाण यांच्या हस्ते करण्यात आले. गुरुदेव युवा मंचचे प्रवर्तक ज्ञानेश्वर रक्षक यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमाला प्रतिष्ठानचे नागपूर विभागीय केंद्राचे अध्यक्ष गिरीश गांधी, डॉ. प्रदीप विटाळकर, विजय जिचकार उपस्थित होते.

याप्रसंगी गिरीश गांधी यांनी प्रास्ताविक केले. तर संचालन कोमल ठाकरे यांनी केले. आभार विजय जिचकार यांनी मानले.

**'ओॲसिस' पुस्तक प्रकाशन समारंभ**

प्रा. नयना धवड यांच्या ओॲसिस या ललितबंधाचे प्रकाशन ज्येष्ठ साहित्यिक व विचारवंत डॉ. आ. ह. साळुंखे यांच्या हस्ते करण्यात आले. शंकरनगरातील श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृहात आयोजित या प्रकाशन सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी विभागीय केंद्राचे अध्यक्ष गिरीश गांधी होते.

व्यासपीठावर कवी सुधाकर गायधनी, आचार्य डॉ. भाऊसाहेब झिटे, पुण्यातील पद्मगंधा प्रकाशनचे अरुण जोखडे, जांबुवंतराव धोटे, नानाभाऊ एम्बडवार, माजी मंत्री रणजित देशमुख, प्रवीर चक्रवर्ती, लिलाताई चितळे, उषा गडकरी उपस्थित होते.

वास्तव आणि कल्पनेला जोड देण्याचा प्रयत्न या ललित बंधातून करण्यात आल्याचे मनोगत लेखिका प्रा. नयना धवड यांनी केले.

या ललित बंधाला पाच प्रस्तावना लाभल्या असून त्या प्रस्तावनेतून हे ललित बंध उलगडत जाते. एका बैठकीत हे ललित बंध समजणे कठीण आहे, त्यासाठी हे पुन्हा पुन्हा वाचावे लागते, असे विचार गिरीश गांधी यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मनीषा साधू व संचालन विजया मारोतकर यांनी केले.

**नव्या जाणिवांचे कवी - काव्यउपक्रम**

कवी संदीप निवृत्ती गवई (मेहकर), वर्षा डोके (कळमेश्वर), द. सा. बोरकर (लाखनी), प्रा. सौ. मिनल येवले (नागपूर) इत्यादी कवी सहभागी असलेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. रविंद्र शोभणे होते. यावेळी त्यांनी कविंना मार्गदर्शन केले. प्रास्ताविक मनीषा साधू यांनी केले. तर सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन श्री. प्रभाकर कुबडे यांनी केले.

**'हे वर्तुळ असेच असते' पुस्तक प्रकाशन समारंभ**

ललित बंध हे अंतर्मनातून लिहले जाते. ते अंतरंग उलगडणारे असते. यामुळेच कथा-कादंबरीच्या तुलनेत ललितिबंध वाचनाला वाचक झुकते माप देतात. ''हे वर्तुळ असेच असते'' हा मानवी दु:खावर फुंकर घालणारा ललितबंध असल्याचे प्रतिपादन डॉ. सुलभा हेर्लेकर यांनी केले.

मुक्तछंद प्रकाशन यांच्या संयुक्त विद्यमाने हे वर्तुळ असेच असते या संग्रहाचा प्रकाशन सोहळा मा. गिरीश गांधी यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला.

याप्रसंगी ज्येष्ठ पत्रकार प्रविण बर्दापूरकर, कवी लोकनाथ यशवंत, डॉ. अजय देशपांडे. डॉ. सुलभा हेर्लेकर, आभा मेघे व्यासपीठावर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आभा मेघे यांनी केले. संचालन प्रा. अनिकेत मुन्शी व आभार डॉ. प्रमोद मुनघाटे यांनी मानले.

**'सार्थक' - पुस्तक प्रकाशन समारंभ**

साहित्य विहार यांच्या संयुक्त विद्यमाने ''सार्थक'' या हिंदी अनुवादित कादंबरीचा प्रकाशन सोहळा मा. श्री. गिरीश गांधी यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आला. यावेळी प्रा. मेघनाथजी बोधनकर, मा. श्री. बी. जी. देवपुजारी, आशा पांडे, डॉ. कुमरे, शुभांगी भडभडे, वसुधा पांडे, व्यासपीठावर उपस्थित होते. श्वेता शेलगावकर यांनी सूत्र संचालन केले तर श्री. पांडे यांनी आभार मानले.

**नव्या जाणिवांचे कवी-काव्यउपक्रम**

कवी स्वत:च्या कल्पना, विचार कवितेच्या माध्यमातून सर्वासमोर मांडत असतो. एकाच कविच्या ५ कविता जर कुणी वाचल्या तर त्या कविची लिखाणाची पद्धत व त्याचा स्वभाव समजण्यास मदत होते असे प्रतिपादन प्रा. कवी ज्ञानेश वाकुडकर यांनी केले.

कार्यक्रमाचे अतिथी समीक्षक म्हणून विदर्भाच्या प्रसिद्ध

कवयित्री मनीषा साधू होत्या. याप्रसंगी प्रामुख्याने हिरामन लांजे तसेच कार्यक्रमात सहभागी कवी गोपाल खाडे (कारंजालाड), मनीषा रिठे (वर्धा), हेमंत बारसागडे (नागभीड), रविंद्र देवघरे (नागपूर) इत्यादी सहभागी झाले. मनीषा साधू हा कार्यक्रम मागील ९ महिन्यांपासून राबवित आहेत. संपूर्ण विदर्भातील वेगवेगळ्या गावात जाऊन स्थानिक कवींना सोबत घेऊन हा कार्यक्रम पुढे राबविण्याचा मानस मनीषा साधू यांनी प्रतिष्ठानच्या वतीने व्यक्त केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रभाकर कुबडे यांनी केले. सुत्रसंचालन व आभारप्रदर्शन नेहा भांडारकर यांनी केले.

**ग्रंथचर्चा – महाभारताचा मूल्यवेध**

विजय प्रकाशन यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. रविंद्र शोभणे यांच्या **महाभारताचा मूल्यवेध** या ग्रंथचर्चेचे आयोजन करण्यात आले.

अध्यक्षस्थानी गिरीश गांधी होते. या ग्रंथाचे विश्लेषक प्रा. सुरेश द्वादशीवार, डॉ. रविंद्र शोभणे, विजय जिचकार, प्रकाशक सचिन उपाध्यक्ष, डॉ. प्रमोद मुनघाटे उपस्थित होते.

याप्रसंगी गिरीश गांधी म्हणाले की, रामायण, महाभारत हे ग्रंथ भारतीयांच्या श्रध्देचे आहेत. पण तर्कदृष्टीने विचार झाला पाहिजे. त्याशिवाय तथ्य समोर येणार नाही. हे ग्रंथ आजही प्रासंगिक आहेत. विद्यापीठाच्या क्रीडा स्पर्धानाही अश्वमेघ नाव दिले जाते. जणू ते युध्दाची रणभूमी आहे. अर्थ समजून न घेता, अभ्यास न करता ऐकीव माहितीवर जगण्याची आपली मानसिकता आहे.

विदर्भातल्या एका लेखकाने तर्कनिष्ठेने महाभारताचा विचार मांडावा ही बाब आपल्यासाठी गौरवाची आहे. या दृष्टीने शोभणेंचा हा ग्रंथ मार्गदर्शक ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. प्रास्ताविक डॉ. प्रमोद मुनघाटे, सूत्रसंचालन सौ. शुभदा फडणवीस तर आभार प्रदर्शन सचिन उपाध्याय यांनी केले.

**मराठी अभिमान गीत चित्रफीत लोकार्पण**

उमेद बहुउद्देशीय संस्था यांच्या विद्यमाने कवी सुरेश भट आणि संगीतकार कौशल इनामदार यांच्या ''मराठी अभिमान गीत'' सी.डी. च्या लोकार्पण सोहळ्याचे व कौशल इनामदार यांच्या प्रकट मुलाखतीचे आयोजन करण्यात आले.

अध्यक्षस्थानी प्रतिष्ठानचे कोषाध्यक्ष संजय कोंडावार होते. व्यासपीठावर कवी अशोक बागवे, कुणाल नरसापूरकर, कल्याण देशपांडे आदी मान्यवर उपस्थित होते. लोकार्पण सोहळ्यानंतर कवी अशोक बागवे यांनी कौशल इनामदार यांची प्रकट मुलाखत घेतली.

कार्यक्रमाला विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष मनोहर म्हैसाळकर, मंदार गोगटे, उमेश जोशी आदी मान्यवर उपस्थित होते.

मनीषा साधू यांनी संचालन केले तर मराठी अभिमान गीताच्या सादरीकरणाने कार्यक्रमाची सांगता झाली.

**प्रकाशन समारंभ**

साहित्य विहार, नागपूरच्या संयुक्त विद्यमाने दि. २१ जून, २०१० ला सौ. आशा पांडे यांच्या 'अभिशत पुष्प' या अनुवादित कादंबरीच्या प्रकाशन सोहळ्यचे आयोजन करण्यात आले.

डॉ. वि. स. जोग यांच्या शुभहस्ते हा प्रकाशन सोहळा संपन्न झाला. याप्रसंगी मूळ हिंदी लेखिका डॉ. कृष्णा श्रीवास्तव, मराठी अनुवादक सौ. आशा पांडे, मा. श्री. श्यामकांत कुळकर्णी यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. श्री. गिरीश गांधी होते.

**प्रकाशन समारंभ**

श्री. दिवाकर मोहनी यांच्या पुढाकाराने 'नागरी लिपीचा परिचय आणि शुद्धलेखनाचे प्रयोजन' या विषयावर दि. २९ जून २०१० रोजी चर्चा घेण्यात आली. तसेच त्यांनी तयार केलेल्या नागरी लिपी ॲनिमेशन चित्रफितीचे प्रक्षेपण करण्यात आले. डॉ. आ. ह. साळुंखे, मा. प्रा. दत्ता भगत यांच्या प्रमुख उपस्थितीत चर्चा संपन्न झाली. याप्रसंगी मा. श्री. शफाअत खान, मा. श्री. गिरीश गांधी, मा. श्री. प्रवीण बर्दापूरकर, डॉ. अविनाश रोडे, डॉ. प्रमोद मुनघाटे, हरिश्चंद्र बोरकर आदी मान्यवर उपस्थित होते.

**प्रकाशन समारंभ**

साहित्य विहार, नागपूरच्या संयुक्त विद्यमाने कवी श्री. भाऊराव कुऱ्हाडे यांच्या 'भक्तिसरिता' या कवितासंग्रहाच्या प्रकाशन सोहळ्याचे आयोजन दि. १ जुलै, २०१० ला करण्यात आले. मा. श्री. गिरीश गांधी यांच्या अध्यक्षतेखाली व शुभहस्ते या ग्रंथाचा प्रकाशन सोहळा संपन्न झाला.

मा. श्री. कमलाकर धारप, सौ. वैशाली मुलमुले यांनी या संग्रहावर भाष्य केले. याप्रसंगी रसिकराजचे सदस्यगण, प्रकाशक, प्रा. बळवंत भोयर उपस्थित होते. श्री. विद्याधर यांनी संचालन केले तर धनंजय मांडवकर यांनी आभार मानले.

**सत्कार समारंभ**

महाराष्ट्र राज्याने गठीत केलेल्या मराठी भाषा समितीवर निवड झालेले डॉ. प्रमोद मुनघाटे व डॉ. श्रीकांत तिडके यांच्या सत्काराचे आयोजन दि. २ जुलै, २०१० रोजी श्री. मनोहर

म्हैसाळकर यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले. डॉ. प्रमोद मुनघाटे हे यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे विभागीय केंद्राचे सदस्य असून श्री. श्रीकांत तिडके हे माजी सदस्य आहेत. यावेळी मा. श्री. गांधी विभागीय केंद्राचे सरचिटणीस डॉ. अक्षयकुमार काळे उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन डॉ. कोमल ठाकरे यांनी केले.

**प्रकाशन सोहळा**

आकांक्षा प्रकाशन, नागपूरच्या संयुक्त विद्यमाने दि. १७ जुलै, २०१० ला राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे साहित्य अभ्यासक ज्ञानेश्वर रक्षक यांनी लिहिलेल्या 'जनक्रांतीच्या पाऊलवाटा' या ग्रंथाचा प्रकाशन सोहळा आचार्य हरिभाऊदादा वेरुळकर यांच्या शुभहस्ते व मा. श्री. गिरीश गांधी यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला.

डॉ. प्रदीप विटाळकर, डॉ. भाऊ लोखंडे, डॉ. सुभाष सावरकर यांनी या ग्रंथावर भाष्य केले. याप्रसंगी मंचावर मा. अरुणा सबाने, विजय जिचकार आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन डॉ. सुनिल रामटेके यांनी केले.

**नाट्यवाचन**

रंगमैत्र यांच्या संयुक्त विद्यमाने ''नाट्य वाचन व रंगचर्चा'' या उपक्रमाचे आयोजन दि. २५ जुलै, २०१० रोजी करण्यात आले. सौ. संध्या कुळकर्णी यांनी ''का म्हणा पुन्हा पुन्हा'' या नाटकाचे वाचन केले. महेंद्र सुके, कुणाल मुळे, संजय काशीकर व मान्यवर रंगकर्मी या कार्यक्रमास उपस्थित होते.

**प्रकाशन सोहळा**

आकांक्षा प्रकाशन यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २५ जुलै, २०१० रोजी अरुणा सबाने यांच्या ''मुन्नी'' या कादंबरीच्या प्रकाशन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले.

मा. श्री. गिरीश गांधी यांच्या शुभहस्ते व अध्यक्षतेखाली हा प्रकाशन सोहळा संपन्न झाला. या कादंबरीवर डॉ. प्रकाश खरात व जया द्वादशीवार यांनी भाष्य केले. याप्रसंगी श्री. विजय जिचकार, डॉ. प्रमोद मुनघाटे आदी मान्यवर उपस्थित होते. डॉ. कोमल ठाकरे यांनी सूत्रसंचालन केले तर साक्षी पावडे यांनी आभार मानले.

**कालिदास महोत्सव**

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक यांच्या संयुक्त विद्यमाने गुरूवार दि. २९ जुलै, २०१० रोजी **कालिदास पर्व महोत्सवाचे** आयोजन सायंटिफिक सभागृहात करण्यात आले.

मा. डॉ. एस. बी. निमसे, कुलगुरू, स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड, मा. डॉ. एस. एन. पठाण, मा. श्री. गिरीश गांधी यांच्या प्रमुख उपस्थितीत व मा. डॉ. पंकज चांदे कुलगुरू कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक यांच्या अध्यक्षतेखाली कालिदास पर्व महोत्सव संपन्न झाला. याप्रसंगी नारीहृदयविलास: व विकसतु एषा कलिका या दोन नाटिकांचे प्रस्तुतीकरण करण्यात आले. या उपक्रमास बहुसंख्येने रसिक श्रोते उपस्थित होते.

**नाट्यवाचन**

रंगमैत्र यांच्या संयुक्त विद्यमाने ''नाट्य वाचन व रंगचर्चा'' या उपक्रमाअंतर्गत ज्येष्ठ नाटककार श्री. प्रेमानंद गज्वी यांनी ''व्याकरण'' या नाटकाचे वाचन केले. शहरातील तरूण नवोदित रंगकर्मींनी या कार्यक्रमास भरभरून प्रतिसाद दिला.

**नाट्यवाचन**

रंगमैत्र यांच्या संयुक्त विद्यमाने ''नाट्य वाचन व रंगचर्चा'' या उपक्रमाअंतर्गत सौ. अनिता जोशी यांनी ''मन वढाय वढाय'' या नाटकाचे वाचन केले. तसेच प्रा. संयुक्ता थोरात यांच्या ''क्यूँ की तुम मुझसे जुदा नही'' या नाटकाचे वाचन केले. उपस्थित रसिक श्रोत्यांनी रंगचर्चेत सहभाग घेतला.

**नारायण सुर्वे यांना श्रद्धांजली**

विदर्भ साहित्य संघ यांच्या संयुक्त विद्यमाने ज्येष्ठ कवी नारायण सुर्वे यांना दि. २० ऑगस्ट २०१० रोजी त्यांच्या कतृत्वाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

मा. श्री मनोहर म्हैसाळकर यांच्या अध्यक्षतेखाली व मा. श्री गिरीश गांधी यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रा. सुरेश द्वादशीवार, डॉ. यशवंत मनोहर व डॉ. राजेंद्र नाईकवाडे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे संचालन शुभदा फडणवीस यांनी केले.

**लोकार्पण सोहळा**

साधना साप्ताहिक, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार दि. २१ ऑगस्ट २०१० रोजी श्रीमंती बाबुराव धनवटे सभागृह, नागपूर येथे महाराष्ट्र राज्याच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्ताने साधना साप्ताहिकाने प्रकाशित केलेल्या **'विदर्भ विशेषांकाच्या'** लोकार्पण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले.

मा. श्री गिरीश गांधी यांच्या अध्यक्षतेखाली प्रा. सुरेश द्वादशीवार, ज्येष्ठ पत्रकार दि. भा. घुमरे व कार्यकारी संपादक साधना साप्ताहिक श्री. विनोद शिरसाठ यांच्या उपस्थितीत हा सोहळा संपन्न झाला. डॉ. प्रमोद मुनघाटे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले तर श्री. अतुल लोंढे यांनी आभार मानले.

**मराठी बोली साहित्य संघ-वर्धापन दिन**

मराठी बोली साहित्य संघाच्या ६व्या वर्धापन दिनाचे उद्घाटन दि. २१ ऑगस्ट २०१० रोजी मा. श्री. गिरीश गांधी यांच्या हस्ते करण्यात आले. पहिल्या सत्राच्या मा. डॉ. मनोहरराव रोकडे यांच्या अध्यक्षतेखाली श्री. यादवराव महाजन यांच्या 'भावस्पर्श' या काव्यसंग्रहाचे प्रकाशन करण्यात आले. श्री श्रीनिवास भालेराव यांनी या संग्रहावर भाष्यकार म्हणून आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी प्रा. कल्पना देवते यांनी सूत्रसंचालन केले तर श्री देविदास इंदापवार यांनी आभार मानले.

दुसऱ्या सत्रात प्रा. कृष्णा चौधरी यांच्या अध्यक्षतेखाली उस्फूर्त काव्यसंमेलनाचे आयोजन करण्यात आले. या संमेलनाचे संचालन कवी प्रसेन्नजित गायकवाड यांनी केले तर श्री. राजेंद्र बोकाडे यांनी आभार मानले.

दि. २२ ऑगस्ट, २०१० च्या पहिल्या सत्रात मा. डॉ. हरिश्चंद्र बोरकर यांच्या अध्यक्षतेखाली 'महाराष्ट्राच्या सांस्कृतिक धोरणात बोलीचे प्रतिबिंब किती?' या विषयावरील परिसंवादाचे आयोजन करण्यात आले. प्रा. बबनराव नाखले, डॉ. सुरेश खैरनार, डॉ. रवींद्र शोभणे या वक्त्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. डॉ. चंद्रभान भोयर यांनी सूत्रसंचालन केले तर. सौ. सायली सारडे यांनी आभार मानले. यावेळी डॉ. हरिश्चंद्र बोरकर यांचा त्यांच्या कार्याबद्दल सत्कार करण्यात आला. डॉ. राजन जैस्वाल यांनी सत्कारमूर्तींचा शब्दसुमनानी गौरव केला.

मा. श्री. श्रीपाद अपराजित यांच्या अध्यक्षतेखाली व अ‍ॅड. रेखा वडिखाये यांच्या प्रमुख उपस्थितीत झाडीबोली साहित्य संघाच्या या समारंभाचा समारोप झाला. या समारोपाचे संचालन डॉ. सुरेश खेडकर यांनी केले तर डॉ. शांतिदास लुंगे यांनी आभार मानले. विदर्भातील बोलीवर प्रेम करणारे अनेक वाङ्मयप्रेमी, रसिक श्रोते दोन दिवस या कार्यक्रमात उपस्थित होते.

**नाट्यवाचन**

रंगमैत्र यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २२ ऑगस्ट, २०१०ला सकाळी १०.०० वाजता नाट्यवाचन व रंगचर्चा या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले याप्रसंगी नाटककार मा. श्री निरंजन मार्कन्डेयवार यांनी 'माय डीयर शुबी' या नाटकाचे वाचन केले. उपस्थित रंगकर्मींनी नाट्यचर्चेत सहभाग घेतला.

**नाट्यवाचन**

रंगमैत्र यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २९ ऑगस्ट, २०१० ला सकाळी १०.०० वाजता नाट्यवाचन व रंगचर्चा या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले याप्रसंगी नाटककार मा. श्री संजय गायकवाड यांनी ''लढा'' या नाटकाचे वाचन केले.

**सी.डी. विमोचन**

साहित्य विहार आणि स्वरालय संगीत संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २९ ऑगस्ट, २०१० रोजी सौ. संगीता बापट यांच्या 'अंगणातल्या पायरीवर' ह्या काव्यसंग्रहाचे प्रकाशन व 'ईशगान' या भक्तिगीतांच्या सी. डी. चे विमोचन करण्यात आले. मा. श्री गिरीश गांधी यांच्या अध्यक्षतेखाली डॉ. सौ. सुलभा हेर्लेकर यांच्या हस्ते अंगणातल्या पायरीवर या संग्रहाचे प्रकाशन संपन्न झाले. मा. श्री प्रकाश एदलाबादकर यांनी या संग्रहावर भाष्य केले.

पं. भाऊराव भट यांच्या शुभहस्ते 'ईशगान' या भक्तीगीतांच्या सी.डी. चे विमोचन संपन्न झाले. रसिक श्रोत्यांनी 'ईशगान' चा आस्वाद घेतला.

❋ ❋ ❋

# विभागीय केंद्र, औरंगाबाद
# कार्यवृत्त

**शाम-ए-गजल उर्दू-मराठी गझल गायन कार्यक्रम**

दि. १४ फेब्रुवारी २०१० रोजी तापडिया नाट्यमंदिर येथे शाम-ए-गजल या उर्दू-मराठी गझल गायन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

मुंबई येथील गजल गायक मदन काजळे यांनी उर्दू-मराठी गजला सादर केल्या. त्यांना उस्ताद अलाउद्दीन खान (दिलरुबा), उस्ताद प्रदीप शर्मा (तबला), उस्ताद अबरार अहमद (संतूर) या कलावंतांनी साथसंगत दिली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आ. एम. एम. शेख होते. तसेच ज्येष्ठ गजलाकार बशर नवाज, अमरावतीचे गजलरसिक नानासाहेब लोडम, नवमहाराष्ट्र युवा अभियानाचे विशेष निमंत्रित राहुल नरवडे, समन्वयक सुहास तेंडुलकर, राज्य संघटक नीलेश राऊत, विभागीय संघटक सुबोध जाधव यांची मंचावर प्रमुख उपस्थिती होती. बशर नवाज यांच्या हस्ते शमा रोशन करुन कार्यक्रमाचे उद्‌घाटन करण्यात आले. नीलेश राऊत यांनी भूमिका मांडताना नवमहाराष्ट्र युवा अभियानाच्या उपक्रमांची माहिती दिली.

**यशवंतराव चव्हाण यांच्या ९७ व्या जयंतीनिमित्त प्रा. जयदेव डोळे यांचे व्याख्यान**

एम. जी. एम. कॉलेज ऑफ जर्नालिझम अँड मास कम्युनिकेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आईन्स्टाईन सभागृह, एम. जी. एम. परिसर येथे महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री आदरणीय यशवंतराव चव्हाण यांच्या ९७ व्या जयंतीनिमित्त गुरुवार दि. ११ मार्च २०१० रोजी प्रा. जयदेव डोळे यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी डॉ. अनिल फळे उपस्थित होते. एम. जी. एम. चे विश्वस्त अंकुशराव कदम, ज्येष्ठ साहित्यिक रा. रं. बोराडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बोलताना प्रा. डोळे म्हणाले की, आजच्या काळातील राजकारणाची मर्यादा व त्यातील सवंगपणा लक्षात घेता राजकारणात येणाऱ्या पुढच्या पिढीने व सध्या राजकारणात सक्रिय असलेल्या कार्यकर्त्यांनी यशवंतराव चव्हाण यांनी त्यांच्या कार्यामधून व विचारांमधून प्रकट केलेला ध्येयवाद बाळगणे गरजेचे आहे. यशवंतराव चव्हाण व आजच्या राकारणाचा विचार करता त्यावेळी त्यांनी त्यांच्या कार्यातून जोपासलेला राष्ट्रवाद व विकासात्मक दृष्टी व आजच्या राजकारण्यांनी स्वत:साठी व स्वत:च्या घराण्यासाठी राजकारणाचा केलेला वापर या दोन्हीही गोष्टी विरोधाभास प्रकट करतात. राजकारण स्वत:साठी की जनतेच्या हितासाठी याचे भान नवोदित राजकीय कार्यकर्त्यांनी ठेवायला हवा. यशवंतरावांनी आयुष्यभर आपले राजकारण हे सामान्य कष्टकरी जनतेच्या विकासासाठी अर्पण केलेले होते. त्याचे अनुकरण पुढील काळातील त्यांच्या अनुयायांनी योग्य रीतीने केले. त्यामुळे महाराष्ट्र राज्य हे देशात पुरोगामी व प्रगत राज्य म्हणून गौरविले गेले. राज्यामध्ये अमंलबजावणी झालेल्या अनेक योजनांचे केंद्र शासनाने अनुकरण केले. याचे सर्व श्रेय यशवंतराव चव्हाणांच्या कार्यपद्धतीस आहे.

डॉ. अनिल फळे यांनी अध्यक्षीय समारोप केला. प्रास्ताविक प्राचार्य रेखा शेळके यांनी केले. नीलेश राऊत यांनी भूमिका विशद केली. सुत्रसंचालन अभिजित विटोरे यांनी केले.

**नेतृत्व विकास शिबिर**

निर्माण (गडचिरोली) यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार व रविवार, दि. २७ व २८ मार्च २०१० रोजी मराठवाडा महसूल प्रबोधिनी येथे युवा नेतृत्व विकास शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

पहिल्या दिवशी शिबिराचे उद्‌घाटन ज्येष्ठ विचारवंत व पत्रकार प्रा. जयदेव डोळे यांच्या 'आजच्या युवा पिढीसमोरील परिवर्तनाचे आव्हान व आवाहन' या विषयावील व्याख्यानाने झाले. यावेळी मंचावर नवमहाराष्ट्र युवा अभियानाचे संयोजक मा. दत्ता बाळसराफ, राज्य संघटक नीलेश राऊत यांची उपस्थिती होती. यानंतर दुपारच्या सत्रात अमृत बंग व उमेश खाडे यांनी निर्माण उपक्रमाची संकल्पना व प्रक्रिया याविषयी विचार व्यक्त केले. मा. दत्ता बाळसराफ यांनी शिबिरार्थींची मते, प्रतिक्रिया जाणून घेऊन त्यांच्या प्रश्नांना समर्पक उत्तरे दिली. यावेळी 'कचराकोंडी' हा लघुपट शिबिरार्थींना दाखविण्यात आला. त्यानंतर मा. दीपा देशमुख यांनी 'कुमार निर्माण' या विषयी माहिती दिली.

रात्रीच्या सत्रामध्ये कवी वैभव देशमुख व महेश अचिंतलवार

यांच्या कवितांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

दुसऱ्या दिवशी शिबिराची सुरुवात चळवळीच्या गीताने करण्यात आली. त्यानंतर सचिन टिवले यांनी 'धान्यापासून मद्य निर्मिती विरोधातील भूमिकेची' मांडणी केली. झी चोवीस तासचे पत्रकार मा. दिलीप वाघमारे यांनी दुपारच्या सत्रात मराठवाड्याच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय प्रश्नांची सद्य:स्थिती व पुढील काळातील आव्हाने या विषयावर वास्तव मांडले. शिबिरामध्ये सुमारे ६० विद्यार्थी उपस्थित होते.

**ॲन इनकन्व्हिनियन्ट ट्रुथ माहितीपट व व्याख्यानमाला**

महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त दोन टप्प्यांमध्ये कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आलेले होते. पहिल्या टप्प्यात माहितीपटाचे प्रदर्शन करण्यात आले.

रविवार, दि. २ मे २०१० रोजी सायंकाळी ५ वा. सरस्वती भुवन महाविद्यालयाच्या नाट्यशास्त्र विभागाच्या सभागृहात 'ॲन इनकन्व्हिनियन्ट ट्रुथ' हा अल गोर यांचा जागतिक तापमानवाढीवर आधारित माहितीपट प्रदर्शित करण्यात आला. कार्यक्रमासाठी नवमहाराष्ट्र युवा अभियानाचे राज्य संघटक नीलेश राऊत, समन्वयक विजय कान्हेकर, सुहास तेंडुलकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

जागतिक तापमानवाढ हा जगामध्ये सर्वत्र चर्चेस असणारा विषय आहे. अल गोर यांनी या विषयावर केलेल्या संशोधनावर आधारित 'ॲन इनकन्व्हिनियन्ट ट्रुथ' हा माहितीपट तयार करुन जगामध्ये या बाबतीत जाणीवजागृती करण्याचे कार्य केलेले आहे. यावेळी नीलेश राऊत यांनी महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त विभागीय केंद्रातर्फे हाती घेण्यात आलेल्या उपक्रमांविषयी माहिती दिली. ॲन इनकन्व्हिनियन्ट ट्रुथ या माहितीपटाच्या प्रदर्शन कार्यक्रमासाठी शहरातील विद्यार्थी व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली.

सोमवार, दि. ३ मे २०१० रोजी जिल्हा परिषद सभागृह, बीड येथे सायंकाळी ५.३० वाजता 'द इनकन्व्हिनियंट ट्रुथ' हा माहितीपट दाखविण्यात आला. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून नगराध्यक्ष डॉ. भारतभूषण क्षीरसागर उपस्थित होते.

यावेळी औरंगाबाद विभागीय केंद्राचे समन्वयक सुहास तेंडूलकर यांनी महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त विभागीय केंद्रातर्फे हाती घेण्यात आलेल्या उपक्रमाविषयी माहिती दिली.

कार्यक्रमाच्या दुसऱ्या टप्प्यामध्ये विभागीय केंद्र, औरंगाबादतर्फे सुवर्ण महोत्सवी महाराष्ट्राची ५० वर्षे या विषयावर व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते. दि. ५ मे २०१० रोजी सिल्लोड येथे, दि. ६ मे रोजी पैठण येथे व दि. ७ मे रोजी बजाजनगर (औरंगाबाद) येथे प्रा. महेश अचिंतलवार यांची व्याख्याने आयोजित करण्यात आली होती.

**असाही एक महाराष्ट्र – छायाचित्र प्रदर्शन**

शुक्रवार ते रविवार, दि. १८ ते २० जून २०१० या दरम्यान मराठवाडा साहित्यपरिषद यांच्या संयुक्त विद्यमाने प्रसिद्ध छायाचित्रकार संदेश भंडारे यांचे असाही एक महाराष्ट्र या छायाचित्र प्रदर्शनाचे आयोजन मराठवाडा साहित्य परिषद, औरंगाबाद येथे करण्यात आले होते.

कार्यक्रमाचे उद्घाटन शुक्रवार दि. १८ जून २०१० रोजी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मा. विजय वाघमारे यांच्या हस्ते फित कापून झाले. यावेळी अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिक मा. रा. रं. बोराडे होते. मंचावर मा. प्रा. जयदेव डोळे, मा. नंदकिशोर कागलीवाल, मा. सचिन मुळे, मा. सुहास तेंडुलकर, मा. कुंडलिक अतकरे यांची उपस्थिती होती.

यावेळी बोलताना मा. रा. रं. बोराडे म्हणाले की, कुठलाही कलावंत आहे रे आणि नाही रे या दोन समाजघटकांतील दरी मिटविण्याचा प्रयत्न करीत असतो. नाही रे, समाजघटकांच्या दैन्याचे प्रदर्शन करुन तो व्यवस्थेला परिवर्तनासाठी प्रवृत्त करीत असतो. संदेश भंडारे यांचे असाही एक महाराष्ट्र हे छायाचित्र प्रदर्शन महाराष्ट्र नव्याने समजून घेण्याची जिज्ञासा असणाऱ्यांसाठी आहे. हे प्रदर्शन महाराष्ट्रभर व महाराष्ट्राबाहेरही प्रदर्शित होण्याची गरज आहे.

मा. प्रा. जयदेव डोळे म्हणाले की, संदेश भंडारे यांच्या छायाचित्रांतून सभोवतालच्या परिस्थितीविषयी संताप व्यक्त होतो. म्हणूनच ही छायाचित्रे प्रेक्षणीय न बनता स्फोटक बनली आहेत. विजय वाघमारे यांनी मनोगत व्यक्त केले.

सुहास तेंडुलकर यांनी प्रास्ताविक केले. संदेश भंडारे यांनी प्रदर्शनामागील भूमिका मांडली. अभिजित विटोरे यांनी सूत्रसंचालन केले. सुबोध जाधव यांनी आभार मानले.

संदेश भंडारे यांची छायाचित्रे पाहताना तटस्थ राहणे अवघड होऊन बसते. नकळत आपण त्या छायाचित्रांशी संवाद साधू लागतो. आपण पाहिलेल्या, अनुभवलेल्या जाणिवांची नव्याने आणि तपशीलवार पुनर्ओळख करुन देणारी ही छायाचित्रे अतिशय आशयसंपन्न आहेत. असे जाणिवा प्रगल्भ करणारे

प्रदर्शन वेळोवेळी आयोजित केले जावे, अशा प्रतिक्रिया औरंगाबादवासीयांनी या तीन दिवसांमध्ये व्यक्त केल्या.

**युवती सक्षमीकरण कार्यशाळा**

औरंगाबाद नर्सिंग महाविद्यालयात युवती सक्षमीकरण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. दि. ६ ऑगस्ट २०१० रोजी आयोजित या कार्यशाळेचे उद्घाटन औरंगाबाद नर्सिंग महाविद्यालयाचे संचालक डॉ. बाळासाहेब पवार यांच्या हस्ते झाले. यावेळी नवमहाराष्ट्र युवा अभियानाचे राज्य संघटक नीलेश राऊत, नर्सिंग महाविद्यालयाचे प्राचार्य सचिन कहांडकर, प्रा. अपर्णा अष्टपुत्रे, मा. निधी शहा यांची उपस्थिती होती.

युवती सक्षमीकरण कार्यशाळेमध्ये मानसिक आरोग्य या विषयावर प्रा. अपर्णा अष्टपुत्रे यांनी युवतींशी संवाद साधला. युवतींमध्ये ताणतणावांचे वाढते प्रमाण, तणावांशी जुळवून घेण्याच्या व मात करण्याच्या पद्धती प्रा. अष्टपुत्रे यांनी समजावून सांगितल्या. दररोजच्या जीवनातील ताणतणावांशी मुकाबला करताना स्वत:चा दृष्टीकोन बदलणे कसे गरजेचे आहे आणि हा बदल प्रामाणिकपणे करावा, असे मागदर्शन प्रा. अष्टपुत्रे यांनी केले. यावेळी लैंगिक अत्याचार, मुलींची छेडछाड, वयात येणे, स्त्री-पुरुष नातेसंबंध आदी बाबींवर प्रकाश टाकणारा 'खट्टे मीठे मोड पर' हा माहितीपट दाखविण्यात आला. प्रा. अष्टपुत्रे यांनी मार्गदर्शनानंतर युवतींना जाणवणाऱ्या मानसिक समस्यांविषयी चर्चा केली. महाविद्यालयातील सुमारे दोनशे युवतींनी या कार्यशाळेमध्ये सहभाग नोंदविला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक अभिजित विटोरे, सूत्रसंचालन प्रणाली महाडिक यांनी केले. मंगेश निरंतर यांनी आभार मानले. कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी सुबोध जाधव, गणेश घुले, दिपक जाधव, उमेश राऊत, जयंत लचुरे, मंगेश महामुने यांनी परिश्रम घेतले.

**युवा स्वातंत्र्यज्योत रॅली**

शनिवार, दि. १४ ऑगस्ट रोजी युवा स्वातंत्र्यज्योत रॅलीचे औरंगाबाद शहरात आयोजन करण्यात आले होते. क्रांतीचौक ते पैठण गेट असा या रॅलीचा नियोजित मार्ग होता. क्रातीचौक येथे रात्री ११ वाजता सहाय्यक पोलीस आयुक्त संदिप भाजीभाकरे यांच्या हस्ते मशाल पेटवून या रॅलीची सुरुवात झाली. यावेळी नगर सेवक समीर राजूरकर, नगरसेवक विजेंद्र जाधव, नवमहाराष्ट्र युवा अभियानाचे राज्य संघटक नीलेश राऊत, विभागीय समन्वयक सुहास तेंडुलकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

युवांमध्ये स्वातंत्र्याविषयी जाणीव अधिक दृढ व्हावी, हे उद्दिष्ट समोर ठेवून शहरात मागील तीन वर्षापासून यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, विभागीय केंद्र - औरंगाबादतर्फे स्वातंत्र्यदिनापूर्वीच्या मध्यरात्री युवा स्वातंत्र्यज्योत रॅलीचे आयोजन करण्यात येत आहे.

यावेळी संदीप भाजीभाकरे म्हणाले की, भारत देश युवांचा देश म्हणून ओळखला जातो. युवी शक्तीच भारताला महासत्ता बनवू शकते. युवांमध्ये राष्ट्राभिमानाची भावना तेवत ठेवण्यासाठी अशा उपक्रमांमधून निश्चितच मदत होणार आहे. नगरसेवक समीर राजूरकर व विजेंद्र जाधव यांनीही विचार व्यक्त केले.

क्रांतीचौक ते पैठण गेट या दरम्यान रॅलीमध्ये सहभागी झालेल्या युवांनी भारत माता की जय, वंदे मातरम अशा घोषणा दिल्या. पैठण गेट येथे मध्यरात्री १२ वाजता भारतीय राज्य घटनेच्या सरनाम्याचे वाचन करण्यात आले आणि राष्ट्रगीताने रॅलीचा समारोप करण्यात आला. रॅलीमध्ये विजय सुबुकडे, कृष्ण जाधव, मोहन बरांडे, सचिन पळसवाडीकर, गजेंद्र गवंडर, नंदू गवळी, प्रवीण तायडे यांच्यासह विविध संस्था-संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच नागरिक, युवा व विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

**युनिकोड प्रशिक्षण कार्यशाळा**

मराठी अभ्यास केंद्र, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार दि. २७ ऑगस्ट २०१० रोजी एम. जी. एम. वृत्तपत्रविद्या व जनसंवाद महाविद्यालय आणि देवगिरी महाविद्यालयात युनिकोड प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

**एम. जी. एम. वृत्तपत्रविद्या व जनसंवाद महाविद्यालय**

एम. जी. एम. वृत्तपत्रविद्या व जनसंवाद महाविद्यालयात सकाळी १० वाजता आयोजित कार्यशाळेच्या उद्घाटन कार्यक्रमासाठी एम. जी. एम. चे विश्वस्त मा. अंकुशराव कदम, जे. एन. इ. सी. चे प्राचार्य सुधीर देशमुख, वृत्तपत्रविद्या व जनसंवाद महाविद्यालयाच्या प्राचार्या रेखा शेळके, मराठी अभ्यासकेंद्राचे अध्यक्ष प्रा. दीपक पवार, प्रा. राममोहन खानापूरकर, प्रा. नितीन निमकर, विभागीय समन्वयक मा. सुहास तेंडुलकर, विभागीय संघटक सुबोध जाधव यांची उपस्थिती होती. मा. अंकुशराव कदम यांच्या हस्ते आदरणीय यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करुन कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले.

यावेळी बोलताना प्रा. दीपक पवार म्हणाले की, मराठी भाषा, समाज व संस्कृती या तिघांचा विचार करुनच मराठीच्या

भविष्याचा वेध घेता येईल. मराठी भाषा वाढविण्यासाठी, तिला ज्ञानभाषेचे स्वरुप प्राप्त करुन देण्यासाठी, तिचा माहिती व तंत्रज्ञानात होणारा वापर वाढविला पाहिजे. युनिकोड या संकेतपद्धतीमुळे संगणकावर मराठीच्या वापराचे प्रमाणीकरण झालेले आहे.युनिकोडची सोय अनेक वर्षे असतानाही अनास्था व बेफिकिरीमुळे त्याची फारशी माहिती लोकांपर्यंत पोचलेली नाही. वास्तविकत: केंद्र सरकारने सुमारे दहा वर्षांपूर्वीच युनिकोड प्रणालीस मान्यता दिलेली असतानाही राज्य शासनाने संगणक वापरामध्ये ही प्रणाली सक्तीची केलेली नाही. म्हणून युनिकोडच्या माध्यमातून मराठीचा संगणकीय वापर कसा करावा याचे प्रशिक्षण देण्याची वेळ आलेली आहे.

प्राचार्य देशमुख यांनी मगोगत व्यक्त केले. सुहास तेंडुलकर यांनी नवमहाराष्ट्र युवा अभियानाच्या उपक्रमांमागील भूमिका स्पष्ट केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वैशाली ठाकूर यांनी केले. अभिजीत विटोरे यांनी आभार मानले.

**देवगिरी महाविद्यालय**

देवगिरी महाविद्यालयात दुपारी २ वाजता आयोजित कार्यशाळेसाठी म.सा.प.चे अध्यक्ष मा. कौतिकराव ठाले-पाटील, प्राचार्य प्रदीप जब्दे, प्रा. दीपक पवार, प्रा. राममोहन खानापूरकर, प्रा. नितीन निमकर, नवमहाराष्ट्र युवा अभियानाचे समन्वयक मा. विजय कान्हेकर, मा. सुहास तेंडुलकर, सुबोध जाधव यांची उपस्थिती होती. मा. कौतिकराव ठाले यांच्या हस्ते आदरणीय यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून कार्यक्रमाचे उद्‌घाटन झाले.

यावेळी कौतिकराव ठाले म्हणाले की, व्यवहारात मराठी भाषेचा वापर वाढणे हे मराठीसाठी, मराठी माणसासाठी फायद्याचे आहे. विशेषत: संगणकीय व्यवहारात जर मराठीचा वापर मोठ्या प्रमाणात होऊ लागला, तर मराठी ज्ञात असणाऱ्यांना रोजगाराच्या अधिकाधिक संधी या क्षेत्रात उपलब्ध होऊ लागतील. म्हणूनच आपण सर्वांनी संगणक व्यवहारात मराठीच्या वापराविषयी आग्रही भूमिका घेतली पाहिजे.

प्राचार्य प्रदीप जब्दे यांनी मगोगत व्यक्त केले. विजय कान्हेकर यांनी भूमिका स्पष्ट केली. प्रा. शिवानंद भानुसे यांनी सूत्रसंचालन केले. अभिजीत विटोरे यांनी आभार मानले.

**विभागीय केंद्र, औरंगाबादतर्फे आयोजित आगामी उपक्रम :**

- सोमवार व मंगळवार, दि. ४ व ५ ऑक्टोबर २०१० दरम्यान युवती मेळाव्याचे आयोजन करण्यात येणार आहे.
- ऑक्टोबरच्या शेवटच्या आठवड्यामध्ये यशवंत फिल्म फेस्टिवलचे (वर्ष दुसरे) आयोजन करण्यात येणार आहे.
- दि. २५ नोव्हेंबर २०१० रोजी आदरणीय यशवंतराव चव्हाण साहेबांच्या पुण्यतिथीनिमित्त परिसंवादाचे आयोजन करण्यात येणार आहे.
- दि. २५ नोव्हेंबर २०१० रोजी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई येथे विभागीय केंद्र, औरंगाबाद यांच्यातर्फे तयार करण्यात आलेल्या मा. बशर नवाझ यांच्या जीवनावर आधारित माहितीपटाचे विमोचन मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार आहे.
- दि. १२ डिसेंबर २०१० रोजी औरंगाबाद येथे या माहितीपटाचे प्रदर्शन मराठी-उर्दू मिलाजुला मुशायरा या कार्यक्रमामध्ये करण्यात येणार आहे.

❊ ❊ ❊

# विभागीय केंद्र, पुणे आणि कृषी सहकार व्यासपीठ कार्यवृत्त

### कृषी सहकार व्यासपीठ

कृषी सहकार व्यासपीठाचे कार्यक्रम प्रतिष्ठानचे विश्वस्त मा. श्री. ज्ञानेश्वर बापू खैरे आणि मा. श्री. अंकुश काकडे, माजी महापौर, पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली चालते. प्रतिष्ठानच्या सर्व कार्यक्रमांना पद्मविभूषण मा. मोहन धारिया यांचे प्रमुख मार्गदर्शन मिळते. दैनंदिन कामकाजात श्री. शं. त्रिं. भिडे व प्रा. प्र. त्र्यं. पंडित यांचा सहभाग असतो. निमंत्रक डॉ. भागवतराव पवार यांच्या मार्गदर्शनाचा लाभ व्यासपीठाच्या कामकाजास उपलब्ध झाला आहे.

### कृषी विभाग

- दिल्ली येथे सिटा (Centre for International Trade in Agriculture & Agro based) या संस्थेच्यावतीने डॉ. भागवतराव पवार हे मराठी 'शरद कृषी' या मासिकाचे मुख्य संपादक म्हणून कामकाज पहातात. व्यासपीठाचे निमंत्रक म्हणून त्यांनी वेळोवेळी प्रतिष्ठानच्या पुणे कार्यालयास भेट देऊन कार्यक्रमाच्या आयोजनाबाबत चर्चा व मार्गदर्शन केले व कार्यक्रमात सहभाग घेतला.
- ग्रामीण पतसंस्थांनी मिनी किसान बँकाप्रमाणे काम करावे असा प्रयोग कोल्हापूर जिल्हा म. स. बँकेने केला आहे. त्याबाबत कोल्हापूर विद्यापीठाचे अर्थशास्त्र विभागाचे माजी प्रमुख डॉ. जुगळे तसेच सहकार विभागाचे मा. बापूसाहेब खैरे यांनी मागील पत्रव्यवहार पुढे चालू ठेवला आहे. महाराष्ट्राचे सहकारी कृषीपत संस्थांचे पुनरूज्जीवन कार्यक्रमामध्ये को. ऑपरेटीव्ह व्हिलेज बँक / मिनी किसान बँक योजनेवर भर देण्यात यावा यासाठी पाठपुरावा या कालावधीत चालू ठेवला.
- राज्य शासनाने नियुक्त केलेल्या ठोक जलदर निश्चितीसाठी महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाचे आवाहनास अनुसरून श्री. शं. त्रिं. भिडे यांनी शेतकऱ्यांना प्राधान्याने पाणी मोजून द्यावे, पाण्याची गळती व चोरी रोखण्यासाठी सॅटेलाईट इमेजींगची कार्यवाही व्हावी. नियोजित लाभ क्षेत्राचे ३०% क्षेत्रासही पाणी मिळत नाही त्याबाबत विचार व्हावा इत्यादी अनेक सूचना पाठविण्यात आल्या.
- प्रयास या संस्थेने या विषयावर एक चर्चासत्र आयोजित केले होते त्यास श्री पंडित व भिडे हजर होते. प्रयासची टिप्पणी व चर्चासत्रातील माहिती याचा प्रतिष्ठानचे अभिप्राय पाठविण्यास उपयोग झाला. शेतकऱ्यांना पाणी मोजून द्या या विषयावर श्री भिडे यांनी लिहिलेल्या तीन लेखांना ॲगोंवनने प्रसिद्धी दिली.
- 'बळीराजा' ह्या कृषी विषयक मराठी मासिकाच्या वतीने शेतकरी व तज्ञांची मासीक बैठक होत असते. या बैठकीस या कालावधीत मंचाच्या सोयीनुसार श्री. भिडे व प्रा. पंडित उपस्थित राहिले. प्रतिष्ठानमधील कृषीविषय कार्यक्रमासंबंधी टिपणे/लिखाण बळीराजास विनंतीनुसार दिले जाते. मागील कालावधीत पाठविलेल्या लिखाणासाठी श्री भिडे यांना द्वितीय पुरस्कारही मिळाला आहे.
- पाणी वाटपाचा प्राधान्यक्रम व हक्कदारी विषयी जलनितीमध्ये अपेक्षितबदलासंबंधी झालेल्या विविध संस्था, संघटनांच्या राज्यस्तरीय बैठकीस सर्वश्री भिडे व पंडित यांनी सहभाग घेऊन मुद्दे मांडले. त्यापैकी काही स्विकारले गेले. याबाबत व्यासपीठाचे वतीने मा. अंकुशराव काकडे ह्यांचे स्वाक्षरीने प्राधिकरण अध्यक्षांना लिहिणेत आले. त्याची प्रत मा. वनराई अध्यक्षांनाही पाठविण्यात आली व त्याबाबत सर्वश्री भिडे व पंडित यांचेशी मा. पद्मविभूषण मोहन धारिया यांनी चर्चा केली.
- कृषी औद्योगिक धोरण - महाराष्ट्र शासनाने याबाबत एक प्रारूप लोकमतासाठी प्रसारित केले आहे. त्यासंबंधी प्रतिष्ठानच्या व्यासपीठाच्या वतीने २ बैठका घेण्यात आल्या, त्यावरील पहिल्या बैठकीचा वृतांत 'बळिराजा' व 'ॲग्रोवन' कडे पाठविण्यात आला. दुसऱ्या बैठकीचा वृतांत अवलोकनार्थ मा. धारियासाहेबांकडे सादर केला आहे. सदर धोरणासम्बधी समर्थ भारत व्यासपीठ व महाराष्ट्र

शासन कृषी विभागाच्या चर्चासत्रास प्रा. पंडित यांनी सहभाग घेऊन मते मांडली. तसेच याबाबत श्री भिडे यांनी सविस्तर टिपण तयार करून मा. अंकुशराव काकडे यांच्या स्वाक्षरीने उद्योग विकास आयुक्त, महाराष्ट्र शासन यांना सूचना व अभिमत पाठविण्यात आले. या सूचनांवर पुढील कारवाईबाबत विकास आयुक्त कार्यालयाकडून कोल्हे कमिटी अहवालाची उपलब्धते बाबत विचारणा झाली ती माहिती त्यांना दिली.

मा. सहकार आयुक्त यांच्याशी जो पत्रव्यवहार केला आहे, त्याचा पाठपुरावा मा. सहकार आयुक्त व शासन अशा वेगवेगळ्या स्तरावर करण्याचे या कालावधीत चालू ठेवले. तसेच आत्मनिर्भर सहकारी संस्था कायदा गृहनिर्माण संस्थांना लागू करणेबाबतचा प्रस्ताव मा. ना. हर्षवर्धन पाटील, मंत्री महोदय (सहकार) यांना सादर केला आहे. त्याचा पाठपुरावा चालू आहे.

- श्री. भिडे आणि प्रा. पंडित सहकार विषयावर लेखनही करतात. या कालावधीत विदर्भ सहकारी मंडळाचे 'सहकारी विदर्भ', 'बळीराजा', 'सहकारी महाराष्ट्र', 'सहकारी जगत' इत्यादींमध्ये काही लेख प्रसिद्ध झाले आहेत.
- सहकारी अधिनियमांसंबंधी शासनास जे विनंतीपत्र सादर करण्यात आले होते त्यासंबंधी सहकार आयुक्तांचे कार्यालयातील अधिकाऱ्यांनी या कालावधीत व्यासपीठाशी संपर्क साधला आहे. त्यांना सदर पत्र प्रत पाठविली आहे, त्यावर प्रतिसाद अपेक्षित आहे.
- आदर्श सहकारी कायदा यावर श्री. भिडे यांचे दोन लेख 'ॲग्रोवन' मध्ये प्रसिद्ध झाले. सहकारी संस्थांबाबत घटना दुरूस्ती विधेयक लोकसभेत मांडण्याबाबत वृत्तपत्रातून कळल्यामुळे सदर सुधारणांची प्रत मा. शिवाजीराव पाटील यांचेकडून, डॉ. भागवतराव पवारांचे मार्फत प्राप्त करून घेऊन त्यावर कार्यवाही सुरू केली. प्रतिष्ठानचे अभिप्राय श्री. भिडे यांनी तयार करून संबंधित समितीस सादर केले. व्यासपीठाच्या सभांना येणाऱ्या सदस्यांनाही त्याच्या सूचना केंद्रीय लोकसभा समितीस पाठवण्यास कळविले आहे.
- सदर कालावधीत मा. सहकार आयुक्त यांच्या कार्यालयातील अतिरिक्त निबंधक यांनी श्री भिडे व प्रा. पंडित यांचेशी वेळोवेळी सहकारी संस्थासंबंधी व महत्वाच्या पत्रातील सूचनांवरही चर्चा केली.
- शेतकरी आत्महत्यासंबंधी श्रीमती इंगोले यांच्या पुस्तकासंबंधी एक साहित्यिक चर्चा घेण्याचे मा. श्री. बापूसाहेब खैरे यांनी सुचविल्यानुसार लेखिकेशी श्री. भिडे यांनी संपर्क साधला. तसेच श्री. भिडे व प्रा. पंडित यांनी महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष श्री. वि. भा. देशपांडे यांचेशी चर्चा केली व त्यांनी सुचविल्याप्रमाणे साहित्य परिषदेला मा. बापूसाहेब खैरे यांच्या सहीने प्रस्ताव पाठविला. त्यानुसार सहकारी तज्ञ आणि साहित्यिक अशी एकत्रित चर्चासत्राची रचना झाली. पद्मविभूषण मा. धारिया तसेच प्रमुखपदी पद्मभूषण डॉ. दुभाषी उपस्थित होते. त्या कार्यक्रमास वृत्तपत्रांनी विशेष प्रसिध्दी दिली. प्रास्ताविक डॉ. भागवतराव पवार यांनी केले. प्रा. पंडित यांनी आभार प्रदर्शन केले.
- नागरी व ग्रामीण पतसंस्थांचे नियमनासाठी महाराष्ट्र सहकारी अधिनियमातील प्रकरण ९अ व कलम ११० ब अन्वये सुधारणा प्रस्तावित आहेत. त्या प्रारूप विधेयकावर एक महत्वाचे चर्चासत्र व्यासपीठात आयोजित करण्यात आले. याबाबत प्रबोधन होण्याच्या दृष्टीने जेष्ठ अर्थशास्त्रज्ञ डॉ. नीळकंठ रथ यांचे 'पार्श्वभूमी: शासनप्रणीत सहकाराची' या विषयावरील, साधना साप्ताहिकातील तीन लेखांचा संदर्भ लक्षात घेण्यात आला. तसेच उच्चाधिकारी समितीचे प्रमुख मा. शिवाजीराव पाटील यांचेशीही संपर्क साधण्यात आला.
- गृहनिर्माण संस्थांचे अडचणी व तक्रारीसंबंधी निरनिराळ्या संस्थांकडून मा. उपलोकायुक्त यांचेकडे केलेल्या निवेदनांबाबत मुख्यालयाकडून आलेल्या मुद्यावर/ व्यासपीठात चर्चा घडवून आणली व सहकार आयुक्तांना श्री भिडे यांनी टिपण सादर केले.
- सहकार विभागाच्या पुनर्रचनेसंबंधी महाराष्ट्र शासनाने एक समिती गठित केली. सदर समितीचे सदस्य सचिव श्री. तिटकारे यांचे विनंतीनुसार व्यासपीठात चर्चा आयोजित करण्यात आली. तसेच याबाबत सहकार आयुक्त कार्यालयात आढावा सभेस निमंत्रणावरून श्री. भिडे उपस्थित राहिले.
- महाराष्ट्र शासनाने दि. ७.४.१० चे शासन निर्णयाने महाराष्ट्र अधिनियम १९६० व नियम १९६१ यात बदल सुचविण्यासाठी एक तज्ञ समिती स्थापन केली. त्यात

श्री. भिडे यांचा सदस्य म्हणून समावेश करण्यात आला आहे. या समितीच्या या कालावधीतील सर्व बैठकांना श्री. भिडे उपस्थित राहिले व त्यांनी अत्यंत उपयुक्त सूचना केल्या. त्या पुष्कळ अंशी स्वीकारल्या गेल्या. त्याबाबत श्री. अण्णा हजारे यांचेकडेही श्री. अंकुशराव काकडेंचे सहीने पत्रव्यवहार केला आहे.

- या अधिनियम बदलासंबंधी मा. अण्णा हजारे यांनी जनसुनवाईचा पुणे येथे जो कार्यक्रम घेतला त्यास श्री. भिडे व प्रा. पंडित उपस्थित राहिले. सदर समितीचे काम पुढे प्रगती पथावर आहे. सहकारी संस्थासंबंधी सदर बाबतीत मा. सहकार आयुक्तांना सूचना एकत्रित करून पाठविल्या.
- १११ व्या घटना दुरूस्ती बाबतचे कामहि व्यासपीठामार्फत अद्याप चालू असून त्याबाबतचा पत्रव्यवहार विविध पातळीवर या कालावधीत चालू राहिला आहे. या विषयावर बैठकाही चालू आहेत. त्यापैकी एक बैठक दि. २७ ऑगस्ट रोजी, राज्य बँकेचे मा. अध्यक्ष याच्या उपस्थित झाली. सदर बाबतीतील एका बैठकीत मा. मोहन धारिया व मा. बापूसाहेब खैरे यांच्याशी चर्चेत ठरल्याप्रमाणे व्यासपीठाची एक उपसमिती मा. बापूसाहेब पुजारी ह्यांच्या अध्यक्षतेखाली कार्यान्वित असून तिच्या वतीने एक प्रश्नावली प्रसृत केली असून मा. माणिकराव पाटील, अध्यक्ष, राज्य सहकारी बँक यांनी सदर बाबतीत जिल्हा मध्यवर्ती बँकांचे सहकार्य मिळेल असे बैठकीत सांगितले. डॉ. भागवतराव पवार, श्री. म. अ. देशमुख, डॉ. अप्पासाहेब भुजबळ, श्री. भिडे व प्रा. पंडित सदर उपसमितीचे शेवटच्या सभेस हजर होते. सदर अभ्यासगटात मा. भागवतराव पवार यांचा सहभाग व मार्गदर्शन आहे. सदर उपसमितीकडे राज्यसभा सदस्य मा. श्री. शरद जोशी ह्यांनी ही आपले विचार पाठविले आहेत.
- भारतीय सहकारिता अध्ययन संस्था (Indian Socy. For Studies in Co-op. I.S.S.C.) चे २६ वे अधिवेशन पुणे येथे भरविण्यात आले. त्यात प्रतिष्ठानच्या कृषी सहकार व्यासपीठाच्या वतीने श्री. भिडे ब प्रा. पंडित यांनी प्रतिनिधित्व केले व सर्वकष मते मांडली. प्रा. पंडित यांनी दोन्ही विषयांवर अधिवेशनात शोध निबंध वाचले. त्यांचे स्वागत झाले. त्या संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेतही सर्वश्री भिडे व प्रा. पंडित यांनी सहभाग घेतला.
- श्री. भिडे यांनी शिवाजी विद्यापीठामध्ये सहकाराचे पुनरुज्जीवन या विषयावर युनिव्हर्सिटी ग्रँट कमीशनच्या साहाय्याने अर्थशास्त्र विभागातर्फे जो परिसंवाद आयोजित केला, त्यामध्ये आमंत्रणानुसार भाग घेऊन, आपला प्रबंध सादर केला. सदर परिसंवादाचे उद्‌घाटन मा. शिवाजीराव पाटील यांनी केले.

**माहितीच्या अधिकार**

- माहितीचा अधिकार कायदा मंजूर झाल्यानंतर त्याचा प्रचार व प्रसार व्हावा या उद्देशाने डॉ. जोशी, मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र शासन यांचेशी झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने प्रतिष्ठानच्या वतीने श्री. भिडे यांनी 'माहितीचा अधिकार कायदा' यावर एक पुस्तिका लिहीली. मा. बापूसाहेब खैरे यांनी ती विशाल सह्याद्री ट्रस्टचे वतीने प्रसिद्ध केली असून वेळोवेळी या विषयावर घेण्यात येणाऱ्या कार्यक्रमामध्ये त्याचे वितरण केले जाते.
- प्रतिष्ठानच्या माहिती कक्षामध्ये वेळोवेळी भेट देऊन मार्गदर्शनशासाठी आलेल्या व्यक्तींना प्रा. पंडित व श्री भिडे यांचेकडून माहिती अधिकार कायद्याबाबत मार्गदर्शन केले जाते.
- सजग नागरिक मंच या माहिती अधिकारावर काम करणाऱ्या संस्थेच्या मासिक सभात प्रा. पंडित यांनी या कालावधीत सहभाग घेतला व प्रतिष्ठानच्या माहिती अधिकार कक्षाच्या कामकाजाची माहिती दिली. या संस्थेच्या वतीने याविषयी भरीव कार्य करणाऱ्या कार्यकर्ता व संस्थेचा गौरव करण्यात येतो.
- माहितीच्या अधिकारासंबंधीचा अधिनियम आणि महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम यातील संगतीसंबंधी विचार करून सध्या सहकारी अधिनियमातील सुधारणा करतांना कलम ३२ ची व्याप्ती वाढवावी अशी सूचना करणारे पत्र मा. बापूसाहेब खैरे ह्यांच्या स्वाक्षरीने डॉ. सुधीरकुमार गोयल, प्रधान सचिव (सहकार) यांना पाठविण्यात आले आहे.
- सहकारी अधिनियम आणि माहिती अधिकार अधिनियम या संबंधीच्या उच्च न्यायालयाचे काही निर्णय (उदा. विघ्नहर सहकारी साखर कारखाना, पंजाबराव देशमुख नागरी सहकारी बँक) आणि केरळ उच्च न्यायालय निर्णय यासंबंधी 'यशदा' शी पत्रव्यवहार केला.

- माहिती अधिकार अधिनियम या विषयावर जळगाव जिल्हा सह. बोर्डाने एक दिवशीय चर्चासत्राचे आयोजन केले. त्याचे उद्घाटन व प्रमुख भाषण प्रा. पंडित यांनी केले. त्यास उत्तम प्रतिसाद मिळाला.

**महिला व्यासपीठ**

- काळाच्या गतिमान ओघामध्ये बदलणाऱ्या समाजव्यवस्थेमुळे स्त्रियांवरचा मानसिक, शारीरिक ताण वाढत चालला आहे. यासाठी अनेक महिला व महिला संस्था यांच्या सहकार्याने कार्यक्रम, उपक्रमांच्या माध्यमातून हा ताण कमी करण्यासाठी, स्वबळावर स्त्रियांनी समर्थ होण्यासाठी पुणे केंद्राच्या महिला व्यासपीठाच्या प्रमुख मा. शैला लिमये अध्यक्ष म्हणून प्रयत्न करीत असतात. त्यात डॉ. शेवाळे यांची त्यांना मदत होत असते. आणि प्रा. पंडित यांचा सहभाग असतो. अन्य काही संस्थांकडूनहि प्रशिक्षणाबद्दल मागणी आली आहे.
- विभागीय केंद्र, पुणे, महिला व्यासपीठ व माझी मैत्रीण चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने पोळ्या, पुरणपोळ्या, ठेपले, यांचे प्रशिक्षण तसेच मार्केटींग, ब्रँडींग यावर श्रीमती शैला लिमये व प्रा. पंडित यांनी जे मार्गदर्शन केले, याचा तसेच नवीन गट विकसित करण्यास व त्यांना स्पेन्सर या मॉलमध्ये तयार मालाची विक्रीची संधी देण्याच्या दृष्टीने प्रशिक्षण देण्यात आले. त्याचा उपयोग झाला आहे.
- महिलांना सृतिका सेवा व शुश्रुषा कामाच्या प्रशिक्षणाबाबत जागृती व वनस्थळी या संस्थातील प्रशिक्षणासाठी श्रीमती शैला लिमये यांनी साहाय्य व समुपदेशन केले.
- अहवाल कालावधीत श्रीमती लिमये यांनी हुतात्मा राजगुरू शाळेत इयत्ता ९ वी, १० वी साठी इंग्रजी बोलण्यासंबंधी, शिबीर आयोजित केले. तसेच कौशल्यासाठी प्रागतिक शिबीर याच हुतात्मा राजगुरू शाळेत संचलित करण्याचे योजले आहे. उपक्रमास विद्यार्थी वर्ग, शिक्षक वृंद व मुख्याध्यापिका यांचा उत्तम प्रतिसाद मिळाला. याबाबत पुढील पाठपुरावा करणेसाठी श्रीमती शैला लिमये व प्रा. पंडित यांनी शाळेस भेट देऊन चर्चा केली.
- 'युवा' संस्थेच्या वतीने घेतलेल्या महिला संमेलनाच्या संयोजनात श्रीमती शैला लिमये यांनी सहभाग घेतला. कार्यक्रमात प्रा. पंडित यांनी मार्गदर्शन केले.

**प्रतिष्ठानचे विभागीय केंद्र, पुणे**

- या केंद्राचे काम विश्वस्त मा. अंकुश काकडे, माजी महापौर, पुणे, आणि माजी महापौर मा. शांतिलाल सुरतवाला हे पाहतात. सर्वश्री भिडे व प्रा. पंडित हे कार्यक्रमात सहभाग घेतात. डॉ. राम ताकवले हे अध्यक्ष आहेत.
- भारती विद्यापीठाचे सोशल सायन्स सेंटरचे दोन विद्यार्थी, पुणे विभागीय कार्यालयास, संलग्न करणेत आले आहेत. श्री. भिडे व प्रा. पंडित यांनी त्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणेचे काम या काळात चालू ठेवले आहे. या विद्यार्थ्यांच्या शिबिरात व वर्गात प्रा. पंडित यांची व्याख्याने झाली. या विद्यार्थ्यांशीं प्रा. पंडित आणि सौ. शैला लिमये यांनी अन्नधान्य वितरण कार्यक्रमासंबंधी चर्चा व मार्गदर्शन केले.
- मुख्यालयाच्या सूचनेनुसार श्री भिडे यांनी कै. यशवंतराव चव्हाण जीवन व कार्य या विषयावर वक्तृत्व स्पर्धा आयोजित केली. या उपक्रमास वक्तृत्वास तीन पुरस्कार (रू. १०००, ७५० व ५००) आणि निबंधास तीन पुरस्कार (रू. ५००, ४०० व ३००) अधिक उत्तेजनार्थ पाच पारितोषिके देण्यात आली. परीक्षणाचे काम प्रा. पंडित व सौ. विद्या भिडे यांनी केले. डॉ. शेवाळे यांनी सूत्र संचालन केले. संपूर्ण संयोजन श्री. भिडे यांनी केले. अशीच एक स्पर्धा श्री. भिडे यांच्या प्रयत्नाने 'म. गांधी जीवन व कार्य' याविषयावर येत्या ऑक्टोबर १० मध्ये घेण्यात येणार आहे.
- भारत इतिहास संशोधन मंडळात, अनुबंध प्रतिष्ठानकडून कॉलेज फ्रेशर्स पार्टी व पुणे संस्कृती या विषयावरील परिसंवादाचे आयोजन करण्यात आले. मा. श्री. अंकुश काकडे व मा. श्री. शांतिलाल सुरतवाला यांनी त्यामध्ये प्रबोधन केले.
- संयुक्त महाराष्ट्राच्या सुवर्णमहोत्सवानिमित्त आयोजित चर्चासत्रात डॉ. शां. ब. मुजुमदार यांनी मनोगत व्यक्त केले. महाराष्ट्र हे रेंगाळलेले राज्य आहे असे राज्यशास्त्र अभ्यासक प्रा. सुहास पळशीकर यांनी व्यक्त केले. आमदार उल्हास पवार यांनीही आपले मत मांडले. मुंबई व औद्योगिक क्षेत्र यांच्यात प्रगती आहे असे सर्व वक्त्यांनी मत व्यक्त केले. कै. यशवंतराव चव्हाण व कै. वसंतदादा पाटील यांचेमुळे शिक्षणात विकास घडला असेहि ध्वनित झाले.

प्राचार्य पी. बी. पाटील यांनी अध्यक्षस्थानावरून नियोजन, कार्यक्षम कार्यपालन आणि मूल्यमापन यापैकी तीसरा टप्पा परखडपणे पार पाडला पाहिजे असे स्पष्ट केले. प्रतिष्ठानचे सचिव मा. अंकुशराव काकडे ह्यांनी प्रास्ताविक केले. मा. शांतीलाल सुरतवाला यांनी आभार मानले. सर्वश्री भिडे व पंडित कार्यक्रमात उपस्थित होते.

- राज्य सुवर्णमहोत्सवानिमित्त बालनाट्य महोत्सवाचे आयोजन दि. २ व ३ जून १० रोजी भरत नाट्य मंदिरात केले. बालमित्रांची गर्दी होती. मा. अंकुशराव काकडे व मा. शांतिलाल सुरतवाला यांनी संयोजन केले.
- प्रतिवर्षाप्रमाणे केंद्राने श्री रंगीलदास सुरतवाला ट्रस्टच्या साहाय्याने वारकऱ्यांना अल्पोपाहार, औषधे व डोळे तपासून चष्म्यांचे वाटप केले. मा. अंकुशराव काकडे व मा. शांतीलाल सुरतवाला यांनी संयोजन केले. प्रा. पंडित, डॉ. शेवाळे व प्रतिष्ठानच्या कार्यालयातील सेवक वर्ग उपस्थित होता.
- मा. शांतिलाल सुरतवाला यांनी या कालावधीत सपत्निक अंटार्टिकाची सफर केली. त्यावर अंटार्टिका एक अविस्मरणीय अनुभव या पुस्तकाचे प्रकाशन; दि. १३ एप्रिल १० रोजी मा. बाबासाहेब पुरंदरे यांच्या शुभहस्ते केले. चार माजी महापौरांच्या उपस्थितीत आजी महापौर मा. मोहनसिंग राजपाल यांच्या हस्ते, पुस्तक प्रकाशन थाटात करण्यात आले.

**अन्य विशेष उपक्रम**

- १. मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या निमीत्त पुणे येथील 'सकाळ', 'केसरी', 'प्रभात' वृत्तपत्रातील संपादकीय व अन्य लेखनासंबंधीच्या प्रती मिळवून पाठविण्याबाबत मा. काळेसाहेब यांच्या दूरध्वनीवरील सूचनांनुसार संबंधीत साहित्य मुख्यालयास सादर करण्यात आले.

❋ ❋ ❋

# विभागीय केंद्र, कराड
# कार्यवृत्त

**स्व. यशवंतरावजी चव्हाण साहेब यांची जयंती**

स्व. यशवंतराजवजी चव्हाण साहेब यांच्या प्रीतिसंगमावरील समाधीस्थळी पी.डी. पाटील प्रतिष्ठानच्या वतीने १२००० विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय गीतांची सुमनांजली वाहण्यात आली. सातारा, सांगली, कोल्हापूर, पुणे जिल्ह्यातील अनेक मान्यवर नेते मंडळी, कराड शहरातील नागरिक, स्वातंत्र्यसैनिक, वृत्तपत्रकार हजर होते. स्व. यशवंतरावजी चव्हाण साहेब यांच्या ९७ व्या जयंती प्रीतिसंगम उद्यानातील समाधी स्थळावर पुण्याचे साहित्यिक व समिक्षक डॉ. आनंद पाटील यांचे ''महाराष्ट्राच्या जडणघडणीतील यशवंतरावाचे योगदान'' या विषयावर अभ्यासपूर्ण सुश्राव्य व्याख्यान संपन्न झाले. माजी खासदार व सौ. वेणूताई चव्हाण प. चॅ. ट्रस्ट कराड चे विश्वस्त मा. श्रीनिवासजी पाटील साहेब. यशवंतरावजीचे पुतणे व सौ. वेणूताई चव्हाण प. चॅ. ट्रस्टचे विश्वस्त श्री. अशोकराव चव्हाण, दैनिक प्रीतिसंगमचे संपादक मा. शशिकांत पाटील, प्रतिष्ठानच्या कराड विभागाचे सचिव मोहनराव डकरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रा. आनंद पाटील आपल्या भाषणात म्हणाले आज अनेक लेखक तयार झाले असले तरीही एकालाही इंग्रजीचे चार शब्द नीट वाचता येत नाहीत आणि ते स्वत:चा महाकवी असा उल्लेख करतात. त्यांनी स्व. यशवंतराव चव्हाण साहेब यांच्यावर अनेक पुस्तके लिहिली परंतु त्या पुस्तकांना दर्जा नसून त्या पुस्तकांना रद्दी म्हणण्याची वेळ आली आहे. स्व. ''यशवंतराव चव्हाण आणि विश्वसाहित्य'' हे पुस्तक आपण लवकरच प्रसिद्ध करणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

स्व. यशवंतराव चव्हाण साहेब मराठी सारखे इंग्रजी बोलत असत पण आज राज्यातील नेते काहीही बोलत नाहीत. राज्यात असा एखादा नेता आहे का की ज्याची संस्था नाही असा प्रश्न उपस्थित करीत डॉ. पाटील म्हणाले की सरपंच झाला की लगेच स्वत:ची संस्था राजकारणी लोक निर्माण करून सत्तेच्या जोरावर नावलौकिक पसरवतात. आज स्व. चव्हाण साहेबांच्या नावाचा सर्वच नेते उल्लेख करत असतात. कारण त्याना आपला स्वार्थ साधायचा असतो. अशा या राजकारणाच्या वृत्तीमुळे स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या नावाचे बाजारीकरण झाले असून सत्तेसाठी राजकीय नेते हे सर्व करत आहेत. स्वर्गीय यशवंतराव चव्हाण हे केवळ काँग्रेसचे नव्हते तर कम्युनिस्टही होते पण त्यापेक्षा ते अगोदर सर्व सामान्य जनतेचे नेते होते. भारत महासत्तेच्या दिशेने वाटचाल करीत आहे पण त्यासाठी यशवंत नीतीची गरज आहे. महाराष्ट्राच्या जडण-घडणीत यशवंतरावाचे योगदान या विषयावर मार्गदर्शन करीत असतांना आपणाला माहित नसलेले यशवंतराव चव्हाण त्यांच्या समाधीला साक्षी ठेवून मांडले. त्यामुळे संपूर्ण वातावरण यशवंत विचारानी सुगंधीत झाले.

सुरवातीला प्रतिष्ठानचे (कराड) सचिव मोहनराव डकरे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. हणमंतराव कराळे यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. मा. खासदार श्रीनिवास पाटील यांनी आपल्या सुश्राव्य, भावपूर्ण भाषणात आपल्या आठवणी सांगितल्या.

सौ. वेणूताई चव्हाण स्मारकातील स्व. यशवंतरावजी आणि सौ. वेणूताई चव्हाण यांच्या पुतळ्याला मा. अशोकराव चव्हाण मा. सुनिल शामराव पवार यांनी पुष्पहार घातले. याप्रसंगी माननीय शंकरराव संसुद्दी सौ. वेणूताई चव्हाण कॉलेजचे प्राचार्य व यशवंतराव चव्हाण कॉलेजचे प्राचार्य सर्व प्राध्यापक शिक्षण मंडळ कराडचे सर्व शिक्षक/शिक्षिका, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान व सौ. वेणूताई चव्हाण ट्रस्टचे पदाधिकारी/सेवक, शहरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**वार्षिक सर्वसाधारण सभा**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई च्या विभागीय केंद्र कराडची वार्षिक सभा विभागीय केंद्र, कराडचे अध्यक्ष राम प्रधान साहेब, कार्याध्यक्ष मा. प्राचार्य पी. बी. पाटीलसाहेब, आणि मा. विलासरावजी पाटील साहेब यांच्या उपस्थितीत दि. ८ एप्रिल २०१० रोजी पार पडली. कराड जनता सहकारी बँकेचे प्रमुख मा. विलासरावजी पाटील साहेब (वाठारकर) विभागीय केंद्र कराडला अनेक वर्षे प्रत्येक करीत असलेल्या मदतीबद्दल त्यांचे खास आभार मानण्यात आले. महाराष्ट्राच्या सुवर्णमहोत्सवी वर्षात किमान ३० मान्यवर व्यक्तींची एक परिषद कराड आणि

महाबळेश्वर अथवा अन्य ठिकाणी घ्यावी असे ठरले. या परिषदेत महाराष्ट्र राज्याच्या ५० वर्षात महाराष्ट्र शासनाचे निर्णय, कायदे, विविधयोजनाची अंमलबजावणी त्याची फलप्राप्ती याची परखड चर्चा व्हावी अशी योजना आहे. मा. विलासरावजी पाटील वाठारकर जनता सहकारी बँकेमार्फत रु. ५०००० (रुपये पन्नास हजार फक्त) खर्च करणार आहेत. मा. राम प्रधान अध्यक्ष विभागीय केंद्र यांच्या दि. ११/७/२००९ च्या पत्राप्रमाणे श्री. दिपक विठ्ठलराव पाटील यांची विभागीय केंद्रात नियुक्ति करावी शिवाय एक शिपाई नेमावा असाही ठराव झाला.

**जागतिक पुस्तकदिन**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई विभागीय केंद्र, कराडच्या व सौ. वेणूताई चव्हाण प. चॅ. ट्रस्टच्या सौ. वेणूताई चव्हाण संशोधन ग्रंथालयाच्या वतीने सौ. वेणूताई स्मारकांत ''जागतिक पुस्तक दिन'' साजरा करण्यात आला. यावेळी प्रतिष्ठानचे सचिव मोहनराव डकरे यांनी यशवंतरावजीचे विद्यार्थी दशेपासूनचे त्यांचे विविध विषयांचे त्याचे वाचन त्यांचा ग्रंथसांभार याबद्दल माहिती सांगितली. श्री. अनिल पाटील यानी सर्वांचे आभार मानले.

**महाराष्ट्र दिन – कामगार दिन**

महाराष्ट्राचे शिल्पकार स्व. यशवंतरावजी चव्हाण यांनी १ मे १९६० रोजी स्व. पंडित नेहरुच्या हस्ते नव्या महाराष्ट्र राज्याची स्थापना केली. त्याला १ मे २०१० ला ५० वर्षे पूर्ण झाली. सातारा मध्यवर्ती बँकेचे चेअरमन मा. विलासरावजी पाटील यांच्या हस्ते 'विरंगुळा' साहेबाचे निवासस्थान येथे ध्वजारोहण केले.

**सौ. वेणूताई यशवंतराव चव्हाण स्मृतिदिन**

स्व. यशवंतरावजी तथा सौ. वेणूताई चव्हाण शास्त्रीय संगीताचे जाणकार होते. सौ. वेणूताईची पहिली पुण्यतिथी विरंगुळ्या शेजारच्या शिवाजी हायस्कूलच्या मैदानावर सूरश्री भिमसेन जोशी यांच्या शास्त्रीय संगीताने स्व. यशवंतरावजींच्या साक्षीनेच झाली. याशिवाय सौ. वेणूताई सांस्कृतिक भवनाची सुरवात भिमसेन जोशी यांच्या शास्त्रीय संगीतानेच झाली. सौ. वेणूताईच्या स्मृतिदिनी शास्त्रीय संगीताचाच कार्यक्रम आयोजित करण्याची परंपरा आम्ही जपीत आहोत. यावर्षी १ जून १० ला डॉ. प्रकाश संगीत यांच्या शास्त्रीय संगीताचा कार्यक्रम झाला. सौ. कांचन संगीत डॉ. प्रकाश संगीत (मुलगा) यांची साथ त्यांना होती. मा. प्रकाश संगीत यांच्या ३ पीढ्या संगीताच्या (शास्त्रीय) उपासक आहेत. डॉ. सौ. कांचनताई संगीत यांच्या 'कोथिंबीरीचा चाफा' या पुस्तकास महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार मिळाला आहे. शास्त्रीय संगीताच्या कार्यक्रमास पुरेसा श्रोतावर्ग मिळविण्यात आम्ही यशस्वी झालो आहोत. आदरणीय स्व. पी. डी. पाटील साहेब यांच्या प्रमाणेच मा. आमदार बाळासाहेब यांनी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी प्रयत्न केले.

**आदरणीय स्व. पी. डी. पाटील जयंती**

स्व. आदरणीय पी. डी. पाटील यांच्यावर नामदार मा. शरद पवार साहेबांचा आदरयुक्त दृढ विश्वास होता. यामुळेच सौ. वेणूताई चव्हाण व प. चॅ. ट्रस्ट आणि यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान सुव्यवस्थित चालले होते. आजही मा. आमदार बाळासाहेब पाटील सर्व धुरा सांभाळीत आहे. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात त्यानी आपल्या कारकीर्दीचा ठसा उमटविला. कराडचे उत्तुंग वैभवशाली दोन मनोरे म्हणजे स्व. यशवंतरावजी चव्हाण साहेब आणि आदरणीय स्व. पी.डी. पाटील साहेब.

त्यांच्या जयंती निमित्त यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान आणि सौ. वेणूताई चव्हाण प. चॅ. ट्रस्ट मध्ये त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून आदरांजली वाहिली.

**स्वातंत्र्यदिन**

महाराष्ट्राच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त 'विरंगुळा' या साहेबांच्या निवासस्थानावर विद्युत रोषणाई करण्यात आली. सातारा जिल्हा मध्यवर्ती बँकेचे चेअरमन आणि दि कराड जनता बँकेचे शिल्पकार मा. विलासरावबापू पाटील (वाठारकर) यांच्या शुभहस्ते विरंगुळ्यावर ध्वज फडकविला.

**ग्रंथालय व्यवस्थापन प्रमाणपत्र अभ्यासक्रम**

प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी शिवाजी युनिर्व्हसिटीचा ग्रंथालय व्यवस्थापन अभ्यासक्रम (कोर्स) सुरु करण्यात आला एकूण ३१ विद्यार्थी होते १७ विद्यार्थी पास झाले निकाल ५५% लागला.

**ति. विठामाता पुण्यतीथी (स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या मातोश्री)**

ति. विठामातांच्या वर आपत्तींचा डोंगर कोसळला. दैनंदिन जीवन जगणे कठीण झाले. परंतु त्यानी आपल्या मुलांचा सांभाळ मोठ्या हिमतीन केला. 'शिक्षण ही एक शक्ति आहे.' यासाठी त्यानी अपार कष्ट घेतले. १८ ऑगस्ट या त्यांच्या पुण्यतिथी निमित्त यशवंत शिक्षण संस्था, देवराष्ट्र आणि यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईच्या विभागीय केंद्र कराड यांच्या संयुक्त विद्यमाने देवराष्ट्र, यशवंतरावजी चव्हाण यांचे आजोळ येथे मोठ्याभावपूर्ण

वातावरणात विठामाता पुण्यतिथी सोहळा मोठ्या भावपूर्ण वातावरणात पार पाडला. ति. विठामातांच्या पुतळ्यास मोहनराव डकरे यांनी पुष्पहार घालून विनम्र अभिवादन केले. यशवंत शिक्षण संस्था देवराष्ट्रे आणि प्रतिष्ठानच्या वतीने 'लेकी वाचवा हो' या अभिनव अभियानाचा शुभारंभ करण्यात आला. प्रतिष्ठानच्या महिला प्रतिष्ठानच्या सदस्या सौ. छायाताई पाटील यांचे अभ्यासपूर्ण सुश्राव्य व्याख्यान झाले. शिक्षक पदाधिकारी, सचिव यांचीही भाषणे झाली. या कार्यक्रमास महिलांची उपस्थित लक्षणीय होती. (सुमारे ७००) देवराष्ट्रे मधील सर्वांना हा कार्यक्रम संस्मरणीय वाटला.

❊ ❊ ❊

# विभागीय केंद्र, रत्नागिरी
# कार्यवृत्त

### जागतिक महिला दिन कार्यक्रम

यावेळी सदर कालावधीत बचत गटातील महिलांनी बनविलेल्या मालाचे भव्य प्रदर्शन व विक्री स्टॉल उभारण्यात आले होते. तसेच दि. ८ मार्च ते ११ मार्च या चार दिवसात महिलांसाठी फनी गेम्स व विविध स्पर्धा आयोजित करण्यात आल्या. या प्रदर्शनाचे उद्घाटन ८ मार्च रोजी सकाळी ११ वाजता दैनिक रत्नागिरी टाईम्स वृत्तपत्राच्या मालक मा. सौ. उर्मिला घोसाळकर यांचे शुभहस्ते दीप प्रज्वलन करून करण्यात आले. यावेळी जिल्हाध्यक्षा मा. सौ. युगंधरा राजेशिर्के, प्रथितयश उद्योजक मा. श्री. महेंद्रशेठ जैन, पद्मावती सोशल फौंडेशनच्या सौ. रचना जैन, श्री. विकी जैन, प्रतिष्ठानच्या सदस्या, सचिव, कर्मचारी व बहुसंख्य महिला उपस्थित होत्या.

दि. ११ मार्च रोजी सायंकाळी ५ वाजता मुलांचे सांस्कृतिक कार्यक्रम करण्यात आले. त्यावेळी चिपळूणच्या वैद्यकीय अधिकारी आनंदीबाई पुरस्कार प्राप्त मा. सौ. आरती पंडित या प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या. यावेळी महिलांसाठी घेण्यात आलेल्या फनी गेम्स व विविध स्पर्धांचा बक्षिस वितरण समारंभ मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाला. तसेच महिलांच्या दि. ११ मार्च रोजीच्या उपस्थितीवर 'लकी ड्रॉ' काढण्यात आला. कार्यक्रमाचेवेळी मान्यवरांनी आपली मनोगते व्यक्त केली. तसेच महिला बचत गटातील महिलांनी आपल्या मालाची विक्री होवून आर्थिक लाभ झाल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करून प्रतिष्ठान कडून मिळत असलेल्या मार्गदर्शन व सहकार्याबद्दल धन्यवाद दिले.

### यशवंतराव चव्हाण जयंती

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई कोकण विभागीय केंद्र जिल्हा समिती रत्नागिरी व वराडकर बेलोसे महाविद्यालय, दापोली यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १२ मार्च २०१० रोजी स्व. यशवंतराव चव्हाण यांची ९७ वी जयंती दापोली येथील आर. आर. वैद्य इंग्लिश स्कूलच्या सभागृहात संपन्न झाली.

या कार्यक्रमाला जेष्ठ पत्रकार व साहित्यिक मा. श्री. अरूण साधू यांची प्रमुख उपस्थिती लाभली होती. प्रथम प्रमुख अतिथी मा. अरूण साधू यांचे शाल, श्रीफळ, मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन ॲड. श्री बाळासाहेब बेलासे यांचे हस्ते सत्कार करण्यात आला. यानंतर विविध क्षेत्रात प्राविण्य मिळविण्याऱ्या खेळाडूंचा व मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.

मान्यवरांच्या गौरव सोहळ्यानंतर जेष्ठ पत्रकार व साहित्यिक मा. श्री अरूण साधू यांचे यशवंतराव चव्हाण व सुवर्ण महोत्सवी महाराष्ट्र या विषयावर व्याख्यान झाले. व्याख्यानात त्यांची यशवंतरावांचे बालपण, शालेय महाविद्यालयीन जीवन, त्यांची विचारांची प्रगल्भता, साहित्यिक प्रगल्भता अशा सर्वांगाला स्पर्श केला. १९६० नंतर यशवंतरावांनी पहिली अडीच वर्षे मुख्यमंत्री पद भूषवून दशकभरात राज्याच्या प्रगतीचा आलेख चढता ठेवला. आज ते सुवर्ण महोत्सवी वर्षाच्या कार्यक्रमांना उपस्थित राहीले असते तर आपल्या राज्याचा ढासळता आलेख पाहून कपाळाला हात लावला असता, अशी खंत मा. श्री. अरूण साधू यांनी व्यक्त केली.

आपल्या राज्याची निर्मिती झाल्यानंतर व त्याआधी मोठे राज्य असतानाही कै. चव्हाण यांच्या राज्याच्या प्रगतीत सिंहाचा वाटा आहे. परंतु त्यांच्यावर अनेकांनी टीका केली. मात्र सकारात्मक विचार, नम्रपणा, प्रगल्भ बुध्दिमत्ता, अभ्यासू व वैचारीक व्यक्तिमत्व या जोरावर त्यांनी राज्याला आदर्श घालून दिला असल्याचे श्री. साधू यांनी सांगितले. यशवंतराव चव्हाण यांचे महाराष्ट्रावर एवढे उपकार आहेत. त्यांचे ऋण महाराष्ट्र राज्याने फेडलेले नाहीत. महाराष्ट्राने त्यांचे कोठेही स्मारक उभारलेले नाही.

आपल्या अध्यक्षीय समारोपात ॲड. बेलासे यांनी यशवंतराव चव्हाणांचे अष्टपैलु चौफेर व्यक्तिमत्व, पुरोगामी विचार, संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील योगदान बहुजनांच्या उन्नतीसाठी सतत प्रयत्न हे सर्व आजच्या युवा पिढीला दिपस्तंभा प्रमाणे आहे. भूमिगत चळवळीच्या वेळी यशवंतरावांना प्रत्यक्ष पहाण्याचे भाग्य या दापोली तालुक्यातील पालगड येथील बेलोसे कुटूंबीयांना लाभले. त्यामुळे त्यांचे

स्मारक दापोली येथे होण्याच्या दृष्टीने मी व माझी संस्था सर्वांना बरोबर घेऊन प्रयत्नशील राहू अशा भावपूर्ण शब्दात श्री. बेलासे यांनी ग्वाही दिली.

प्रतिष्ठानच्या रत्नागिरी जिल्हाध्यक्षा मा. सौ. युगंधरा राजेशिर्के यांनी आपल्या मनोगतात यशवंतरावांच्या कार्याची ओळख युवा पिढीला व्हावी यासाठी प्रतिष्ठान अनेक कार्यक्रम राबवित आहे. या कार्यक्रमांना युवा पिढीचा सकारात्मक प्रतिसाद लाभत आहे अशा भावना व्यक्त केल्या.

**वसुंधरा दिन .**

प्रतिष्ठानचे रत्नागिरी येथील कार्यालयात 'वसुंधरा दिन' साजरा करण्यात आला. यावेळी विभागीय समितीचे अध्यक्ष मा. श्री. राजाभाऊ लिमये, उपाध्यक्ष मा. डॉ. श्रीरंग कद्रेकर, रत्नागिरी जिल्हा समिती अध्यक्षा मा. सौ. युगंधरा राजेशिर्के, जिल्हा समिती सदस्या मा. सौ. वंदना देसाई, सचिव श्रीमती प्राची शिंदे व बचत गटातील महिला उपस्थित होत्या.

कार्यक्रमाची सुरूवात मान्यवरांच्या हस्ते दिपप्रज्वलनाने झाली. कार्यक्रमाचे प्रस्ताविक श्रीमती प्राची शिंदे यांनी केले. कोकण विभागीय केंद्राचे उपाध्यक्ष मा. डॉ. श्रीरंग कद्रेकर यांनी उपस्थित बचत गटातील महिलांना मार्गदर्शन करताना 'वसुंधरा' म्हणजे पृथ्वीचे संरक्षण कसे केले पाहिजे हे विषद केले. यावेळी विविध प्रकारचे होणारे प्रदूषण व वृक्षतोड यामुळे पृथ्वीवरील ढासळणारा समतोलपना राखण्यासाठी 'वृक्षलागवड' ही एक चळवळ म्हणुन सुरूवात केली पाहिजे असे आवाहन मा. डॉ. कद्रेकर यांनी महिलांना केले.

यानंतर जिल्हाध्यक्षा मा. सौ. युगंधरा राजेशिर्के यांनी वृक्षतोडीचे दुष्परिणाम पुढच्या पिढीला भोगण्यास लागू नयेत म्हणून आज आपण वृक्ष लागवड केली पाहिजे असे सांगितले व हे वृक्षलागवडीचे काम महिलांनीच मनावर घेणे गरजेचे आहे असे मा. सौ. राजेशिर्के यांनी जमलेल्या महिलांना सांगितले.

कोकण विभागीय अध्यक्ष मा. श्री. राजाभाऊ लिमये यांनीही महिलांना मार्गदर्शन केले. प्रतिष्ठान तर्फे बचत गटातील महिलांना बेल व कोकम रोपांचे वाटप करण्यात आले. या आगळ्या वेगळ्या कार्यक्रमाला बहुसंख्येने उपस्थित राहून महिलांनी उत्स्फुर्त प्रतिसाद दिला.

**सुवर्ण महोत्सवी महाराष्ट्र समारोह**

दिनांक ३० एप्रिल २०१० ते ३ मे २०१० 'सुवर्ण महोत्सवी महाराष्ट्र' समारोह रत्नागिरी येथील अ. के. देसाई हायस्कूलच्या पटांगणात आयोजित करण्यात आला. ३० एप्रिल ते ३ मे २०१० या कालावधीत विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. यावेळी महाराष्ट्र राज्याने विविध क्षेत्रात केलेल्या प्रगतीचे दर्शन घडविणारे विविध उद्योजकांचे, कंपन्यांचे, शासकीय कार्यालयांचे, कृषी, बंदरे, सार्वजनिक बांधकाम, पाटबंधारे, मरीन, छोटे उद्योजक, महिला बचत गट यांच्या स्टॉल्सचे भव्य प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. तसेच कोकणातील बंदरांचा विकास व नौका, दर्यावर्दी साधनसामुग्री यांची माहिती देणारे प्रदर्शनही हे या समारोहाचे विशेष आकर्षण होते.

यशवंतराव चव्हाण यांच्या विविध भूमिकेतील फोटोंच्या उभारलेल्या दालनाचे उद्घाटन दि. ३० एप्रिल २०१० रोजी सायं. ५ वा. मा. पालकमंत्री श्री. भास्करराव जाधव यांचे शुभहस्ते दीप प्रज्वलनाने करण्यात आले. यावेळी विविध मान्यवर उपस्थित होते.

जिल्हा समिती सदस्य मा. श्री. महंमद रखांगी यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. प्रस्ताविकामध्ये प्रतिष्ठान तर्फे गेल्या पाच वर्षात केल्या गेलेल्या कामाचा आढावा त्यांनी घेतला. त्यानंतर उपस्थित मान्यवर पाहुण्यांचे स्वागत सचिव मा. श्री. अनिल नेवाळकर यांचे हस्ते पुष्प गुच्छ व स्मृतिचिन्ह देऊन करण्यात आले. यावेळी पालकमंत्री मा. श्री. भास्करराव जाधव व मा. आमदार श्री. उदय सामंत यांनी प्रतिष्ठानच्यावतीने घेण्यात आलेल्या 'यशवंतराव चव्हाण यांच्या स्वप्नातील महाराष्ट्र' या विषयावरील खुल्या गटातील निबंध स्पर्धेचा निकाल जाहीर केला.

दि. ३० एप्रिल रोजी रात्री ७ ते १० या वेळेत 'फ्रेंडस क्लब म्युझिकल अवर्स' हा सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

दि. १ मे २०१० रोजी दुपारच्या सत्रात मान्यवर उद्योजकांची चर्चा संपन्न झाली. यामध्ये मा. श्री. नानासाहेब भिडे, मा. श्री. हिराभाई बुटाला, मा. श्री. सुनील शिर्के, मा. श्री. बंडोपंत केळकर, पत्रकार मा. श्री. प्रमोद कोनकर यांना निमंत्रित करण्यात आले. या चर्चासत्राचे सुत्र संचलन लोटे खेड येथील उद्योजक मा. श्री प्रशांत पटवर्धन यांनी केले. या चर्चा सत्रातील नैसर्गिक साधनसंपत्ती, औद्योगिक विकास, बंदरे, रस्ते, कोकण रेल्वे वाहतूक आदी विषयांवर मान्यवरांनी आपली मते मांडली. याच दिवशी रात्री ७ ते १० या वेळेत 'स्वप्न सुरांचे' हा मुंबई प्रस्तुत सुरेल गीते, डान्स व मिमिक्री यांचा बहारदार कार्यक्रम सादर करण्यात आला.

दि. २ मे २०१० रोजी ४ ते ६ या दुपारच्या सत्रात ॲडव्हेंचर स्पोर्टस् ग्रेट आऊट डोअरचे उद्योजक मा. श्री. दिपक गद्रे, सारस्वत बँकेच्या सरव्यवस्थापक मा. सौ. उर्वशी धराधर, निमिड संस्थेच्या मा. माधवी कामत अशा विविध औद्योगिक क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थितांशी संवाद साधून आपल्याला आलेले अनुभव, आलेल्या अडचणी सांगितल्या.

याच दिवशी रात्री ७ ते ९ या वेळेत सिंधुदुर्गातील विदेशवारी केलेल्या कलाकारांचा 'मालवणी दशावतार' हा सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आला. या दशावतारात स्त्री भूमिका करणाऱ्या राष्ट्रीय किर्तीचे श्री. ओमप्रकाश चव्हाण यांचा शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

दि. ३ मे २०१० रोजी 'सुवर्ण महोत्सवी महाराष्ट्र' कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला. समारोपाच्या कार्यक्रमाला सुप्रसिद्ध लेखक व पत्रकार मा. श्री. मधुकर भावे यांनी निमंत्रित करण्यात आले. विभागीय समितीचे अध्यक्ष मा. श्री. राजाभाऊ लिमये यांचे हस्ते मा. श्री. मधुकर भावे यांचा शाल, पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

मा. श्री. मधुकर भावे यांनी कै. यशवंतराव चव्हाण यांचे विषयी अतिशय भारुन टाकणारे असे व्याख्यान दिले. श्री. भावे म्हणाले की देशाला दिशा देणारे राष्ट्र म्हणजे महाराष्ट्र. दलित, ओ. बी. सी. महिला या प्रत्येकाला पहिल्यांदा महाराष्ट्रात पद दिले गेले ते पुढे म्हणाले उद्याच्या महाराष्ट्राची बांधणी करण्याबाबत यशवंतराव चव्हाण यांची निश्चित अशी भुमिका होती व त्या भूमिकेतूनच राज्याची बांधणी करण्याबाबत यशवंतराव चव्हाण यांची निश्चित अशी भूमिका होती व त्या भूमिकेतूनच राज्याची जडणघडण झाली. १०६ हुतात्म्यांनी प्राणांची आहुती देऊन साकारलेला मुंबईसह महाराष्ट्र वेगळा होणार नाही हा संदेश पुढच्या पिढीला दिला पाहिजे असे श्री. भावे यांनी यावेळी सांगितले. मधुकर भावे यांचे हस्ते निबंध स्पर्धेतील विजेत्यांना रोख रक्कम, प्रशस्तीपत्र, पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देण्यात आले.

रत्नागिरी जिल्हा समितीच्या अध्यक्षा मा. सौ युगंधरा राजेशिर्के यांनीही आपले विचार मांडले. आभार प्रकटन सचिव श्रीमती प्राची शिंदे यांनी केले. गेले चार दिवस सहकार्य करणाऱ्या सर्व बचत गटातील महिलांचे ज्यांनी कलाकारांचे पाहुण्यांचे चहा नाष्टा, भोजन वगैरेची उत्तम व्यवस्था केली, त्यांचे प्रतिष्ठान तर्फे मनः पूर्वक आभार मानले. या सवे कार्यक्रमाचे सूत्रसंचलन कु. अनघा निकम यांनी केले.

**कृषी दिन**

दि. १ जुलै २०१० रोजी कृषी दिन कार्यक्रम चिपळूण येथील रूक्मीणीबाई माटे विद्यालय कामथे येथे संपन्न झाला. यावेळी बाळासाहेब माटे हायस्कूल कामथेच्या मुख्याध्यापीका श्रीमती पाटील जिल्हाध्यक्षा मा. सौ. राजेशिर्के, सचिव श्रीमती प्राची शिंदे, सदस्य श्री. संदिप लवेकर, श्री. सिध्देश लाड उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरूवात दीप प्रज्वलनाने झाली. कार्यक्रमाच्या सुरूवातीला शाळेतील विद्यार्थिनींनी अतिशय सुरेल आवाजात स्वागत गीत म्हटले. उपस्थित मान्यवरांनी मुलांना मार्गदर्शपर भाषणे केली. जिल्हाध्यक्षा मा. सौ. राजेशिर्के व सदस्य यांचे हस्ते इ. ५ वी ते ९ वी च्या विद्यार्थ्यांना जांभळाची रोपे वाटप करण्यात आली. सदर रोपे विद्यार्थ्यांनी लक्ष देऊन वाढवावीत असे आवाहन करण्यात आले. सदरची रोपे कृषी विज्ञान केंद्र, सावर्डा यांनी दिल्या बद्दल त्यांचे आभार मानण्यात आले.

शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती पाटील यांनी गाणी गाऊन मुलांना वृक्ष लागवडीबाबत मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचन श्री. मुल्ला सर यांनी केले.

❋ ❋ ❋

# विभागीय केंद्र, लातूर
# कार्यवृत्त

**शिवछत्रपती शिवाजी महाराज यांना अभिवादन**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, विभागीय केंद्र लातूरच्या वतीने जागतिक किर्तीचे राजा शिवछत्रपती यांना विनम्रपणे अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी विभागीय केंद्राचे जेष्ठ संचालक ॲड. मनोहरराव गोमारे, प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार, कोषाध्यक्ष भाऊसाहेब गोरे इ. मान्यवर उपस्थित होते.

**व्याख्यान**

रामकृष्ण परमहंस महाविद्यालय, उस्मानाबाद येथे यशवंतराव चव्हाण साहेबांचे निकटचे सहकारी, प्रसिद्ध वक्ते, लेखक, माढा, जि. सोलापूरचे माजी आमदार अनेक सांस्कृतिक समित्याचे पद भूषविलेले मा. विनायकरावजी पाटील यांच्या व्याखानाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्यांचा विषय **महाराष्ट्राचे दृष्टे नेतृत्व.** अध्यक्षस्थानी उस्मानाबाद नगर परिषदेचे माजी नगराध्यक्ष मा. श्री. नानासाहेब पाटील हे होते. याप्रसंगी मा. विनायकरावजी पाटील म्हणाले की, यशवंतराव चव्हाण यांच्या सर्जनशील नेतृत्वाचे वेगळेपण असे की, त्यांनी या नव्या जागृतीला योग्य वळण लावले व तिच्या कर्तृत्वाला नवीनवी क्षेत्रे उपलब्ध करुन दिली. नवी संस्थात्मक चौकट निर्माण केली. जिल्हा परिषदा हे त्याचे बोलके उदाहरण आहे. १९५८ सालातल्या बळवंतराव मेहता समितीच्या शिफारशीप्रमाणे सर्व भारतात पंचायत राज्याचा प्रयोग सुरु झाला होता. यशवंतराव चव्हाण यांनी या शिफारशीप्रमाणे महाराष्ट्रात प्रयोग सुरु केला. परंतु भारतातल्या इतर राज्यापेक्षा त्यांनी येथे जिल्हा परिषदेची वेगळ्या पद्धतीने घडण केली. त्यामुळे नवे प्रभावी स्थानिक नेतृत्व निर्माण हाऊ लागले.

पाटील म्हणाले की, यशवंतराव चव्हाण आपल्या राज्यामध्ये जेवढा प्रभाव पाडू शकले तेवढा प्रभाव स्वातंत्र्यानंतरच्या काळात भारतातल्या कोणत्याही मुख्यमंत्र्याला पाडता आला नाही. यशवंतरावांच्यासारखे आपल्या राज्यावर प्रभाव पाडणारे काही मुख्यमंत्री कदाचित सापडतील. परंतु ते एका राज्याचेच नेते राहिले. यशवंतराव चव्हाण हे राष्ट्रीय नेते बनलेले होते. प्रा. डॉ. रमेशराव दापके यांनी आभार मानले.

**जागतिक महिला दिन**

दि. ०८/०३/२०१० रोजी प्राचार्य कुसुमताई मोरे यांच्या अध्यक्षतेखाली आजच्या महिलांसमोरील आव्हाने या विषयावर विस्तृत चर्चा झाली. या चर्चेत प्रा. साधना जगताप, प्रा. व्ही. एस. कुलकर्णी इत्यादी भगिनींनी आपला सहभाग नोंदविला.

**यशवंतराव चव्हाण यांची ९७ वी जयंती**

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लातूरमधील जेष्ठ विधीज्ञ ॲड. मनोहरराव गोमारे हे होते. याप्रसंगी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद येथील मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. प्रल्हाद लुलेकर यांचे लातूरकरांना कायमचे लक्षात राहील असे विचार ऐकावयास मिळाले. त्यांच्या भाषणाचा थोडक्यात गोषवारा पुढीलप्रमाणे - जन्मदात्या आईचे जसे लक्ष आपल्या दुर्बल विकलांग, अज्ञानी मुलामुलीकडे असते ती आपल्या बाळांना सशक्त, स्वावलंबी बनवण्याचा प्रयत्न करते. तसाच प्रकार माणुसकीचे ज्योत असलेले महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी आईच्या भूमिकेतून पाहिले. दलित, मागासवर्गीय समाजाकडे लक्ष देऊन त्यांच्यासाठी अनेक योजना राबवल्या. त्याचबरोबर वाडीवस्तीवरील शेतकरी, शेतमजूर अशा सर्व तळागाळातील जनसामान्यांना शासनाचा लाभ मिळावा या सद्हेतूने प्रेरित होऊनच त्यांनी या देशातील जिल्हा परिषदांचा पहिला प्रयोग आपल्या महाराष्ट्रात चालू केला. ईबीसीसारख्या शैक्षणिक सवलतीचा धाडसी प्रयोग, शेती, शिक्षण, आरोग्य, सहकार, कृषि, उद्योग इ. बाबींकडे त्यांनी चौफेर लक्ष देऊन ग्रामीण भागातील माणूस सुखी करावयाचा होता.

राज्याची धुरा ते सांभाळीत असतानाचा त्यावेळी ऑक्टोबर १९६२ मध्ये आपल्या देशावर चीनने आक्रमण केले. हा खंडप्राय देश संकटात सापडला असताना त्यावेळचे समाजवादी विचाराचे व चव्हाण साहेबांवर विश्वास असलेले पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरु यांच्या हाकेला ओ देऊन या कणखर सह्याद्रीला देशाचे संरक्षणमंत्री म्हणून जावे लागले. पुढे त्यांनी गृह, अर्थ, परराष्ट्र इ. महत्वाचे खाती सांभाळत असताना या राज्याकडे ते पारदर्शी, स्वार्थविरहीत प्रेम देत राहिले. या अनुषंगानेच

मागासवर्गीय समाजाला न्याय मिळाला पाहिजे या हेतूनेच त्यांनी आपल्यानंतर मा. कन्नमवार, वसंतराव नाईक या पिढ्यानपिढ्या दुर्लक्षित समाजातील माणसाच्या स्वाधीन या राज्याचा कारभार दिला. त्याचे कारण 'जावे त्यांच्या वंशा तेव्हा कळे' या उक्तीप्रमाणे या नेत्यांना त्यांचे दु:ख कळेल, या राज्यातील सर्व जातीपंथातील जनता सुखी व्हावी हा शुद्ध हेतू चव्हाण साहेबांचा होता.

डॉ. लुलेकर पुढे म्हणाले की, या देशाच्या इतर प्रांतातील जनता, चव्हाण साहेबांच्या काळात आपल्या राज्याकडे एक सुसंस्कृत राज्य म्हणून पाहत होती. ते मागच्या काळातील चित्र बदलले असून आपण अनेक अर्थाने बदनाम होत आहोत. या राज्यातील आजच्या तरुणाने यशवंतराव चव्हाण या महान माणासाच्या विचाराचे चिंतन करुन त्यांचे विचार आपल्या कृतीत उतरवून आपल्या राज्याला त्यांच्या नावाप्रमाणे महान बनवावे.

प्रा. डॉ. लुलेकर यांनी 'आपल्या महाराष्ट्राची ५० वर्षे' या अभ्यासपूर्ण विषयाची मांडणी पहाडी आवाजातून प्राध्यापक, डॉक्टर, वकील, वरिष्ठ अधिकारी, शिक्षक इ. बुद्धीजीवीनी खचून भरलेल्या सभागृहातील लोकांसमोर उभी केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मा. हरिभाऊ जवळगे यांनी केले. सूत्रसंचालक काटे जे.एस. यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यात मुख्याध्यापक विद्याधर शिंदे. बापूसाहेब सांडूर, प्रकार गादगिणे, ए. एम. शेख, पांडूरंग देडे, अनिल दरेकर, सुधाकरराव देशमुख, माधव बावगे, विजय चव्हाण, प्रा. श्याम आगळे इत्यादींनी मोलाचे सहकार्य केले.

**महाराष्ट्र राज्य सुवर्णमहोत्सवी वर्ष २०१० निमित्त निबंध स्पर्धा**

दि. १२ मार्च २०१० : महाराष्ट्र राज्य सुवर्ण महोत्सवी वर्ष २०१० व आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार, भारताचे उपपंतप्रधान मा. यशवंतराव चव्हाण यांच्या ९७ व्या जयंती उत्सवाप्रित्यर्थ 'महाराष्ट्राच्या तरुणासमोरील भविष्यातील आव्हाने' या विषयावर खुली निबंध स्पर्धा घेण्यात आली. अनेक तरुण-तरुणींनी तसेच जेष्ठ बंधू-भगिनींनी या निबंध स्पर्धेत भाग घेतला.

या निबंध स्पर्धेत अनेक वाचनीय निबंध प्राप्त झाले. या निबंध स्पर्धेचा निकाल जाहीर झाला असून या निबंध स्पर्धेचे १५५१/- रुपयाचे प्रथम पारितोषिक श्री. प्रकाश नारायणराव पतंग रा. मसोड ता. कळमनुरी जि. हिंगोली यांना मिळाले. द्वितीय पारितोषिकाच्या मानकरी कु. जयश्री राम भोसले मुदगडकर तर तृतीय पारितोषिक विभागून दोन उमेदवारांना देण्यात आले. श्री. विजयकुमार भिकुसिंग पवार रा. जिंतूर जि. परभणी व श्री. नुतनकुमार भागवत बनसोडे रा. लातूर हे या निबंध स्पर्धेचे मानकरी आहेत. या निबंध स्पर्धेचा बक्षिस वितरण समारंभ लोकनेते यशवंतराव चव्हाण यांच्या ९७ व्या जयंतीदिवशी दि. १२ मार्च २०१० रोजी करण्यात आला. विभागीय केंद्राचे सचिव श्री. हरिभाऊ जवळगे यांनी सर्वांचे आभार मानले.

**शेतकऱ्यांसमोरील आव्हाने : परिसंवाद**

दि. १६/०३/२०१० : गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर निसर्गाच्या अनियमितपणामुळे 'आजच्या शेतकऱ्यांसमोरील आव्हाने' या विषयावर चर्चा आयोजित करण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रसिद्ध शेतीतज्ज्ञ जयवंत वैद्य हे होते. या परिसंवादात प्रा. डॉ. शेषराव मोहिते, प्रा. विजय जाधव, प्रा. व्ही. बाय. कुलकर्णी इत्यादींनी सहभाग नोंदविला. श्री. हरिभाऊ जवळगे यांनी सर्वांचे आभार मानले.

**ख्रिसमस शुभेच्छा**

दि. ०२/०४/२०१० रोजी गुड फ्रायडेनिमित्त लातूर शहरातील ख्रिस्ती बांधवांना विभागीय केंद्राच्या वतीने हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती**

दि. १४/०४/२०१० रोजी आखाडा बाळापूर, ता. कळमनुरी, जि. हिंगोली येथे पुस्तक प्रकाशन व स्वातंत्र्यसैनिकांचा मेळावा आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्यात हैद्राबाद मुक्ती संग्रामातील सेनानी दिपाजी पाटील यांच्या पुस्तकाचे लेखक प्रा. महेश मोरे यांनी लिहिलेल्या पुस्तकाचे प्रकाशन स्वातंत्र्यसेनानी गंगाप्रसाद अग्रवाल, आ. राजीव सातव, कवी इंद्रजित भालेराव, शिवाजी माने (माजी खासदार) यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. गंगाप्रसादजी अग्रवाल यांनी स्वतंत्र्यसैनिकांच्या मेळाव्यात आपले विचार व्यक्त केले. त्यांनी स्वातंत्र्यसैनिकांनी आपले चरित्र, देश व समाज बांधणीत वापरावी असे सांगितले. विविध वक्त्यांनी स्वातंत्र्यसैनिकांच्या अडचणी मेळाव्यात मांडल्या. विभागीय केंद्र, लातूर व क्रांतीवीर दिपाजी पाटील वाचनालय यांच्यातर्फे हा मेळावा आयोजित करण्यात आला होता. प्रास्ताविक प्रतिष्ठानचे सदस्य प्रा. उत्तम सूर्यवंशी यांनी केले. आभार प्रा. माधव जाधव यांनी मानले.

**सुवर्णमहोत्सवी महाराष्ट्र दिन**

दि. ०१/०५/२०१० : विभागीय केंद्राच्या वतीने सुवर्णमहोत्सवी महाराष्ट्र दिन साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी रेणापूर, जि. लातूर येथील थोर स्वातंत्र्यसेनानी मा. मुर्गाप्पा खुमसे हे होते. तर प्रमुख पाहूणे विभागीय केंद्राचे अध्यक्ष मा. खा. डॉ. जनार्दन वाघमारे होते. गेल्या पन्नास वर्षात मराठी भाषा, मराठी मुलुख आणि मराठी माणसे यांच्या सर्वांगीण उन्नत्तीसाठी विविध क्षेत्रात, खाजगी, सार्वजनिक व सरकारी पातळीवर जी जी धोरणे, उपक्रम व कार्यक्रम राबवले आहेत, त्यांचा यावेळी योग्यरितीने आढावा घेणे उचीत होईल, अशी कल्पना पुढे आली. त्यासाठी राज्याच्या विविध क्षेत्रात गेली पन्नास वर्षे लक्षवेधी कार्य केले आहे, अशा सुमारे एक हजार आजी-माजी लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, प्रशासक, न्यायमूर्ती, समाजसुधारक, संघटक, संचालक, कलावंत, विचारवंत, साहित्यिक, संपादक, पत्रकार, संशोधक म्हणून विविध क्षेत्रात नावलौकिक असलेल्या क्रियावान पंडितांची महाराष्ट्राच्या पन्नास वर्षाच्या उभारणीत शेतकरी, शेतमजूर, उद्योगपती, शिक्षक, प्राध्यापक या सर्वांचाच हातभार लाभलेला आहे. आपण येत्या दहा वर्षात म्हणजे २०२० ला या राज्याचा हिरकमहोत्सवी वर्ष साजरे करणार आहोत. तेव्हा दहा वर्षात या राज्यातील तरुणांनी महाराष्ट्राचा चेहरामोहरा बदलण्यासाठी मोलाचे कष्ट घ्यावेत, असे आवाहन डॉ. वाघमारे यांनी केले. आभार मा. हरिभाऊ जवळगे यांनी मानले.

**अंधश्रद्धा निर्मुलन कार्यक्रम**

घाटंग्री ता. जि. उस्मानाबाद येथे स्थानिक अंधश्रद्धा निर्मुलन समिती यांच्या संयुक्त विद्यमाने अंधश्रद्धा निर्मुलन कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी प्रा. बी. जी. पवार, प्रवचनकार मा. श्री. आर. पी. कोल्हे यांनी समाजात दिवसेंदिवस फोफावत असलेल्या अंधश्रद्धेबद्दल चिंता व्यक्त केली. ही अंधश्रद्धा दूर करुन पाहणाऱ्या कार्यकर्त्यांना किती त्रास होतो याचेही सविस्तर चर्चा, मार्गदर्शन यावेळी झाले.

**बौद्ध पौर्णिमा**

बौद्ध पौर्णिमेनिमित्त दि. २७/०५/२०१० रोजी 'गौतम बुद्धांचे विचार' या विषयावर चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. या चर्चासत्रात प्रा. एस. व्ही. कांबळे, प्रा. ज्ञानराज गायकवाड यांनी सहभाग नोंदवला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खा. डॉ. जनार्दन वाघमारे हे होते. ते म्हणाले की, माणसाच्या कल्पनेपेक्षा वास्तववादी विचारांना महत्व आहे. कारण, भारतीय परंपरेतील तत्वज्ञानात आकाशपेक्षा पृथ्वीची साक्ष महत्वाची मानली आहे. बुद्धाने कल्पनावादी विचारांचा त्याग करुन वास्तववादी विचारांना बळ दिले हे त्यांचे तत्वज्ञान आजही २५०० वर्षांनीसुद्धा प्रेरक आहे. बुद्धांने माणूस म्हणून जीवन जगण्याची प्रेरणा दिली. ईश्वर अवतारावर त्यांचा विश्वास नव्हता. माणूस प्रयत्नाने मोठा होऊ शकतो. त्यांच्यातील क्षमता ओळखण्यासाठी प्रज्ञेला महत्व दिले पाहिजे. या कार्यक्रमासाठी बौद्ध बांधव उपस्थित होते.

**जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज तिसरी राज्यस्तरीय अभंग व भजन स्पर्धा**

लातूर येथे दि. ३० मे २०१० रोजी डॉ. व्ही. एन. चिंते यांच्या देखरेखेखाली आयोजित केलेल्या शरद क्रीडा व सांस्कृतिक प्रतिष्ठान, पुणे आयोजित जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज तिसरी राज्यस्तरीय अभंग व भजन स्पर्धेत विभागीय केंद्राचा मोलाचा सहभाग होता. या परिषदेच्या अध्यक्षस्थानी विभागीय केंद्राचे सचिव श्री. हरिभाऊ जवळगे हे होते. या परिषदेच्या स्पर्धेमध्ये लातूर, सोलापूर, उस्मानाबाद येथील स्पर्धकांनी सहभाग नोंदवला होता.

**अहिल्यादेवी होळकर यांचा जन्मोत्सव**

दि. ३१/०५/२०१० रोजी प्रा. कुसुमताई मोरे यांच्या अध्यक्षतेखाली लातूर विभागीय केंद्राच्या वतीने औसा येथे महिला मेळावा घेण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहूणे खा. डॉ. जनार्दन वाघमारे हे होते. आपल्या भाषणात ते म्हणाले की, अहिल्यादेवी या राजकारणाचे अध्यात्मिकरण करणाऱ्या होत्या. राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर नि:पक्ष, न्यायदान, कुशल मुत्सद्देगिरी आणि अपार दानधर्माने जनतेच्या स्मरणात कायम राहिलेल्या आहेत. अध्यक्षीय समारोपात प्राचार्या कुसुमताई मोरे यांनी आपले मौलिक विचार मांडले.

**दिवंगत ग. प्र. प्रधान यांना श्रद्धांजली**

समाजसेवा, सामाजिक कार्य करीत असतानाही समोर येणाऱ्या सर्व लोभापासून वैयक्तिक स्वार्थाला दूर ठेवून निस्पृहरित्या जगता येते याचे जीवंत उदाहरण म्हणजे दिवंगत ग. प्र. प्रधान होय, असे विचार जेष्ठ समाजवादी नेते ॲड. मनोहरराव गोमारे यांनी, विभागीय केंद्र लातूर व अखिल भारतीय अध्यापक सभा, पुणे जिल्हा शाखा लातूरच्या वतीने दिवंगत ग. प्र. प्रधान यांच्या श्रद्धांजपलीपर कार्यक्रमात बोलताना व्यक्त केले.

याप्रसंगी दिवंगत प्रधान सरांना श्रद्धांजली वाहताना श्री. हरिभाऊ जवळगे गुरुजी म्हणाले की, 'माझ्या शालेय जीवनात राष्ट्रसेवा दलामुळे व पुढे शिक्षकी पेशा स्विकारल्यानंतर अखिल भारतीय अध्यापक सभा पुणे जिल्हा शाखा लातूरच्या जिल्हाध्यक्षपदी काम करण्याची संधी मिळाल्यामुळे या प्रेमळ, त्यागी, मनमिळावू महान माणसाचा सहवास मिळाला. त्यामुळे मी माझ्या ३३ वर्ष शिक्षकी पेशाला कुठे तडा जाऊ दिला नाही. आपल्या पगारातून गरीब, सामान्य, तळागाळातील मुलामुलींना मदत करता येते. या बाबत प्रा. ग. प्र. प्रधान यांच्या पिढीतील त्यांच्यासह अनेकांचे उदाहरण सांगता येईल. आता शिक्षक, प्राध्यापक व इतर क्षेत्रातील मान्यवरांना चांगले पगार आहेत. तेव्हा सर्व जातीपंथातील, तळागाळातील मुलामुलींना आजच्या तरुण गुरुजनांचे आर्थिक मदतीसह सर्व प्रकारचे सहाय्य करणे ही प्रा. ग. प्र. प्रधान सरांना खरीखुरी श्रद्धांजली ठरेल. यांप्रसंगी अंधश्रद्धा निर्मुलन समितीचे लातूर जिल्हा प्रमुख श्री. माधव बावगे, प्रकाश गादगिणे, प्रा. जे. बी. कुलकर्णी इत्यादींनी आपले विचार मांडले. यावेळी दोन्ही संस्थेचे पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### जिजाऊ माँसाहेबांचा पुण्यतिथी कार्यक्रम

दि. १७/०६/२०१० रोजी जिजाऊ भोसले यांची पुण्यतिथी खानापूर ता. जि. हिंगोली येथे साजरी करण्यात आली. या निमित्ताने महिलांचा बचत गट मेळावा आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना मा. हरिभाऊ जवळगे म्हणाले, जिजाऊ मातेने स्वराज्याची प्रेरणा दिली व स्त्रीशक्ती सक्षम आहे हे महाराष्ट्राला दाखवून दिले. बचत गटाच्या माध्यमातून स्त्रीयांनी स्वावलंबी व्हावे व आपल्यामधील सुप्त गुणांचा परिचय समाजाला करुन द्यावा. या मेळाव्याचे संयोजन श्री. संजय टाकळगव्हाणकर यांनी केले. शिक्षक श्री. साळुंके यांनी आभार मानले.

### छत्रपती शाहू महाराज जयंती संपन्न

दि. २६/०६/२०१० रोजी श्री रेणुकादेवी महाविद्यालय, माहूर जि. नांदेड येथे आदिवासी मेळावा घेण्यात आला. या मेळाव्यात छत्रपती शाहू महाराज यांना आदरांजली वाहण्यात आली. आदिवासींनी छत्रपती शाहू यांच्यापासून प्रेरणा घेवून सामाजिक न्यायासाठी संघर्ष करावा असे मा. राठोड यांनी सांगितले. माहूरच्या आसपास असलेल्या ग्रामीण भागातून २०० आदिवासी कार्यक्रमासाठी आले होते. श्री. पवार, मोहनलाल भीमा रेड्डी यांनी आपले प्रश्न मांडले. मा. हरिभाऊ जवळगे यांनी समर्पक उत्तरे दिली. प्रा. इक्बाल यांनी प्रास्ताविके केले तर आभार प्रा. जाधव यांनी मानले.

नांदेड येथे राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त शंकरराव चव्हाण सभागृहात खा. डॉ. जनार्दन वाघमारे यांचे 'राजर्षी शाहू महाराज' यांच्या जीवनावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी प्रा. दत्ता भगत हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून मा. हरिभाऊ जवळगे यांची उपस्थिती होती. याप्रसंगी खा. डॉ. वाघमारे म्हणाले की, समाजातील विषमता दूर करण्यासाठी छत्रपती शाहू महाराजांनी आरक्षण सुरु केले. दीनदुबळ्या लोकांना सबळ बनविण्यासाठी नोकरीची संधी उपलब्ध करुन दिली. त्यामुळे, खऱ्या अर्थाने राजर्षी शाहू महाराज हे सामाजिक न्यायाचे प्रणेते ठरतात आणि म्हणूनच शासनाच्या वतीने शाहू महाराज यांची जयंती सामाजिक न्याय दिवस म्हणून साजरी केली जाते. याप्रसंगी डॉ. विजयकुमार माहूर व मा. हरिभाऊ जवळगे यांनी आपले विचार मांडले. अध्यक्षिय समारोप करतेवेळी प्रा. दत्ता भगत यांनी आजच्या दलित बांधवांनी नवीन वर्तमानकाळात सहभागी झाले पाहिजे. आपण दलित नाही, आपण इतरांसोबत आहोत याची जाण असणे गरजेचे आहे असे विचार मांडले.

### राजमाता जिजाऊ पुण्यतीथी

दि. ०६/०७/२०१० रोजी राजमाता जिजाऊ यांची पुण्यतीथी साजरी करण्यात आली. याप्रसंग सौ. उषाताई फुलारी, चंद्रकला मोरे इ भगिनींनी आपला सहभाग नोंदवून जिजाऊ बद्दलचे आपले विचार मांडले.

प्रसिद्ध शिक्षणतज्ञ प्राचार्य नानासाहेब मुसांडे यांचे लातूर विभागीय केंद्राच्या वतीने सततचे सहकार्य लक्षात घेऊन त्यांचा ७५व्या वाढदिवसानिमित्त विभागीय केंद्राच्या वतीने यथोचित सत्कार करण्यात आला. शिक्षणक्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे सेवानिवृत्त प्राचार्य समाजासाठी दीपस्तंभ आहे. शांत, संयमी व चौकस बुद्धीमत्ता असणारे प्राचार्य मुसांडे यांच्या कार्याचा आदर्श शिक्षण क्षेत्रासाठी मोलाचा ठरतो आहे असे मत विभागीय केंद्राचे सचिव हरिभाऊ जवळगे यांनी व्यक्त केले.

### निरंतर शिक्षण अभियान

उस्मानाबाद येथे हमाल वस्तीत निरंतर शिक्षण अभियान यांचा मेळावा घेण्यात आला. प्रौढांनी व लहान मुलांनी आता सक्तीचा शिक्षणामुळे शिक्षणाविना राहणे योग्य नव्हे याबद्दल

प्रा. ए.डी. जाधव, त्याचबरोबर विभागीय केंद्राचे सदस्य प्रा. रमेशराव दापके, सचिन हरिभाऊ जवळगे यांनी प्रबोधन केले.

**क्रांतीदिन कार्यक्रम**

**दि. ०९/०८/२०१०** रोजी **भारत छोडो** या क्रांतीदिनानिमित्त लातूर येथील विभागीय केंद्राच्या कार्यालयात वेगवेगळ्या क्षेत्रातील तरुणांना एकत्र करुन देशाची एकात्मता, स्वावलंबन इत्यादीबद्दल मौलिक मार्गदर्शन करण्यात आले.

**व्यसनमुक्ती व पाणंदमुक्ती शिबीर**

दि. २९/०८/२०१० रोजी पारगाव ता. भूम जि. उस्मानाबाद येथे प्रसिद्ध प्रवचनकार मा. श्री. बी. ए. सुरवसे महाराज यांचे व्यसनमुक्ती व पाणंदमुक्ती यावर प्रवचन झाले. यासाठी पारगाव व परिसरातील लोक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

✻ ✻ ✻

# माहिती व तंत्रज्ञान प्रबोधनी
## कार्यवृत्त

**General**

- During the period Feb to Aug 2010, IT training continued as per schedule. The placement percentage was very good.

**Training**

- The PG DAC course, which had started on 23rd Feb 2010, was concluded on 13th Aug 2010. All students successfully completed the course. Shri Ashish Deshpande was adjudged the Best student scoring 70.63% marks. He was given a cash prize of Rs. 2000/- by YCP and the award from C-DAC is awaited.
- The PG DACA course was also successfully concluded on 13th Aug 2010.
- During the period YCP's AIT also conducted the following training.

| | | Total |
|---|---|---|
| a) | CCCO | 5 |
| b) | DIT | 7 |
| c) | CCIT | 5 |
| d) | DACA | 2 |
| e) | DMC | 5 |
| f) | CCWD | 3 |
| g) | CCMC | 1 |
| h) | DDCN | 1 |
| i) | CCPC | 2 |
| j) | DDT | 1 |
| k) | CCAC | 1 |
| l) | CCDBT & VB | 1 |
| m) | Modular | 2 |
| n) | DAC | 2 |
| o) | CET & LET | 7 |
| p) | Examination | 12 |
| q) | Training Workshops | 13 |

A total of 60 training course were conducted by YCP's AIT during the period.

- A presentation to students of Ramairajnan Jhunjhunwala College of Arts, Science and Commerce was also conducted on their campus to highlight career opportunities in the IT industry and the training available at YCP's AIT.
- During the period C-DAC, Pune revised the fees for the DAC and DACA courses. The DAC course fees have been revised to Rs. 79000/- and the PG DACA course fees are Rs. 66000/- per student.
- Students without engineering background and having graduated in other disciplines like B.Sc., B.A. and B. Com etc. are also being given an opportunity by YCP's AIT to become Software Programmers. Special training is being conducted by YCP's AIT.
- Several upgrades were carried out in software. Corel Draw 5 and Adobe CS5 Design premium have been included in the array. An overview of MAYA has also been included
- Enhanced security has been provided to the network by installing improved security software.

**Placement :**

- YCP's AIT placements are WORLD CLASS. The highest offer to a fresher on campus was Rs. 4.75 lakhs per annum.
- The Centre on an average gets about 90% positive results on placements, in adverse conditions like the recession the placement percentage is about 60%. The current batch has already achieved 80% placement and the process is ongoing. Old batch students are also permitted to attend Placement Process at YCP's AIT.

**Conclusion**

- Bids for various tenders for CORPORATE training are being processed.
- A busy training period is ahead of us.

❈ ❈ ❈

# भावपुर्ण श्रध्दांजली

## मा. भाऊसाहेब थोरात

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईचे संस्थापक सदस्य व ज्येष्ठ स्वातंत्र्यसेनानी, महाराष्ट्राच्या सहकार, राजकीय क्षेत्रातील नेते. मा. भाऊसाहेब थोरात यांचे रविवार दिनांक १४-३-२०१० रोजी वृध्दापकाळाने निधन झाले.

मा. भाऊसाहेब थोरात यांच्या अहमदनगर जिल्ह्यातील जोर्वे गांवामध्ये दि. १२ जानेवारी १९४२ रोजी जन्म झाला. ते बेलापूरला शिकत असताना १९३७ च्या निवडणुकीची प्रचारपत्रके वाटण्याचे काम त्यांनी केले. बेलापूरला झालेल्या पंडित नेहरूंच्या सभेचा व भाषणाचा मा. थोरात यांच्या मनावर खोल परिणाम झाला व त्यांनी माजी केंद्रीयमंत्री अण्णासाहेब शिंदे, पी. बी. कडू, धर्माजी पोखरकर यांच्यासह स्वातंत्र्य लढ्यात स्वत:ला झोकून दिले. स्वातंत्र्यसंग्रामातील सहभागामुळे त्यांनी तुरुंगवास भोगला.

मा. भाऊसाहेब थोरात यांनी संगमनेर कारखान्याची उभारणी करुन संगमनेर तालुक्यात सहकाराची मुहूर्तमेढ रोवली व तालुक्यात सहकारी संस्थांचे जाळे विणले. मा. थोरात सलग ३७ वर्षे जिल्हा बँकेचे संचालक होते. त्यापैकी २ वर्षे उपाध्यक्ष व १४ वर्षे अध्यक्ष म्हणून त्यांनी काम केले. त्याचबरोबर २७ वर्षे ते महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे संचालक होते. त्यापैकी दोन वर्षे ते अध्यक्ष होते. सन १९७८ मध्ये ते प्रथम संगमनेर मतदार संघातून विधानसभेवर निवडून गेले. गेली काही वर्षे त्यांनी तालुक्यामध्ये वृक्षारोपणाची मोहीम हाती घेतली. त्यातूनच दंडकारण्य अभियान आकाराला आले.

मा. भाऊसाहेब थोरात यांच्या निधनाने प्रतिष्ठानने एक सक्रिय संस्थापक सदस्य व हितचिंतक गमावला आहे.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई त्यांच्या कुटुंबियांच्या दु:खात सहभागी आहे.

## मा. श्रीमती प्रभा राव

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईच्या संस्थापक सदस्या व राजस्थानच्या राज्यपाल आणि काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या यांचे दि. २६.०४.२०१० रोजी निधन झाले.

श्रीमती प्रभा राव यांचा जन्म वर्धा जिल्ह्यातील रोहनी गावात एका स्वातंत्र्यसैनिकांच्या वसू कुटुंबात झाला. त्यांच्या कुटुंबावर गांधी विचारांचा मोठा प्रभाव होता. श्रीमती प्रभा राव राज्यशास्त्रात एम. ए. झाल्या होत्या. तसेच त्यांनी शास्त्रीय संगीतातील पदवी प्राप्त केली होती. विधानसभेत त्यांनी पुलगांव मतदार संघाचे व लोकसभेत वर्धा मतदार संघाचे प्रतिनिधीत्व केले होते. १९७२ ते १९७८ आणि १९८८ ते १९९० या कालावधीत मंत्री म्हणून महसूल, शिक्षण, नियोजन, उद्योग, सांस्कृतिक, पर्यटन, क्रीडा व युवक कल्याण अशी महत्वाची खाती त्यांनी समर्थपणे सांभाळली. तसेच त्यांनी काँग्रेस पक्षातही विविध पदे भूषविली. सन १९८४ मध्ये महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच्या अध्यक्षपदी त्यांची निवड झाली. त्यानंतर अखिल भारतीय काँग्रेसच्या सरचिटणीस म्हणून त्यांनी बरीच वर्षे कार्य केले. त्या काळात काँग्रेस पक्षाने त्यांच्यावर गोवा, राजस्थान, गुजराथ, मध्यप्रदेश, पश्चिम बंगाल, हरियाणा, केरळ, हिमाचल प्रदेश, छतीसगड अशा अनेक राज्यांची जबाबदारी सोपविली होती. सन २००४ मध्ये श्रीमती प्रभा राव यांनी पुन्हा प्रदेशच्या राज्यपाल म्हणून नियुक्ति झाली व दि. २ डिसेंबर २००९ पासून त्यांनी राजस्थानच्या राज्यपाल पदाचा अतिरिक्त कार्यभार स्वीकारला होता. दि. २४ जानेवारी २०१० रोजी त्यांनी राजस्थानच्या राज्यपाल पदाची रीतसर सूत्रे हाती घेतली होती.

श्रीमती प्रभा राव त्यांच्या निधनाने प्रतिष्ठानने एक सक्रिय सदस्य व हितचिंतक गमावला आहे.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई त्यांच्या कुटुंबियांच्या दु:खात सहभागी आहे.

## मा. बाबूराव कोतवाल

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई संस्थापक सदस्य, माजी आमदार व मा. यशवंतराव चव्हाण यांचे भाचे मा. बाबूराव कोतवाल यांचे दिनांक ०२.०६.२०१० रोजी वृद्धापकाळाने निधन झाले.

मा. बाबूराव कोतवाल यांचा जन्म सातारा जिल्ह्यातील कराड येथे दि. २० एप्रिल १९२८ रोजी झाला. त्यांनी प्राथमिक शिक्षण कराडच्या शाळा नं. २ मध्ये व पुढील शिक्षण महाराष्ट्र हायस्कूल आणि शिवाजी हायस्कूलमध्ये घेतले. सन १९४२ मध्ये त्यांनी ब्रिटिश राजवटीविरुद्ध स्वातंत्र्यसंग्रामात भाग घेतला. सन १९४५ मध्ये मॅट्रिक परीक्षा पास झाल्यानंतर पुढील उच्च शिक्षण कोल्हापूरच्या राजाराम महाविद्यालयात घेतले व सन १९५५ मध्ये बी. ए. ची पदवी संपादन केली. सन १९५६ मध्ये त्यांनी सातारा जिल्हा लोकल बोर्डात नोकरीस प्रारंभ केला. सन १९५७ मध्ये सार्वजनिक बांधकाम मंत्री, लोकनेते मा. बाळासाहेब देसाई यांचे स्वीय साहायक म्हणून त्यांची नियुक्ति झाली. त्यांनतर सन १९६७ मध्ये उद्योगमंत्री, मा. राजाराम बापू पाटील यांचे स्वीय सहायक म्हणून त्यांनी काम केले. सन १९७२ मध्येच कराड उत्तर स्वीय सहायक पदाचा राजीनामा देऊन त्यांनी सक्रिय राउजङ्कघागरणात पदार्पण केले. सन १९७७ मध्येच कराड उत्तर विधानसभा निवडणूक लढवून ते विजयी झाले. आमदार म्हणून सन १९७२ ते १९७७ या काळात तारळी नदीवर धरण मंजुरी, खोडशी बंधाऱ्याच्या नवीन बांधकामास मंजुरी, शेतीपाण्याचा प्रश्न मिटविण्यासाठी आग्रही भूमिका, सदाशिवगड पाणी पुरवठा योजनेस मंजुरी तसेच फार्मसी कॉलेजचे स्थलांतर इत्यादिन सामाजिक कार्यात त्यांनी सहभाग घेतला. सन १९८० मध्ये त्यांनी इंदिरा कॉंग्रेसमध्ये प्रवेश घेतला. त्यांनी सन १९८० मध्ये कराड तालुका स्वातंत्र्यसैनिक संघटनेची स्थापना केली. स्वातंत्र्यसैनिकांचे संघटन व त्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी ते अखेरपर्यत कार्यरत होते. त्यानंतर त्यांनी सन १९२७ मध्ये कराड उत्तरमधून पुन्हा विधानसभेची निवडणूक लढवली. सन १९९६ मध्ये कराड तालुका स्वातंत्र्यसैनिक पतसंस्थेची स्थपना करुन स्वातंत्र्यसैनिकांच्या गृहनिर्माण सोसायटीच्या उभारणीत सक्रिय सहभाग घेतला. सन २००३ मध्ये मा. कोतवाल यांचा अमृतमहोत्सवी सत्कार माजी मुख्यमंत्री डॉ. शिवाजीराव पाटील-निलंगेकर यांच्या हस्ते करण्यात आला.

मा. बाबूराव कोतवाल त्यांच्या निधनाने प्रतिष्ठानने एक सक्रिय सदस्य व हितचिंतक गमावला आहे. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई यांच्या कुटुंबियांच्या दु:खात सहभागी आहे.

## मा. नरेंद्र तिडके

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईचे संस्थापक सदस्य, स्वातंत्र्यसैनिक, माजी मंत्री तसेच काँगेसचे माजी प्रदेशाध्यक्ष मा. नरेंद्र तिडके यांचे बुधवार दिनांक १६.०६.२०१० रोजी वृद्धापकाळाने मुंबई येथे निधन झाले.

मा. नरेंद्र तिडके यांचा जन्म नागपूर जिल्ह्यातील सावली, जिल्हा नागपूर या गांवी दि. २ नोव्हेंबर २०१० रोजी एका शेतकरी कुटुंबात झाला. त्यांचे शिक्षण बी. ए. (ऑनर्स) एल्.एल्.बी. पर्यत झालेले होते. विद्यार्थीदशेपासून काँग्रेसच्या माध्यमातून त्यांनी राजकाररात प्रवेश केला. त्यांनी सन १९४२ च्या स्वातंत्र्य लढ्यात भाग घेतला व त्यामध्ये त्यांना कारावासही झाला. स्व. दादा धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली युवक चळवळीत भाग घेणारे निवडून गेले. १९६० साली त्यांनी ग्रामीण विकास खात्याचे उपमंत्री म्हणून कार्यभार स्वकारला. सन १९६२ मध्ये महाराष्ट्र विधानसभेचे सदस्य म्हणून निवड होऊन कामगारमंत्री म्हणून त्यांनी पदभार स्वीकारला. सन १९६९ मध्ये ते मजूर व ग्रामविकासमंत्री म्हणून त्यांनी काम केले. मा. तिडके सन १९७६ मध्ये काहीकाळ राज्याचे कार्यकारी मुख्यमंत्री होते. त्यानंतर सन १९७७ मध्ये नियोजन, ऊर्जा व विधान कामकाज खात्याचे मंत्री म्हणून काम पाहिले. मा. तिडके महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस समितीचे अध्यक्षही होते.

मा. तिडके राज्याचे कामगारमंत्री असताना त्यांनी जिनीव्हा येथे आयोजित मजूर संघटनेच्या परिषदेत भारतीय शिष्टमंडळाचे दोनदा नेतृत्व केले. ऑक्सफर्ड येथे राष्ट्रकुल देशाच्या 'ह्यूमन रिलेशन्स इन इंडस्ट्रिज' परिषदेत त्यांनी भाग घेतला. राष्ट्रीय मिल मजदूर संघाचे ते अध्यक्ष होते. राज्याची ग्रामीण रोजगार हमी योजना व कापूस एकाधिकार योजना यांना गति देण्याचे काम त्यांनी पार पाडले.

काँग्रेसमधील एक तत्वनिष्ठ व विचारवंत राजकारणी म्हणून जनमानसात त्यांची प्रतिमा होती. यशवंतराव चव्हाण, मुंबईच्या उभारणीत व कार्यात त्यांचा मोलाचा वाटा होता. प्रतिष्ठानच्या सुरुवातीच्या काळात मा. तिडके कार्यकारिणी मंडळाचे सक्रिय सदस्य होते. त्यांच्या निधनाने प्रतिष्ठानने निष्ठावंत हितचिंतक गमावला आहे.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई त्यांच्या कुटुंबियांच्या दु:खात सहभागी आहे.

## मा. मधुकरराव चौधरी

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई संस्थापक सदस्य,

ज्येष्ठ गांधीवादी व् विचारवंत, माजी मंत्री, माजी विधानसभा अध्यक्ष मा. मधुकरराव चौधरी यांचे दिनांक ०८.०७.२०१० रोजी रावेर तालुक्यातील खिरोदा या गांवी हृदयविकाराने वयाच्या ८२ व्या वर्षी निधन झाले.

मा. मधुकरराव चौधरी यांचा जन्म दिनांक १६ जून १९२८ रोजी झाला. त्यांनी बालवयातच सन १९३६ मध्ये फैजपूरला झालेले काँग्रेस अधिवेशन अनुभवले आणि त्यांच्या मनात राष्ट्रकारणाची बीजे रुजली. म. गांधी, प्र. जवाहरलाल नेहरु यांचा सहवासही त्यांना लाभला. स्वातंत्र्यलढ्यात अग्रेसर असलेले त्यांचे वडील मा. धनाजी नाना चौधरी यांचेकडून मिळालेले प्रेरणा व संस्कारांमुळे त्यांनी वयाच्या १४ व्या वर्षी १९४२ च्या भारत छोडो चळवळीत भाग घेतला. कायद्याचा अभ्यास अर्ध्यावर सोडून त्यांनी सातपूड्यातील आदिवासींच्या विकास कार्यात समर्पित भावनेने झोकून दिले. सर्वोदय केंद्राच्या माध्यमातून त्यांनी अलग सहा वर्षे या कार्याला चांगले स्वरुप दिले. त्यांच्या कार्याची दखल घेऊन काँग्रेस पक्षाने १९५७ मध्ये विधानसभेची निवडणूक लढण्याचा आग्रह केला. वयाच्या अवघ्या २८ व्या वर्षी आमदार आणि उपमंत्री झालेल्या चौधर यांनी पुढील २१ वर्षांमध्ये महाराष्ट्राच्या मंत्रीमंडळात शिक्षण, अर्थ व नियोजन, महसूल, पाटबंधारे व ऊर्जा, आरोग्य, नगरविकास, सांस्कृतिक व वन विभाग इत्यादी विविध खात्यांचे मंत्रीपद भूषविले. सन १९९० ते १९९५ या काळात महाराष्ट्र राज्य विधानसभेचे अध्यक्ष म्हणून त्यांनी जबाबदारी सांभाळली.

महाराष्ट्र सामाजिक परिषद, महाराष्ट्र सामाजिक समता परिषद, समाजसुधार आणि हुंडाबळी चळवळ, महाराष्ट्र राज्य ग्रामीण विकास परिषद संस्था, जातीनिहाय सेवा कार्याच्या हेतूने स्थापित पाल येथील सातपुडा विकास मंडळ इत्यादी संस्थांमध्ये त्याचा सक्रिय सहभाग होता. गांधीजींच्या विचारांनी प्रभावित होऊन कार्यरत राहिलेल्या मा. मधुकरराव चौधरी यांनी शिक्षण क्षेत्रात भरीव कामगिरी केली. रावेरचे जनता शिक्षण मंडळ, मुंबईमध्ये चेतना शिक्षण संस्थेचे अर्थ व वाणिज्य महाविद्यालय, इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट ॲण्ड कॉम्प्यूटर स्टडीज यांचे ते संचालन करीत होते. मलबार हिलमधील समाजाच्या वंचित स्तरातील मुलांच्या शिक्षणाची व्यवस्था करण्याचा गौरव प्राप्त करणारी 'बालकल्याणी' संस्था आणि पुण्याच्या सिम्बायसिस इंटरनॅशनल एज्युकेशन सोसायटी या संस्थांचे संस्थापक अध्यक्ष होते.

मा. मधुकरराव चौधरी यांनी विद्यार्थी दशेतच हिंदीच्या प्रचार-प्रसाराचे कार्य सुरु केले. महाराष्ट्र राष्ट्रभाषा प्रचार समितीचे व महात्मा गांधीनी स्थापलेल्या अखिल भारतीय राष्ट्रभाषा प्रचार समिती, वर्धा यांचे ते अध्यक्ष होते. विश्व हिंदी संमेलन भरविण्याची कल्पना त्यांचीच. त्यांनी पाहिले व तिसरे विश्व हिंदी संमेलन अनुक्रमे नागपूर आणि दिल्ली येथे आयोजित केले. मॉरिशसमध्ये आयोजित द्वितीय व चतुर्थ विश्व हिंदी संमेलनात त्यांनी भारतीय प्रतिनिधी मंडळाचे नेतृत्व केले.

मा. चौधरी आपल्या रचनात्मक आणि मुल्याधिष्ठित स्वभाववृत्तीमुळे राजकीय, सामाजिक क्षेत्रात वावरतानाही निष्कलंक जीवन जगले. शिक्षणमंत्री म्हणून त्यांनी घेतलेले निर्णय शिक्षणव्यवस्थेवर दूरगामी प्रभाव टाकणारे ठरले. रामशास्त्री प्रभुणे पुरस्कार, गदिमा स्नेहसंबंध यासारख्या अनेक प्रतिष्ठेच्या पुरस्कारांनी त्यांन गौरविण्यात आले. त्यांच्या निधनाने प्रतिष्ठानने एक संयमी राजकारणी, कृतिशील विचारवंत आणि गांधीवादी व्यक्तिमत्व गमावले आहे.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई त्यांच्या कुटुंबियांच्या दु:खात सहभागी आहे.

## मा. श्री. बी. जी. शिर्के

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई संस्थापक सदस्य, व ज्येष्ठ बांधकाम उद्योगपति मा. श्री. बी. जी. शिर्के याचे दि. १४.०८.२०१० रोजी वृद्धापकाळाने पुणे येथे निधन झाले.

मा. श्री. बी. जी. शिर्के यांचा जन्म दिनांक १ ऑगस्ट १९१८ रोजी मु. पो. पसरणी, तालुका वाई, जिल्हा सातारा येथे झाला. त्यांच्या प्राथमिक शिक्षणानंतर आर्थिक विवंचेनतून मार्ग काढत त्यानी इंजिनिअरींग कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. 'कमवा आणि शिका' या योजनेचा आधार घेत इंजिनिअरींगची पदवी पूर्ण केली. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांनी छोटी बांधकाम कंपनी सुरु केली. मात्र काही वर्षात ती बंद पडली. तरीही हिंमतीने त्यांनी आपला व्यवसाय उभा केला. त्या व्यवसायातूनच त्यांनी पुण्याच्या बालेवाडीतील शिवछत्रपति क्रीडा संकुल, मुंबईतील बांद्रा-कुर्ला स्पोर्टस् कॉम्प्लेक्स, पुण्याजवळ हिंजवडी येथील आय. टी. पार्क, मुंबई-बंगळुरु महामार्ग, चेन्नईतील विप्रो आय. टी. पार्क अशी अनेक कामे पूर्ण केली. तसेच गरीबांसी स्वस्तात घरांची योजनाही त्यांनी राबविली. दुबई, इराण, कुवेत, सौदी अरेबिया येथेही त्यांनी विविध प्रकल्प साकारले.

बांधकाम क्षेत्रात नावीन्यपूर्ण ठरलेला 'सिपोरेक्स' हा बांधकाम साहित्य निर्मिती करणारा कारखाना शी. शिर्के यांनी मोठी जोखीम पत्करुन १९७२ मध्ये उभारला. या कारखान्याच्या स्थापनेनंतर अनंत अडचणी आल्या. परंतु त्यांच्यावर श्री. शिर्के यांनी जिद्दीने मात केली व बांधकाम क्षेत्रात व्यावसायिकता आणण्याचे सातत्याने प्रयत्न केले. त्यानंतर त्यांच्या कामाला वेगळी दिशा मिळत गेली. पुणे विद्यापीठाच्या रसायनशास्त्र प्रयोगशाळेच्या उभारणीचे काम श्री. शिर्के यांनी केले. श्री. शिर्के यांना औद्योगिक कामाचा व्यापक अनुभव आल्यानंतर त्यांनी किर्लोस्कर प्रेस उभारणीचे काम हाती घेतले. दरम्यान श्री. शिर्के यांची भेट मा. शंतनुराव किर्लोस्कर यांच्याशी झाली. त्यांच्या कामाच्या दर्जामुळे त्यांना किर्लोस्कर ऑईल इंजिन, किर्लोस्कर कमिन्स उभारणीचे काम मिळाले.

मा. श्री. बी. जी. शिर्के हे द्रष्टे उद्योजक व धडाडीचे स्थापत्यकोविद होते. त्यांना सामाजिक बांधिलकीचेही भान हाते. त्यांनी पत्नीच्या स्मृतिप्रीत्यर्थ 'श्रीमती विजयादेवी शिर्के एज्युकेशन ट्रस्ट'ची स्थापना केली. या संस्थेच्या माध्यमातून त्यांनी वैज्ञानिक शिक्षण, ग्रामीण विकास, गरजूंसाठी सार्वजनिक सेवा सुविधा उभारण्यावर भर दिला. ते अनेक राष्ट्रीय पुरस्कारांचेही मानकरी ठरले. तरुणांना प्रेरणा देण्यासाठी त्यांनी 'उद्योगपर्व' या नावाने आत्मचरित्र प्रकाशित केले. हे चरित्र 'द क्रुसेड' या नावाने इंग्रजीमध्ये प्रकाशित झाले. मा. श्री. बी. जी. शिर्के यांच्या व्यावसायिक व सामाजिक कामाची व्याप्ति पाहून भारत सरकारने त्यांना 'पद्मश्री' किताब देऊन गौरवले. तसेच त्यांना भारतरत्न सर एम विश्वेश्वरैया पुरस्कार, फाय फाउंडेशन राष्ट्रीय पुरस्कार आदि विविध राष्ट्रीय पुरस्कारांनी गौरविण्यात आले होते. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या केंद्र इमारतीच्या अतिरिक्त वाढीव बांधकामामध्ये मा. श्री. शिर्के यांच्या कंपनीचे मोलाचे कार्य आहे. त्यांच्या निधनाने प्रतिष्ठानने एक कृतिशील व्यावसायिक व सामाजिक कार्यकर्ता गमावला आहे.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई त्यांच्या कुटुंबियांच्या दु:खात सहभागी आहे.

## मा. डॉ. वसंत पवार

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबइचे आजीव सदस्य व कार्यकारिणी मंडळ सदस्य मा. डॉ. वसंत पवार यांचे गुरुवार दिनांक ०७.१०.२०१० रोजी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले.

डॉ. पवार यांचा जन्म नाशिक जिल्ह्यातील निफाळ तालुक्यातील ओणे या गांवी दि. ४ एप्रिल १९४८ रोजी झाला. प्राथमिक व माध्यमिक शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांनी एम. बी. बी. एस. व नंतर एम. एस. ची पदवी मिळवली व डॉक्टरी व्यवसाय सुरु केला. नाशिकमधील नामवंत सर्जन म्हणून ओळखले जाणाऱ्या डॉ. पवारांनी कित्येक वर्षे जिल्हा रुग्णालयात मानद सर्जन म्हणूनही काम केले. वैद्यकीय व्यवसायाबरोबरच त्यांनी शिक्षण, समाजकारण आणि राजकारणातही भरीव कार्य केले. त्यांनी कुटुंबनियोजनाच्या तब्बल २७ हजार शस्त्रक्रिया करुन राष्ट्रीय कार्यात भरीव योगदान दिल्याबद्दल राज्यपालांकडून सुवर्णपदक देऊन त्यांना सन्मानित करण्यात आले होते. याशिवाय 'नाशिक भूषण' सह विविध पुरस्कारांनी त्यांना सन्मानित करण्यात आले होते.

डॉ. पवार यांनी १० व्या लोकसभेत सन १९९१ ते १९९६ पर्यंत कॉंग्रेसची खासदारकी भूषविली होती. राष्ट्रवादीची स्थापना झाल्यानंतर त्यांनी त्या पक्षात प्रवेश केला व सलग दोन वेळा विधान परिषदेवर आमदार म्हणून निवडून आले. शिक्षण क्षेत्रातही त्यांचे मोठे योगदान होते. विद्यापीठाच्या अनेक समित्यांवर त्यांनी काम केले. निफाड सहकारी साखर कारखान्याचे डॉ. पवार अध्यक्ष होते. त्याचप्रमाणे ते इंडियन मेडियल कौन्सिलवर महाराष्ट्रातून निवडून आले होते. अलीकडेच उत्तर महाराष्ट्राच्या मराठा विद्या प्रसारक समाजाचे ७५० बेडचे सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल उभारण्यात त्यांचा मोलाचा वाटा होता. डॉ. पवार यांनी गोदावरी बँकेची स्थापना केली व ते कुसुमाग्रज प्रतिष्ठानचे विश्वस्त होते. तसेच नाशिक येथे २००५ मध्ये झालेल्या ७८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे ते स्वागताध्यक्ष होते. त्यांच्या निधनाने प्रतिष्ठानने एक कृतिशील नामवंत सर्जन व सामाजिक कार्यकर्ता गमावला आहे.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई त्यांच्या कुटुंबियांच्या दु:खात सहभागी आहे.

महाराष्ट्राच्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळांतील

# उपक्रम : वेचक - वेधक




शिक्षण विकास मंच,
यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

मुल्य रु. १००/- फक्त

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

# हवामान बदल आणि महाराष्ट्र



मुल्य रु. ५०/- फक्त

## प्रतिष्ठानची विक्रीसाठी असलेली प्रकाशने :

| | | किंमत रुपये |
|---|---|---|
| ०१. | यशवंतराव चव्हाण : विधिमंडळातील निवडक मराठी भाषणे - भाग १<br>संकलन : डॉ. व्ही. जी. खोबरेकर | २००.०० |
| ०२. | वाय. बी. चव्हाण : सिलेक्टेड स्पीचेस-विधिमंडळ - भाग २<br>संकलन : डॉ. व्ही. जी. खोबरेकर | २५०.०० |
| ०३. | सिलेक्टेड स्पीचेस इन पार्लमेंट-वाय. बी. चव्हाण - खंड १ ते ४<br>संपादन : राम प्रधान | प्रत्येकी २५०.०० |
| ०४. | यशवंतराव चव्हाण यांचे मौलिक विचार संकलन - ना. धों. महानोर | ३.५० |
| ०५. | सह्याद्रीचे वारे - यशवंतराव चव्हाण | ३०.०० |
| ०६. | म. जोतिबा फुले यांचे निवडक विचार संकलन - प्रा. गजमल माळी | १२.०० |
| ०७. | बेकारी निर्मूलनातून ग्रामीण विकास - संपादक - वि. स. पागे | ३५.०० |
| ०८. | महाराष्ट्रातील दुष्काळ आणि जलसंपत्तीचे नियोजन - संपादन - अण्णासाहेब शिंदे | ६०.०० |
| ०९. | महाराष्ट्र : एक दृष्टिकोन - शरदराव पवार - भाषणसंग्रह - संपादन - दादासाहेब रूपवते | ७५.०० |
| १०. | पंचायत राज, जिल्हा नियोजन आणि ग्रामीण विकास - संपादन पी. बी. पाटील | १००.०० |
| ११. | नवभारत : परिवर्तनाची दिशा - संपादन - पी. बी. पाटील | १००.०० |
| १२. | विमुक्तायन : महाराष्ट्रातील विमुक्त जमाती : चिकित्सक अभ्यास -<br>संशोधक /लेखक - लक्ष्मण माने | २५०.०० |
| १३. | महिलांसंबंधीचे धोरण : स्वयंसिद्धतेकडे वाटचाल - डॉ. नीलम गोऱ्हे | १५.०० |
| १४. | यशवंतराव चव्हाण - चरित्र - लेखक - अनंतराव पाटील | ८०.०० |
| १५. | शब्दाचे सामर्थ्य - संपादन - राम प्रधान | ३७५.०० |
| १६. | महाराष्ट्राची चार दशकांतील वाटचाल : एक आढावा (इंग्रजी)<br>(यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई व महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळ यांचे संयुक्त प्रकाशन) | २५०.०० |
| १७. | बाऊंटीफूल बनियन - डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील चरित्र - खंड ४ (इंग्रजी) बॅ. पी. जी. पाटील | ८००.०० |
| १८. | ज्येष्ठ नागरिकांसाठी पुस्तिका | ३५.०० |
| १९. | अजिंठा - (काव्यसंग्रह) लेखक - ना.धो. महानोर (इंग्रजी) | १५०.०० |
| २०. | 'ई' बुक (मराठी/इंग्रजी) (यशवंत साहित्य/फोटो) | १५०.०० |
| २१. | न्यायालयीन व्यवहार आणि मराठी भाषा | ४००.०० |
| २२. | शैक्षणिक गुणवत्ता : आव्हान आणि आवाहन | २००.०० |
| २३. | हवामान बदल आणि महाराष्ट्र | ५०.०० |
| २४. | उपक्रम: वेचक-वेधक | १००.०० |

## व्हिडिओ कॅसेट्स

- मी एस. एम. : एस. एम. जोशी यांचा जीवनपट
- तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी : तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचा जीवनपट
- प्रवासी पक्षी : सुप्रसिद्ध साहित्यिक कुसुमाग्रज यांचा जीवनपट
- पु. ल. वृत्तान्त : पु.ल. देशपांडे यांचा जीवनपट

  वरील चारही व्हिडिओ कॅसेट्सची निर्मिती दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल यांनी पार पाडली.
- कॉ. केशवराव जेधे : कॉ. केशवराव जेधे यांचा जीवनपट, दिग्दर्शन - श्री. राम गबाले
- येस आय ॲम कम्युनिस्ट : कॉ. श्रीपाद अमृत डांगे यांच्या जीवनावरील अनुबोधपट, दिग्दर्शन - विनय नेवाळकर


AN OPPORTUNITY ARISES FOR THE ASPIRING
SOFTWARE AND MULTIMEDIA PROFESSIONALS
Post-Graduate Diploma in
Advanced Computing (DAC)
Advanced Computer Arts (DACA)
Diploma in
Information Technology (DIT)
Multimedia Creations (DMC)
Certificate Course in
Information Technology (CCIT)
Multimedia Creations (CCMC)
Web Designing
Programming Using C (CCPC)
Database Technology & Visual Basic (CCBT)
Data Base Administration 10g/11g (DBA)
सी डैक CDAC
ॲक्टस acts
Authorized Training Center
Authorised Training Centre of C-DAC
Yashwantrao Chavan Pratishthan's
Academy of Information Technology
5th Floor, Y. B. Chavan Centre, Gen. J. Bhosale Marg,
Opp Mantralaya, Nariman Point, Mumbai - 400 021.
Tel. No. 022-22817975 / 22043619. Mobile : (91) 9769256343
Email : ycpait@vsnl.com # Web site : www.ycpait.org/ait







# Abhisaran

Intrastate Youth Exchange Programme

*The Journey for Learning and Joy...*

# अभिसरण

शोधूया स्वतःला...

समजूया महाराष्ट्राला...

एका विभागातील युवांची दुसऱ्या विभागात जाऊन तेथील सांस्कृतिक, सामाजिक, शैक्षणिक वैविध्य समजून घेण्याची ही एक जाणीव प्रक्रिया. महाराष्ट्र अधिक जाणिवेने समजून घेण्याची इच्छा असणाऱ्या युवांना अभिसरणामध्ये हार्दिक आमंत्रण...













खेळ, व्याख्याने, यशोगाथांद्वारे युवतींमध्ये व्यक्तिमत्त्व विकास साधण्याचा मेळावा; सहभागातून संवाद व संवादातून सामर्थ्य मिळविण्याचा महोत्सव...

# युवती मेळावा

सहभागातून संवाद...

संवादातून सामर्थ्य...

## यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

# नवमहाराष्ट्र युवा अभियान

निमंत्रक : मा. सुप्रिया सुळे

www.navmaharashtra.org